ओ/४६

# नीतिज्ञानप्रभा

VERNACULA...
...न व्हरनक्युलर ट्रान्सलेशन सोसाइटी, पुणे. १८९४.
POONA 1894

कर्ता

बाबाराव जयराम शिंदे

सन् १८९४

किंमत १ [illegible]ये कलदार.

शिवाय टपालखर्च पडेल.

ओ/७६

# नीतिज्ञानप्रभा.

DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY. POONA. 1894.
डेकन व्हरनॅक्युलर ट्रॅन्स्लेशन सोसाइटी, पुणे. १८९४.

कर्ता

बाबाराव जयराम भिशे.

सन् १८९४

किंमत १२ आणे कलदार.

शिवाय टपाल खर्च पडेल.

# प्रस्तावना.

हे परमेश्वरा, ज्या नीतीच्या आदितत्वावर जगाचें सौख्य अवलंबून आहे, त्यांचा प्रसार होणें हें प्राणिमात्राचें दुःख दूर होणेंच होय. आर्यदेशामध्यें नीतीचीं तत्वें व तत्वज्ञानाचीं भांडारें थोडीं आहेत असें नाहीं; परंतु तीं पडलीं गीर्वाणभाषेमध्यें व प्रसार पडला प्राकृताचा. कुपांत जल आहे; पण दोरी जवळ नाहीं तर तलावाच्या पाण्याचा सहज उपयोग घेतला जातो.

गीर्वाण भाषेचीं तत्वें इतकीं खोल, गंभीर व मार्मिक आहेत कीं, तीं समजण्याची शक्ति आज क्वचित् स्थळीं महान् योग्यांचेंच अंगीं आहे. एसियाटिक सोसायटीला देखील तीं न समजल्यामुळें बौध्यतत्वें हल्लीं मान्य धरण्यांत आलीं आहेत.

थोडक्यांत पुष्कळ विषयासंबंधीं पूर्ण भरलेले सरळ व कारणासह मुख्यतो प्राथमिक शिक्षणास उपयुक्त होऊं शकेल, व तसेंच आबालवृद्ध व स्त्रियांनांही उपयुक्त मनोरंजक होऊन सर्वमान्य व्हावें ह्या हेतूनें ह्या पुस्तकाची रचना करण्यांत आली आहे. हें गर्वानें सांगत नाहीं; परंतु बारकाईनें व मननपूर्वक ह्या पुस्तकाचें वाचन करण्यांत आलें तर त्या त्या विषयाचीं सर्व तत्वें ह्यांत दृष्टीगोचर होतील.

शाळा खात्यांत व कुलीन स्त्रिपुरुषांस वाचनास योग्य होण्यास्तव ह्यांत रा० सा० शंकर मोरो रानडे बी. ए., रा० बा० हरगोविंद द्वारकादास कांटावाला डायरेक्टर, रा० सा० गणेश बळवंत बी. ए. एल्. एल्. बी. वगैरे गृहस्थांच्या सूचनेवरून खा-

लील निबंध कमी करण्यांत आले आहेत. १ परस्त्रीलंपटता, २ भाषण. ३ काम. ४ संन्यास. ५ ब्राम्हण. ६ क्षत्रीय. ७ वैश्य ८ शूद्र. ९ जामात. १० स्वशूर. ११ दुर्भगा. १२ वाचन. १३ लेखन. १४ वेश्या. व कांहीं विद्वानांच्या सुचनेवरून रूपांतर करण्यांत आलें आहे.

जर कोणाच्या मनांत अशी कल्पना येईल कीं, हें मी माझ्या डोक्यांतून नवीन काढलें आहे, तर तें मात्र चुकीचें होय. जरी मी कोणत्याही पुस्तकाची नक्कल केली नाहीं, तरी पुष्कळ पुस्तकाच्या अध्ययनांतून माझ्या डोक्यांत आकर्षण करून घेतलेलें ज्ञान ह्यांत ओतलें आहे. सेक्सपिअर कीं ज्याला प्राथमिकलेखक मानितात, त्यानेंही ज्या पुस्तकानें आपलें नांव वर आणिलें आहे, त्यांतले मुख्य भाग अव्यवस्थित व जीर्णावस्थेंत आलेल्या इटालिअन कादंबऱ्यांतून घेतलेले आहेत; तर ह्या नीतिज्ञानप्रेममध्यें जीं ज्ञानकिरणें भरलीं आहेत तीं परापूर्वापासून वारसांत उतरत आलेलीं आहेत. असो.

हें पुस्तक श्री. महाराजसाहेबांस अर्पण करण्याचा माझा मोठा हेतू होता; परंतु त्यांचें, आमच्या दुर्दैवानें परदेशी गमनानें तो योग आला नाहीं. जरी शाळाखात्यांतून त्याला मोठा उदार टेका देण्यांत आला आहे, तरी त्यापासून जो संतोष होणार त्याहून जर माझ्या राजास माझ्या हस्तानें हें पुस्तक देण्याचें माझ्या नशीबीं आलें असतें, तर मला मोठा आनंद झाला असता ! असो. पुढच्या एखाद्या प्रसंगीं सर्वशक्तिमान माझें मनोरथ पूर्ण करील.

ह्या पुस्तकास शुद्धलेखना संबंधानें व भाषेसंबंधीं घेववतील तेवढे श्रम घेतले आहेत, त्या कामीं रा. सखाराम गणेश मुजूमदार,

रा. केशवराव चिटणीस व माझा प्रियमित्र बाळकृष्ण बाबूराव फणसे ह्यांनीं मदत केली आहे. तरी ज्याप्रमाणें वीर आणि श्रृंगाररस एकेस्थळीं येणें कठीण, तद्वत् नीतितत्वें आणि श्रृंगार कठीण आहे, हें प्रत्यक्षानुभवावांचून कळणार नाहीं. तरी प्रियवाचक ज्याप्रमाणें मुद्याचे लेखकवाले कायद्यांत व तहनामें वगैरे मध्यें भाषेपेक्षां मुद्याच्या रचनेकडे जास्त लक्ष्य दिलें जातें, त्याप्रमाणें ह्यांत थोडक्यांत इबारतीच हेतू व मुद्याची गोष्ट न जाण्याकडे जास्त काळजी ध्यावी लागली. कारण ही कांहीं निबंध रचना नाहीं हें प्रिय व विद्वान् ध्यानीं आणितील, तरी भाषेसंबंधीं चूक किंवा नवीन फेर केला नाहीं.

हें पुस्तक मुख्यत्वें निबंधकार, भाषणकार, विद्यार्थी, शिक्षक, आणि संसारसुख इच्छिणारा करितां जास्त उपयुक्त होईल.

| | |
|---|---|
| बडोदें. | बाबाराव जयराम |
| ७—९—९४ | भिशे. |

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठांक. |
| --- | --- |
| गर्व | १ |
| मत्सर | २ |
| लोभ | ३ |
| भय किंवा धास्ती | ४ |
| संतोष | ५ |
| मोह | ६ |
| क्रोध | ७ |
| उद्योग | ९ |
| परोपकार | ११ |
| सत्यता | १३ |
| ऐक्य | १४ |
| व्यसन | १५ |
| क्षमा | १६ |
| दया | १७ |
| आशा | १८ |
| स्वदेशाभिमान | १९ |
| विद्या | २० |
| अभ्यास | २२ |
| सुधारणा | २३ |

विवेक .... .... .... .... २४
स्वामीभक्ति .... .... .... २५
स्वपरीक्षा .... .... .... .... २६
विश्वासघात .... .... .... २७
व्यवस्था .... .... .... .... २८
दर्द किंवा दुखणें .... .... .... २९
कृपणता .... .... .... .... ३०
व्यय .... .... .... .... ३१
औदार्य .... .... .... .... ३२
धैर्य .... .... .... .... ३३
सरळता .... .... .... .... ३४
दुःख .... .... .... .... ३५
स्वच्छता .... .... .... .... ३६
हत्या .... .... .... .... ३७
पाप .... .... .... .... ३८
पुण्य .... .... .... .... ३९
हर्ष .... .... .... .... ४०
धर्म .... .... .... .... ४०
विद्वान् .... .... .... .... ४१
मूर्ख .... .... .... .... ४५
देशाटन .... .... .... .... ४७
मनांत .... .... .... .... ५०
सज्जन .... .... .... .... ५१

दुर्जन .... .... .... .... ५२
भोजनाविषयीं (आदरस्य प्रत्यादरम्,) .... ५४
कृती, कृत्य .... .... .... .... ५६
जनांत .... .... .... .... ५८
समानपरतंत्रता .... .... .... ६०
परतंत्रता .... .... .... .... ६२
काळ–वेळ .... .... .... .... ६३
एकांत .... .... .... .... ६५
आप्तधर्म .... .... .... .... ६७
मित्रधर्म .... .... .... .... ६७
गुरुधर्म .... .... .... .... ६९
शिष्यधर्म .... .... .... .... ७०
भोजन .... .... .... .... ७१
गमन .... .... .... .... ७२
कुटुंबवर्तन .... .... .... .... ७४
नृपधर्म .... .... .... .... ७७
प्रजाधर्म .... .... .... .... ७९
गृहधर्म .... .... .... .... ८१
यौवनधर्म .... .... .... .... ८२
बाळधर्म .... .... .... .... ८४
नास्तिक आणि आस्तिक .... .... ८७
अस्तोदय .... .... .... .... ९०
स्त्रीधर्म .... .... .... .... ९३

सुशील स्त्रियांचीं लक्षणें .... .... .... ९५
पतिधर्म .... .... .... .... ९६
पिताधर्म .... .... .... .... ९८
बंधुधर्म .... .... .... .... १०१
पुत्रधर्म .... .... .... .... १०२
धनि आणि चाकर .... .... .... १०४
श्रीमंती .... .... .... .... १०६
गरीब .... .... .... .... १०७
गृहकार्यदक्षता .... .... .... १०८
विचार .... .... .... .... ११०
मानापमान .... .... .... .... १११
संगत .... .... .... .... ११२
सभास्थानीं कर्त्तव्य .... .... .... ११४
अपंग .... .... .... .... ११६
स्वभाव .... .... .... .... ११७
लहर .... .... .... .... ११९
परधर्म .... .... .... .... १२०
कान नाहीं पण सान .... .... .... १२१
प्रीति .... .... .... .... १२२
परगृहवास.... .... .... .... १२३
वपन .... .... .... .... १२४
गरज .... .... .... .... १२५
कंटाळा .... .... .... .... १२६
स्वदेश .... .... .... .... १२८

कर्ज .... .... .... .... १३०
यजमान आणि याचक .... .... .... १३१
मौन .... .... .... .... १३३
स्वदेशहिताचिंतक .... .... .... १३३
आत्मश्लाघ्यानिंदा .... .... .... १३६
स्वज्ञाति .... .... .... .... १३७
परदुःख .... .... .... .... १३९
स्वदेशकल्याण .... .... .... १४१
जीवितसाफल्य .... .... .... १४३
स्वदेशद्रोही .... .... .... १४५
गृहस्थाश्रम .... .... .... .... १४६
दान .... .... .... .... १४८
पुढें करूं .... .... .... .... १५१
परमेश्वर .... .... .... .... १५३
ध्यानांत ठेवा .... .... .... १५५
हिंदुस्थानांत सुस्थिति केव्हां प्राप्त होईल? .... १५६
कुटुंबगृह कोठें आहे? .... .... .... १५६
मनुष्य इह व देवलोक साध्य केव्हां करूं शकेल? १५६
दारू .... .... .... .... १५७
शंकराचार्यकृत उपदेशशतक .... .. १६०
बाबाराव जयराम मिशेकृत शतप्रश्नावलि ... १६५

# नितीज्ञानप्रभा.

## गर्व.

१ गर्व ह्या शद्बाचा अर्थ, आपल्या स्वतःविषयींच आपणास ज्ञान नसणें.

२ गर्व ह्मणजे, ज्ञानाचा तिरस्कार करण्याची इच्छा.

३ गर्व, हें चुकीचें बीज होय.

४ गर्वाची पहिली निशाणी; दुसऱ्यास हलकें समजणें.

५ गर्वाची दुसरी निशाणी, एकाद्याला ज्या गोष्टींत आपलें नुकसान आहे असें कळतें, त्यांतही तो आपला हेका सोडीत नाहीं.

६ गर्वानें परमेश्वराचा सुद्धां तिरस्कार होतो. तेव्हां गर्विष्टमनुष्यापेक्षां ह्या पृथ्वीवर अक्कलशून्य प्राणी कोणता ?

७ गर्वामुळें ज्ञान नाहींसें होऊन आपण तिरस्कारास पात्र होंतों.

८ गर्विष्टमनुष्याची त्याच्याहून थोरपदवीचे लोक बेपरवाई करितात, त्याच्या बरोबरीचे लोक त्याचा तिरस्कार करितात आणि त्याच्याहून हलके लोक त्याचा द्वेष करितात.

९ गर्वानें विद्या प्राप्त होत नाहीं.

१० गर्वानें आपलें कोणतेंहीं कार्य सिद्धीस जात नाहीं.

११ गर्व होणें ह्मणजे विनाशकाळची वेळ आली असें समजावें.

१२ गर्विष्ट मनुष्य ठोकरा खातो, पश्चात्ताप करितो, तरी हा कशाचा परिणाम आहे, हें एकतर तो समजूं शकत नाहीं आणि समजलाच तर, ह्याला काय उपाय करावा, हें त्याच्या लक्षांत येत नाहीं, आणि त्यास उपाय कोणी सांगितलाच तर

तो नुसता कबूलही करित नाहीं, कारण त्याला वाटतें कीं कबूल केल्यानें आपल्यास हलकेंपणा येईल, यामुळें परिणामीं वाईट रीतीनें त्याचा नाश होतो, तेव्हां गर्व न करणें हेंच बरें नव्हे काय ?

---

# मत्सर.

१ मत्सर ह्या शद्बाचा अर्थ, आपण न करितां दुसऱ्यानें केलेलें-हीं सहन न होणें.

२ मत्सरानें मनुष्य आपलाच नाश करितो.

३ मनांत मत्सर आल्यानें जिभेनें निंदा मात्र होते.

४ जिभेनें निंदा केल्यानें लोक आपल्याला अज्ञान समजात.

५ मत्सरानें आपल्या जिवाला मात्र त्रास होतो.

६ मत्सरापासून तिरस्कार, आणि तिरस्कारापासून द्वेष उत्पन्न होतो आणि द्वेशा पासून संताप होऊन अखेरीस पश्चात्ताप होतो.

७ मत्सरी पुरुषांपासून कोणतेंहीं काम निंदेशिवाय होत नाहीं.

८ मत्सरानें मन शुद्ध रहात नाहीं.

९ जो मनुष्य मत्सर करितो त्याला आपल्या स्वतःच्यानें कांहीं-काम होत नाहीं, ह्या बद्दल लाज वाटत नाहीं.

१० मत्सरीमनुष्याला सर्वच उलटें दिसतें.

११ मत्सरीमनुष्याला पराक्रमी, शत्रु वाटतो.

१२ मत्सरीमनुष्य दुसऱ्याची निंदा आपल्याहून हलक्या मनुष्या

जवळ करितो, ह्यामुळें त्याचा बोज न रहातां हलक्या मनुष्या कडून त्याचा वारंवार अपमान होतो.

---

## लोभ

१ लोभ ह्या शब्दाचा अर्थ स्वतःस पाहीजे, ह्या पेक्षां किंवा आपण योग्य रीतीनें मिळवूं शकूं त्यापेक्षां अधिक मिळविण्याची किंवा असण्याची इच्छा.

२ अशी अधिक मिळविण्याची इच्छा ह्मणजे लोभ; हा पार पाडण्याकरितां आपल्याला कोणता तरी वाईट मार्ग स्वीकारिला पाहिजे.

३ वाईटमार्ग स्वीकारिल्याखेरीज लोभ पार पडत नाहीं; आणि वाईट मार्गानें चालल्यानें आपण परमेश्वराचे अपराधी होतों.

४ लोभानें आपणास आपले मानपान सोडून द्यावे लागतात.

५ लोभानें आपला तिरस्कार होऊन बोज नाहींसा होतो.

६ ज्या लोभाकरितां आपण कुमार्ग पतकरितों, तो लोभ बहुतकरून पार पडत नाहीं.

७ लोभाने काळजी व पश्चात्ताप अवश्य उत्पन्न होतात.

८ लोभानें मनुष्याच्या अंगीं अन्नही लागत नाहीं.

९ लोभामुळें वाईट कृत्यांनीं मिळविलेल्या धनाचा कोणीही सुखोपभोग केला आहे, असें आजपर्यंतच्या इतिहासावरून आढळत नाहीं.

१० लोभ नकरावा ह्याचा अर्थ फाजील खर्च करावा, किंवा पैसा संग्रही न बाळगावा, अथवा आपल्या घरइस्टेटसंबंधीं, किंवा आपल्या फायद्यासंबंधीं निष्काळजी रहावें असा समजूं

नये. असें केल्यानें मात्र लोक आपली मूर्खांत गणना करितात.

११ लोभ ह्या शब्दाचा अर्थ आशा किंवा उमेद नाहीं. लोभ ह्मणजे वाईट रीतीनें मिळविण्याची इच्छा किंवा आपणास अशक्य तें मिळविण्याची वासना, त्यामुळें लोभ हा पार पडत नाहीं. आणि जर दुर्दैवानें पारपडलाच तर आपल्या मनांत जें लोभाचें फक्त बीज होतें त्याचें झाड झालें ह्यामुळें मनाला अगदीं स्वस्थता मिळत नाहीं, आणि स्वःस्थता नाहीं तेव्हां सुख कोठून? अर्थात् आपण जो लोभ पारपाडून मनाला सुख देण्याकारितां प्रयत्न करितअसतों, त्या पासून सुख मिळेल किंवा नाहीं ह्याबद्दल आपण विचार करित नाहीं, हा किती मूर्खपणा आहे?

---

# भय किंवा धास्ती.

१ भय म्हणजे मनाची अधीरता, आस्थिरता, किंवा नाहीमतपणा.

२ अप्रामाणिक म्हणजे अयोग्य कर्म करणाराचे पाठीमागें भय किंवा धास्तिही विनाशछत्र घेऊन उभीं असतात.

३ प्रामाणिक मनुष्य, मृत्यु अगर दुसऱ्या कोणत्याही धास्तींला भिंत नाहीं.

४ जो वांरवार धास्तीमध्यें गर्क होतो, त्याला विनाशाच्या जाळ्यामध्यें फसून पडण्यास उशीर लागत नाहीं.

५ व्यर्थ धास्तीनें किंवा वेहमी कल्पनांनीं आपल्या अंतःकर्णास दुःखांत गर्क करूं नका.

६ धास्तीला न भितां तिच्या निवारणार्थ उपाय योजीले पाहिजेत.

कारण एखाद्या डुकराच्या पाठीमागें पारधी लागले असले म्हणजे तो कुंपणांत किंवा फटींत आपलें डोकें भयानें खुपसून डोळे झांकून टाकितो. परंतु त्याचें अफाट शरीर बाहेर राहिल्यानें पारधी जास्त मेहनती शिवाय त्याचा नाश करूं शकतात.

७ धास्तीनें किंवा भयानें जें कांहीं खरें असेल तें करण्यास मागें सरूं नका. कारण असें केल्यानें तुह्मी आपला बचाव करण्यांत आपलें कर्तव्यकर्म बजाविलें नाहीं, असें होऊन तुमच्या कामांत तुह्माला पश्चात्तापासह निर्फळता मात्र प्राप्त होईल.

८ धास्तीनें मन मात्र घाबरून जातें.

९ धास्ती ही दुखणें आणण्यास कारण होते.

१० धास्ती ही कार्यामध्यें विघ्न आणिते.

११ धास्तीनें मनुष्याचें तेज नाहींसें होतें.

१२ धास्तीनें आपली योग्यता मनुष्य विसरून जातो.

१३ धास्तीनें मनुष्य दीन होऊन आपण आपल्या नाशास मात्र कारण होतो.

---

# संतोष

१ संतोष ह्या शब्दाचा अर्थ शक्य व योग्य यांतच तृप्त असणें.

२ संतोष ठेविल्यामुळें परमेश्वराची निंदा होत नाहीं.

३ संतोष हेंच स्वर्गसुख होय.

४ संतोषानें आपणास दास्यत्व येत नाहीं.

५ संतोषानें आपण आपला बोज राखूं शकतो.

६ संतोषाशिवाय मनुष्याला शांति मिळत नाहीं.

७ संतोष ठेवण्याचा मुख्य हेतु आपलें आयुष्य सुखांत जावें.

८ संतोष न राहण्याचें मुख्य कारण आपल्या स्वतांविषयीं उगाच मोठें मत बांधणें.

९ संतोष ठेवण्याचा मुख्य उपाय आपली खरी योग्यता काय आहे व आपली खरी स्थिति काय आहे, आणि योग्यतेपेक्षां आपली स्थिति किती बरी आहे, हें निरपेक्ष बुद्धीनें मनास विचारावें.

१० संतोष हा परमेश्वरानें सर्व ठिकाणीं ठेविला आहे. कोणतीही स्थिति ( कितीही वाईट ) असो त्यांत, कांहींतरी संतोष मानण्यास कारण असतेंच.

११ संतोष न ठेवणाराजवळ हमेश संताप आणि निंदा ह्याशिवाय कांहीं राहत नाहीं.

१२ संतोष न ठेवणारा मनुष्य दुसऱ्यास त्रासदायक होतो.

१३ सारांश जो मनुष्य संतोष ठेवित नाहीं, तो मोठा अभागी जाणावा. कारण तो दुःखी असतो व दुःखी तोच अभागी.

---

## मोह

१ मोह ह्मणजे खरें स्वरूप न कळणें किंवा भुलणें.

२ जेव्हां ज्ञानेंद्रिय नाहींसें होतें किंवा त्याचें चालूं शकत नाहीं तेव्हां मोह उत्पन्न होतो.

३ ज्याला मोह उत्पन्न झाला. त्याच्या सर्वांगाभोंवती शोक व्यापून राहतो.

४ मोहित मनुष्य आपण होऊन दास्यत्व कबूल करितो.

५ मोहित होणें ह्मणजे माया किंवा खोट्या प्रीतींत गर्क होणें.

६ ज्याच्या डोळ्यांत कावीळ ( कमळा ) असते, त्याला जसें सर्व पिंवळें दिसतें, तसें मोहित मनुष्याला सर्व कांहीं उलटें दिसतें.

७ मोहित मनुष्य मागचापुढचा विचार न करितां कर्म करितो. व पुढें पश्चात्ताप व दुःख पावतो.

८ मोहित मनुष्य आपला मान अपमान किंवा नफा तोटाही समजूं शकत नाहीं.

९ मोह ह्या सारखा दुसरा शत्रु नाहीं.

१० मोहित मनुष्य अखेरीस शोकांत नाश पावतो, व त्यामुळें तो आपल्या दुःखकारकमुशाफरींतून सुटतो.

---

## क्रोध

१ क्रोध ह्या शब्दाचा अर्थ, कारण नसतां रागावणें, ह्मणजे दुसऱ्याच्या गुन्ह्याबद्दल स्वतःस शिक्षा करून घेणें.

२ रागाला जर योग्य कारण असलें तर संताप आपोआप होतो. ह्मणजे त्याचें तोंड वाजत नाहीं.

३ क्रोध आणणें ह्मणजे आपल्या मूर्खपणाबद्दल दुसऱ्या जवळ सरटिफिकेट मागणें, असें कां बरें न ह्मणावें ? कारण क्रोधी स्वतःच्या मनाला देखील ताब्यांत ठेवूं शकत नाहीं, तेव्हां तो दुसऱ्याचे उपयोगीं पडेल कसा ? आणि स्वतःला तर तो उपयोगीं नाहीं, यास्तव तो मात्र दुसऱ्याला बोजारूप होय.

४ क्रोधानें अन्न अंगीं लागत नाहीं. चैन पडत नाहीं, आणि विकत दुखणें घेतल्या सारखें होतें.

५ क्रोध ही एक निर्बळतेची निशाणी आहे.

६ क्रोधाच्या पाठीमागें पश्चात्ताप अवश्य होतो.

७ क्रोध आला तर तो कोणच्या कारणानें आला, आणि तें कारण योग्य किंवा अयोग्य आहे, हें जर विचार करून पहाल तर तुह्माला कळून येईल कीं, क्रोध येण्या सारखीं कीती थोडीं कारणें आहेत.

८ क्रोधांत कांहीं काम करणें, हें, तुफानांत जहाज ढकलल्या सारखें आहे.

९ जसा पाण्यानें अग्नि शांत होतो तद्वत् नम्र वाणीनें दुसऱ्याचा क्रोध शांत होतो.

१० क्रोधाला सावरण्यापेक्षां तो येऊंच न देणें हा उत्तम मार्ग होय.

११ दुसऱ्यानें आपल्याला शिव्या दिल्या, किंवा वाईट शब्द बोलला तर आपण आपली तबीयेत घालवूंनये, कारण त्यांत मूर्खपणा आहे; परंतु तो पुन्हां असें न करील ह्याबद्दल उपाय योजावा व त्याला अपशब्द बोलण्यास आपल्या कडून कांहीं कारण होऊं देऊं नये.

१२ आपण ज्यावेळेस दुसऱ्याला क्रोधांत पाहतों, त्यावेळेस आपण त्याच्या अकलेबद्दल हासतो, परंतु आपल्याला ज्यावेळेस क्रोधानें वेष्टिलें असतें ( आपल्या मूर्खपणामुळें )त्यावेळेस आपल्या मनांत हा विचारही येत नाहीं कीं, लोक आपल्याला मूर्ख ह्मणत नसतील काय ?

———

# उद्योग.

१ उद्योग ह्मणजे मेहनत किंवा श्रम अथवा कष्ट.

२ उद्योग करण्यांत माणसानें गत दिवसांचा विचारही मनांत आणूं नये कीं, आपण ते दिवस वृथा घालविले. किंवा या पुढें करूं असाही मनांत ठराव करूंनये. कारण गत दिवसांचा आपण उपयोग करूं शकत नाहीं आणि पुढचे दिवस कसे येतील हें ही आपणास कळत नाहीं तेव्हां वर्तमानकाळचा जो आपल्यानें उपयोग होईल तो करावा हें उत्तम.

३ दूसऱ्या कलमांत 'पुढें करूं' असा ठराव मनांत करूं नये. ह्याचा अर्थ जें काम आतां होऊ शकतें तें भविष्यावर ठेवूं नये, कारण शेत करण्याचें मनांत आलें ह्मणजे तें त्याच्या ऋतू वर केलें पाहिजे. कारण वेळे शिवाय कार्य सिद्धीस जात नाहीं.

४ आळसा पासून सुटण्यास प्रथम प्रयत्न करावा आणि मग उद्योगास लागावें.

५ स्तुत्य उद्योगांत जितके वेळ आपण निराश होऊं तितकें तो उद्योग पार पडण्यास आपण जास्त योग्य होऊं.

६ कोणत्याही उद्योगास आपण ज्या वेळीं निराश होऊं त्या वेळेस तो उद्योग पार न पाडण्यास आपली कोणती चूक कारण झाली हें आपणांस कळतें. तेव्हां पुनरपी उद्योग करणें हाच आपला शिक्षक कां न ह्मणावा ?

७ उद्योगा शिवाय तंगी, दुःख, कंटाळा, शरम, काळजी ही जात नाहींत.

८ उद्योगा वांचून लाभ, कीर्ति, आनंद, सुख, आबादी, हीं प्राप्त होत नाहींत.

९ विचार करा, द्रव्य मिळविलेला, दरज्याला चढलेला, अब्रुला पावलेला, स्तुतीस योग्य झालेला, राज्यद्वारीं काम करणारा, मोक्षाला पोहोंचलेला ह्यांत कोणत्याही उद्योगी पुरुषा शिवाय कोणाचाही प्रवेश झाला आहे काय?

१० जो सकाळ पासून सांयकाळ पर्यंत उद्योग करितो, तो रात्रीं सुखानें निजतो, व जो लहानपणीं विद्याउद्योगानें पारपडतो तो तारुण्यांत त्याचें फळ पावतो. व जो तारुण्यांत कष्ट करून द्रव्य संग्रह करितो तो वृद्धापकाळी सुख पावतो त्या मुळें त्याला पश्चात्ताप होत नाहीं.

११ उद्योगहीन मनुष्य स्वतःलाच बोजा होतो, कारण उद्योग नसल्यानें भलतेच तरंग आणि कल्पना मनांत येऊन जें कांहीं काम करावयाचें तेंहीं त्याला सुचत नाहीं, व तो उगाच परमेश्वराला व अन्य मनुष्यांला दोष देतो.

१२ उद्योगहीन मनुष्य आंबा खाण्यास इच्छितो, परंतु आंब्याचा देंठ काढूं शकत नाहीं ( मेहनतीला कंटाळल्या मुळें, ) व तो वृथानशीबावर दोष देतो.

१३ उद्योगहीन मनुष्याला काम किंवा मेहनत नसल्यानें त्याला वारंवार दुखणी होतात, त्याला कामकरण्याची इच्छा होते, परंतु त्याच्या गती आणि चेतना रहात नाहीं, त्याचें मन अंधारांत राहतें. त्याचे विचार सुदृढ नसतात त्यामुळें ते नेहेमीं डळमळीत असतात, तो विद्वान होण्यास इच्छितो, परंतु त्याच्यानें

मेहनत होत नाहीं. आणि त्याचा शरम, लज्जा, संताप, दुःख शोक, दारिद्र्यावस्था ह्यांत शेवट होतो.

---

# परोपकार.

१ परोपकार म्हणजे दुसऱ्यावर उपकार करणें किंवा दुसऱ्यास मदत करणें.

२ उपकाराचा अर्थ अशक्तांचें रक्षण करून आपली फर्ज आदा करणें होय.

३ मनुष्याला एक मेकाच्या साह्या (उपकारा) वांचून चालत नाहीं.

४ पशुपक्षी व मनुष्य ह्यांचें काम म्हणजे मेहनत सारखीच आहे. परंतु मनुष्याचें जास्ती हेंच कीं, त्याच्या कामांत कांहीं तरी परोपकार असतो.

५ उपकार हा श्रीमंतांनींच करावा असें नाहीं. कारण गरीबही आपल्या शक्ती प्रमाणें दुसऱ्यास मदत करू शकतो.

६ ज्यावर आपण उपकार करितों त्या विषयीं एकंदर त्याच्या मनांत आपल्याबद्दल पुज्य बुद्धिउत्पन्न होते.

७ जितका आपण परोपकार करितों तितकें आपणांस साह्य किंवा प्रत्युपकार करितों असें होत नाहीं काय ? कारण जितक्या मनुष्यांवर आपण उपकार करितों तितकीं मनुष्यें ( कृतघ्न शिवाय करून) आपल्याला साह्य किंवा प्रत्युपकार करण्यास वेळेवर तयार होत नाहींत काय ?

८ उपकारी मनुष्याचें एक तर अंतःकरण शांत व सुखी असतें.

९ दुसऱ्यांच्या दुःखानें ज्याचें अंतःकरण कळवळतें, त्याच्या हातून खरा उपकार होतो.

१० दुसऱ्याच्या भयानें, शरमेमुळें, किंवा नांवलौकिक मिळविण्याच्या हेतूनें जो उपकार करितो तो, खरोखर उपकारी ह्या मानाला योग्य होत नाहीं. परंतु दगडा पेक्षां ईट मऊ ह्या न्यायानें निर्लज्ज किंवा अपकारी मनुष्या पेक्षां बरें.

११ उपकार करणें तो पात्र पाहून करावा; कारण कृतघ्नी, चोर, लबाड मनुष्यांवर उपकार करूं नये. कारण असें केल्यानें एक तर त्यांचें कामांत त्यांना मदत केल्याप्रमाणें होतें. दुसरें त्यांच्या कडून उपकाराच्या बदल्यांत अपकारा शिवाय कांहीं प्राप्त होत नाहीं, तर असें केल्यानें एक तर सार्वजनिक नुकसान व दुसरें आपलें स्वतःचें नुकसान होतें.

१२ उपकारावर प्रतिउपकार करणारास प्रज्ञ किंवा व्यवहारज्ञानी ह्मणतात; परंतु अपकारावर उपकार करणारास सर्वतः ज्ञानी ह्मटले पाहिजे कारण ते उभयपक्षांस सुखकर आहे

१३ अपकारीस उपकार करून त्यालाच पश्चात्तापाची शिक्षा केल्यानें पुनः आपणास साह्य होण्यास आपण एक आधार उत्पन्न केला असें होतें.

१४ अपकारीस उपकार केल्यानें एक तर ओशाळपणाची त्याला शिक्षा होते त्यामुळें तो सुधारतो व दुसरे शरमेनें आपल्या बद्दल त्याच्या मनांत पुज्यबुद्धि उत्पन्न होते. सारांश ह्यानें दोन्ही साधतात.

# सत्यता.

१ सत्यता म्हणजे खरें किंवा वाजवीपणा.

२ सत्यतेवर जगाचीं सर्व कामें अवलंबून असतात.

३ सत्यतेनें सर्व धर्म साधतात.

४ धनवान किंवा सत्ताधारी मनुष्यापेक्षां लोक सत्य पाळणाऱ्या मनुष्यावर जास्त प्रीति व विश्वास ठेवितात.

५ सत्यता ठेवणाऱ्या किंवा खरें बोलणाऱ्या. मनुष्याला लोभ, भय आणि अयोग्य शरम ह्या तीन गोष्टीला जुमानतां उपयोगीं नाहीं.

६ प्रामाणीक मनुष्याच्या हातून पाप घडत नाहीं. कारण ढोंग किंवा लुच्चेगीरी ह्या पासून त्याची सत्यता त्याचे रक्षण करते.

७ प्रामाणिक मनुष्याचा ढोंगी व लुच्चे लोक छळ करितात. कारण त्यांच्या कामांत हा एक आडकाठी आणितो.

८ न्यायी व धर्मानें वागणारे लोक प्रामाणीक माणसावर प्रीति करतात.

९ प्रामाणीक मनुष्याला ढोंगी व लुच्चे लोकांपासून संकटें फार भोगावीं लागतात. परंतु ते त्यांचा नाश करूं इच्छित नाहींत.

१० अप्रमाणिक लोक थोडा काळ सुख पावतात, परंतु त्यांचा अखेरीस वाईट रीतीनें नाश होतो.

११ जो मनुष्य प्रामाणीकपणा सोडतो तो सर्व गुन्ह्यां बद्दल अपराधी आहे; कारण कोणतेंही पापकर्म करतांना त्याच्या मनाला हरकत किंवा धोका लागत नाहीं.

१२ जितकें आपण अप्रमाणीक पणानें वागतों तितकें आपण आपल्यावर जास्त संकट ओढून घेतों. कारण हल्लीं स्टांपाचा खर्च

आपल्याच अप्रमाणिकपणामुळें आपणावर पडला नाहीं काय ? विचार करा कीं, अप्रामाणीक मनुष्याला प्रामाणीक मनुष्यापेक्षां किती व्याज ज्यास्त पडतें, किंवा त्याच्या कामांत किती अडचण व त्रास पडतो.

१३ प्रामाणीकपणानें एकतर आपल्या हातून खर्च जास्त होत नाहीं. (आपलें अंथरूण पाहून आपल्याला खर्च करण्याचें ज्ञान होतें) ह्यामुळें आपण कर्ज बाजारी न होतां काळजीपासून मुक्त राहोतो.

---

## ऐक्य.

१ ऐक्य ह्या शद्बाचा अर्थ संप, जूट, किंवा एक विचार असणें.

२ एकोप्यानें राहील्यानें सुख मिळतें, भय उत्पन्न होत नाहीं, दुसऱ्याचें ओशाळे रहावें लागत नाहीं, कोणाचें दास्यत्व करावें लागत नाहीं, स्वतंत्रता नष्ट होत नाहीं, कोणी आपला अपमान करूं शकत नाहीं, व कोणी आपल्या विषयीं मनांत हलका विचार आणूं शकत नाहीं.

३ एकोप्यानें महत्कार्यें निर्विघ्न पणें पार पडतात.

४ एकोपा हाच जयाचा मूळ शकून आहे.

५ एक विचारानें आरंभिलेलें काम पार पड़ण्यास उशीर लागत नाहीं.

६ एकोप्यानें शत्रू हतवीर्य होतो.

७ चांगल्या कामांत एकी करण्या विषयीं विलंब लावूं नये.

८ कोणत्याही चांगल्या कामांत ज्या मनुष्याशीं आपला एक

विचार असेल तर बेलाशक आपण त्या कामांत मदत क-
रावी, त्याचा आपला मगाचा पुढचा संबंध मनांत आणूं नये.

९ सार्वजनिक एकीच्या कामांत खासगी संबंध आड आणून तें काम सिद्धीस जावूं न देणें ह्मणजे देशद्रोह करण्याची अपेक्षा करणें होय.

१० सार्वजनिक एकीच्या कामांत कोणत्या ही मनुष्याच्या उत्कर्षाची ईर्षा करून त्याचें वजन कमी करण्या करितां किंवा त्याची मान हानी करण्याच्या हेतूनें सार्वजनिक हितकर कामांच्या आड येणें ह्या सारखी दुसरी अज्ञानता नाहीं.

११ ऐक्य करण्यांत गर्व, ईर्षा, द्वेश, हे काढिले पाहिजेत.

१२ एकी शिवाय कोणताही सुधारा होत नाहीं.

१३ एकी न करणें किंवा न होणें हें दास्यत्वाचें कारण आहे. तेव्हां एकी करणें किंवा न करणें हे वाचकाच्या समजुतीवर अवलंबून आहे.

---

# व्यसन.

१ व्यसन ह्मणजे कोणतीही गोष्ट करण्याची, किंवा कोणतीही नीशेची वस्तू अमुक वेळेस खाण्याची अगर पिण्याची संवय.

२ व्यसनी होणें किंवा व्यसनांत पडणें ह्मणजे दास होणें किंवा दास्यत्व कबूलकरणें.

३ चैनबाजी ह्मणजे फाजील शोक ह्या पासून व्यसन उत्पन्न होतें.

४ व्यसन करणारा मनुष्य स्वतः पराधीन होतो.

५ व्यसनीमनुष्य आळसी, त्रासीक, बुद्धिहीन, पोकळडौली

चैनी कामाधीन, निर्बळ, क्रोधी संतापी व आपली चूक नाकबूल करणारा दुसऱ्याला हलकें मानणारा असा असतो मतलब हें त्याचें मुख्य लक्षण होय.

६ व्यसनी मनुष्य मनांत दुसऱ्यावर उगाच संतापतो व आपल्या कर्माबद्दल पश्चात्ताप त्याचा मनांत उत्पन्न होतो. आपल्या व्यसनामुळें आपलें किती नुकसान झाले हें त्याच्या मनांत एखादे वेळेस येतें त्यावेळेस मात्र त्यास वाईट वाटतें; परंतु तें तो बाहेर दाखवीत नाहीं उलट व्यसनांमध्यें काय काय फायदे आहेत ते तो मोठ्या उत्कंठेनें सांगतो. व आपल्या गोठांत दुसऱ्याला ओढण्याचा प्रयत्न करितो. यास्तव सर्वांनें सावध राहावें व जें त्यांच्या सपाट्यांत सांपडलें असतील त्यांनीं आपली आहुती दुःखडोहांत पडणार आहे असें समजून आपली तावडतोब सुटका करून घ्यावी.

७ ज्ञानी पुरुषाचें व्यसन विद्या, कीर्ति, दान, परोपकार हें होत.

---

## क्षमा.

१ क्षमा ह्मणजे दैवयोगानें, झालेला अपराध माफ करणें.

२ क्षमा ही उदार मनुष्या खेरीज दुसऱ्याजवळ सांपडेल काय?

३ क्षमेनें शत्रुभाव नाहींसा होतो.

४ क्षमा ही आपण ज्या मनुष्यास केली त्याच्याकडून आपला दुसरा अपराध बहूत करून घडत नाहीं.

५ क्षमेनें आपल्या विषयीं दुसऱ्याच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न होतो.

६ क्षमा जर आपण दुसऱ्यास न केली, तर आपण क्षमेस पात्र होऊं काय?

७ आपल्याच्यानें दुसऱ्यास यत्‌किंचित कामांत क्षमा करवत नाहीं, तर परमेश्वरास काय ह्मणून प्रार्थना करावी?

८ सर्व शिक्षेंत जबरदस्त शिक्षा क्षमा होय. ( पण योग्य पात्रास. )

९ मुद्दाम अपराध करणाऱ्यास क्षमा योग्य नाहीं.

१० बुद्धिपूर्वक अपराध करणाऱ्यास क्षमा करणें हें आपल्या व त्याच्या नाशास कारण होय.

११ अपराध करणाऱ्यास शिक्षा करणें ती त्याच्यावर वैर घेण्यास करित नाहींत; परंतु पुनः अपराध होऊं नये हा हेतु आहे, तर सारासार विचार करून त्यांत क्षमेचा भाग जितका जाईल तितका घालावा.

१२ क्षमा केल्यानें पश्चात्ताप न होतां अखेरीस आनंदच होईल.

१३ हुकमती पेक्षां क्षमेचा दरारा वजनशीर व टिकाऊ असतो.

---

## दया.

१ दया ह्या शद्बाचा अर्थ निर्बळास मदत करणें.

२ दया अयोग्य ठिकाणीं वापरूं नये.

३ दयेशिवाय मनुष्याचें चालणार नाहीं.

४ दया हें धर्माचें बीज आहे.

५ दयेशिवाय दान होत नाहीं.

६ अनाथाची दाद दयेशिवाय दुसरा कोणी घेणार आहे काय?

७ दया मनुष्याच्या मनांतून नाहींशी झाल्यावर बाकी घातकीपणा आणि जुलमाशिवाय कायराहील?

८ भयानें दुसऱ्याला दुःख न देणारापेक्षां दयेनें दुसऱ्याला न दुःखविणारा श्रेष्ट होय.

९ गुप्त घातकी कामाला अटकवणार दयेशिवाय कोण आहे?

१० दया ही अनाथासाठीं परमेश्वरानें उत्पन्न केली आहे, व तिचा उपयोग अनाथाला योग्यरीतीनें द्यावा, अनाथाची गणना बहुतकरून खालीं लिहील्याप्रमाणें आहे. बाप नसलेला लहान मुलगा, विधवा, रोगी, व्यंग, दुसऱ्याच्या कारस्थानांनीं संकटांत आलेला, किंवा दैवयोगानें ज्याच्या स्थितींत फरक पडलेला मूर्ख.

११ मूर्खावर दया करणें ह्मणजे त्याला सुधारण्याचा उपाय करणें.

---

# आशा.

१ आशा ह्या शब्दाचा अर्थ उमेद किंवा कांहीं अंशी खात्री असा होतो.

२ सूज्ञ मनुष्य शक्य व चांगल्या कामांतच आशा करितात. कारण तें कार्य आपल्या हातून पार पडून त्यापासून आपणास सुखहोईल किंवा नाहीं ह्याचा ते आगोदर विचार करितात.

३ आशा सोडिल्यानें आपण कोणतेंहीं कार्य सिद्धीस नेऊं शकत नाहीं.

४ कोणत्याही कामांत आपणास त्रास वाटल्यावरून आपण आशा सोडली तर मात्र आपली नाउमेद आणि अधैर्यता दृष्टोत्पत्तीस येते; परंतु जर आपण काळजी पूर्वक त्या कामाच्या पाठीमागें लागलों, तर सर्व अडचणींचें आपण निवारण करून कीर्तीस चढतों.

५ आपल्या मनांत ज्या ज्या इच्छा उत्पन्न होतील, त्या त्या विवेकबुद्धीनें प्रथम तपासून पहाव्या; आणि ज्या ज्या इच्छा आपणास अशक्य किंवा अयोग्य वाटतील त्या त्या ताबडतोब सोडून घ्याव्या. असें केल्यानें आपण आपल्या कामांत साफल्य अवश्य पावूं.

---

# स्वदेशाभिमान.

१ स्वदेशाभिमान ह्मणजे स्वतःचें वंशाचें, व स्वज्ञातीचें आणि स्वदेशाचें कल्याण होण्याचा मार्ग ज्या देशाच्या कल्याणावर आहे, त्या देशाच्या हिताविषयीं अभिमान असणें.

२ ज्या देशांत स्वदेशाभिमानी पुरुष उत्पन्न होतात त्याच देशाचा उत्कर्ष होतो.

३ स्वदेशाभिमानाला अशक्य व अयोग्य स्वकल्याणाची (ह्मणजे खरें पहाल तर स्वकुळाचा क्षय करण्याचे बुद्धीची इच्छा हाच मोठा अडथळा आहे.

४ स्वदेशाभिमानी पुरुषांचा मुख्य हेतु आपल्या देशावर उपकार करण्याचा होय.

५ स्वदेशाचें कल्याण हेंच आपल्या सुखास कारण आहे.

६ स्वदेशाभिमानी हा मान, तन, मन, धन, आणि बुद्धीनें खपणाराशिवाय दुसऱ्याला मिळत नाहीं.

७ धार्मिक मनुष्य आपल्या उदार धर्मकृत्यांनीं कित्येक लोकांना कांहीं दिवस सुख देतो. परंतु स्वदेशाभिमानी आपल्या पाठीमागेंही स्वदेशाला सुख ठेऊन जातो.

८ स्वदेशाभिमानी पुरुषानें ध्यानात ठेवावें कीं, आपल्या देशाचें कल्याण होण्याची इच्छा असावी, परंतु त्या बरोबर दुसऱ्याचें वाईट करण्याची किंवा दुसऱ्यास दास्यत्वास आणण्याची इच्छा नसावी.

९ स्वदेशाभिमानी मनुष्य लोभानें लालचत नाहीं, भयानें भीत नाहीं, धास्तीनें हटत नाहीं, निराशेनें कंटाळत नाहीं, मेहनतीला त्रासत नाहीं, आळसा पासून दूर रहातो, आपसांतल्या भांडणासाठीं तिसऱ्या जवळ न्याय मागण्यास जात नाहीं, येवढीं लक्षणें ज्यांत असतील त्याच्या हातून खरोखर देशकल्याणाचे काम पार पडेल.

१० स्वदेश कल्याण न इच्छिणारा मनुष्य राजद्रोहा पेक्षां जास्त गुन्ह्यास पात्र आहे, कारण राजद्रोह करणारा मनुष्य एका मनुष्याचा किंवा कांहीं मंडळीचा द्वेश करणारा होय; परंतु देशद्रोह करणारा त्या मंडळी पेक्षां हजारों किंवा लाखों पट मनुष्याचा द्रोह करणारा नव्हेकाय ?

---

# विद्या.

१ विद्या ह्मणजे जाणणें किंवा ज्ञान करून घेणें.

२ विद्या मनुष्यानें अवश्य संपादन करावी.

३ विद्ये विषयीं अभिमान धरूं नये.

४ विद्वानाची खूण नम्रता आहे.

५ वाचणे व लिहीणें हें दुसऱ्या मनुष्याच्या मनांतील उद्देश खूणांनीं समजण्याची किंवा समजावण्याची विद्या होय.

६ विद्या ही उद्योग किंवा श्रमाशिवाय प्राप्त होत नाहीं.

७ विद्या न होण्यास मुख्य कारण आळस किंवा कंटाळा आहे.

८ विद्येशिवाय मनुष्य आपल्याला ही ओळखूं शकत नाहीं.

९ विद्वानमनुष्याची योग्यता धनवाना पेक्षां जास्त कां न मानावी बरें? कारण एक तर धनवानाची दौलत त्याच्या खुशीशिवाय दुसरा घेऊं शकतो, परंतु विद्वानाचें विद्याधन त्याच्या खुशी शिवाय कोणी घेऊं शकेल काय? धनवान् आपल्या आश्रित व खुशामती लोकांपासून मान पावतो; परंतु विद्वान सर्व देशांत मान पावतो, धनवान् आपल्या धनानें कोणाला कांहीं काळ पर्यंत सुख देतो; परंतु विद्वान ज्याला आपली विद्या देतो त्याला जन्माचा सुखी करतो. धनवानाला दुसऱ्याचें कल्याण करण्यास आपल्या द्रव्याची हानी सोसावी लागतें, परंतु विद्वानाला दुसऱ्याचें कल्याण करण्यांत आपल्या विद्येची वृद्धि होतें, यास्तव धनवानापेक्षां विद्वानाच्या हातून दुसऱ्याचें कल्याण वारंवार होतें ह्या करणांनीं धनवानापेक्षां विद्वानाचा देशाला जास्त उपयोग होतो.

१० धनवान् दैवयोगानें होऊं शकतो परंतु विद्वान उद्योगावांचून होऊं शकत नाहीं.

११ धनवानाला लोक वारंवार फसवितात परंतु विद्वानाला तसें होत नाहीं.

१२ धनवान् आपलें काम स्वतंत्रपणें करूं शकत नाहीं, परंतु विद्वान तें करूं शकतो.

१३ धनवान् आपली चूक कबूल न करितां दुसऱ्याचा दोष काढतो ( बहुत करून ), पण विद्वान दुसऱ्याची चूक पाहून आपण सुधारतो.

१४ विद्या शिकते वेळेस कंटाळा, त्रास, व दुःख होतें, परंतु ती प्राप्त झाल्या वर त्यांच्या पेक्षां सहस्त्रपट आनंद होतो.

१५ विद्येची इच्छा करणें परंतु ती प्राप्त होण्यास श्रम न करणें हें अविद्वानाचे पहीलें लक्षण होय.

१६ विद्या ही जातीवर किंवा रूपावर भुलणारी नाहीं. कारण नजर करा. एक कावळ्याचा माळा त्यानें तृणाचा केला आहे परंतु कितीही तुफान झालें तर झाड पडतें परंतु तो त्या पासून निराळा होत नाहीं, किंवा त्यांत पवन अथवा पाणी शिरूं शकत नाहीं; आणि मोठमोठाले इंजिनीयर राक्षसी कदाच्या दगडाच्या ज्या इमारती बांधतात त्या पृथ्वी कायम असतांही पडतात तेव्हां विद्येचा अभिमान चालेल काय ?

१७ विद्या ही कुरूपाला रूप देते, मूर्खाला ज्ञान आणते, धनवानाला सन्मानास योग्य करते, दरिद्र्याला धन किंवा सुख देते; तर विद्या प्राप्त करून घेण्याला साधन असतां जो आळस करितो त्याला काय ह्मणावें ?

---

# अभ्यास

१ अभ्यास ह्मणजे ह्मावरा किंवा संवय याचा अर्थ आळस किंवा कंटाळा यांस हटविण्याचा उपाय.

२ अभ्यासाशिवाय विद्या प्राप्त होत नाहीं.

३ अभ्यास हळूहळू वाढविल्यानें वाढतो.

४ आळस हा अभ्यासाचा मोठा शत्रु आहे.

५ अभ्यासाशिवाय कोणी कांहीं काम करावयास लागला तर त्याला तें न साधतां उलटा तो त्या वेळेस घाबरतो.

७ अभ्यास ही शरीराला कसरत आहे.

---

# सुधारणा.

१ सुधारणा म्हणजे आपला नाश होण्यास जीं जीं कारणें असतात त्यांचा ( दुष्ट मनोविकार व त्यांपासून पडलेली चाल ) नाश करण्याविषयीं उपाय करणें.

२ सुधारणा ही परमेश्वरानें मनुष्याकरीतां निर्माण केली आहे. कारण मनुष्य मात्र चूकीस पात्र आहे.

३ सुधारणेमध्यें आपल्या स्वभावांत कोण कोणते श्लेष आहेत ते शोधणें व ते सुधारण्याची योजना कारणें, हीच खरी सुधारणा होय.

४ दुसरें आपल्या स्वभावामुळें आपल्या रीतींत किंवा रिवाजांत जे दोष आपणास वाटतात ते शोधून काढावें आणि त्या खा-

मीमुळें आपलें काय नुकसान होतें किंवा होईल तेंही शोधावें. मग विवेकानें त्या खाम्या सुधारण्याविषयीं धिमेपणानें व विचारानें योजना करावी.

५ दुसऱ्यानें सांगितल्यावरून किंवा शरमेनें आपल्या रीतीभातींत सुधारणेच्या परिणामाचा विचार केल्याशिवाय फरक किंवा बदल करूं नये.

६ परंतु आपल्या स्वतःच्या ज्या खोडी किंवा चुका आपणास वाटतील, किंवा दुसरा कोणी सुचवील तर त्याजवर मनन करून त्या ताबडतोब सुधारण्याची योजना करावी.

७ जी जी सुधारणा आपण करूं त्यापासून आपणास तोटा, दुःख, हीनत्व येईल किंवा आपल्या स्वतंत्रतेस अगर अब्रूस धक्का बसेल असें मात्र होऊ नये.

८ सुधारणा मनुष्यानें अवश्य करण्याचा प्रयत्न करावा. कारण आपली बुद्धि व चालचलणूक ह्यांत सुधारणा झाल्याशिवाय आपली योग्यता वाढत नाहीं.

---

# विवेक.

१ विवेक ह्मणजे मर्यादा ह्या दोन शब्दाचा अर्थ आपल्या व दुसऱ्याच्या योग्यतेची सचोटीनें परीक्षा करणें व त्याप्रमाणें दुसऱ्याशीं वर्तणें.

२ अविवेकी मनुष्य अज्ञान आहे. कारण तो एक आपल्यालाही ओळखल्याशिवाय आपल्याविषयीं मोठें मत बांधितो.

३ अविवेकी मनुष्य दुसऱ्याला प्रिय वाटत नाहीं.

४ दुसऱ्याला प्रिय न वाटल्यानें त्याच्या कामांत कोणाचीही मदत मिळत नाहीं.

५ अविवेकी मनुष्यास कोणाची मदत न मिळाल्यानें त्याचें कार्यसिद्धीस जात नाहीं.

६ अविवेकी मनुष्याचें कार्य सिद्धीस न गेल्यानें तो उगाच दुसऱ्यावर रागावतो. ह्यामुळें तो एकतर क्रोधाच्या स्वाधीन होतो. आणि दुसरें विकत शत्रुत्व प्राप्तकरून घेतो.

७ अविवेकी मनुष्याचा बोज किंवा वजन पडत नाहीं, ह्यामुळें तो मनांत चीडून ईर्षेनें दुसऱ्याची निंदा करितो ह्याचा परिणाम तो जास्त हलका पडतो.

८ आपली व दुसऱ्याच्या योग्यतेची खरी परीक्षा न होण्यास गर्व किंवा मिथ्याभिमान हे अडथळे आहेत.

९ अविवेकानें निंदा, क्रोध, ईर्षा, संताप, हलकेपणा, व निर्फळता मात्र प्राप्त होते.

---

# स्वामिभक्ति.

१ स्वामिभक्ति ह्मणजे आपले यजमान, धनी किंवा राजा ज्याची आपण चाकरी पतकरली आहे, त्याचें हित इच्छिण ह्मणजे त्याशीं बेईमान न होणें.

२ स्वाभिक्ति ह्या सारिखें दुसरें कठीण नाहीं. कारण एकतर

आपण चाकर ह्मणजे दास. दुसरें स्वामिभक्तीकरितां आपणास सर्व धर्म टाकले पाहिजेत.

३ स्वाभिक्तीसाठीं आपण आपला मोठेपणा सोडिला पाहिजे.

४ स्वामिद्रोह ह्मणजे घात किंवा शुद्ध दगलबाजी होय. कारण आपल्यावरच्या विश्वासाचा आपपण वाईट रीतीने उपयोग केल्याशिवाय द्रोह होत नाहीं.

५ स्वामीचें कल्याण तेंच आपले कल्याण समजलें पाहिजे.

---

## स्वपरीक्षा.

१ स्वपरीक्षा ह्मणजे आत्मज्ञान. ह्याचा अर्थ आपली योग्यता, स्थिति, परिणाम व उपाय हें समजणें.

२ स्वपरीक्षा ही विवेकानें सचोटीनें केली पाहिजे.

३ स्वपरीक्षेशिवाय आपल्यामध्यें काय अवगुण आहेत ते कळत नाहींत.

४ जो स्वपरीक्षा करूं शकत नाहीं, तो दुसऱ्याची परीक्षा करण्यास नालायक आहे.

५ स्वपरक्षिमुळें आपली योग्यता कळून येते, म्हणजे त्याप्रमाणें वर्तण्यास ठीक पडतें.

६ स्वपरीक्षेमुळें आपल्याा ज्या ज्या चुका उघडकीस येतील, त्या त्या सुधारण्यास मजबूत कांहीं तरी ठराव करून ( योग्य वाटेल ) त्याप्रमाणें वागलें पाहिजे.

७ स्वपरीक्षेनें अभिमान किंवा गर्व आपोआप नाहींसा होतो.

८ स्वपरीक्षेनें मनुष्याचें मन अंधारांतून म्हणजे गुचवणींतून उजेडांत येते.

---

# विश्वासघात.

१ विश्वासघात म्हणजे कोणाला भरंवसा किंवा विश्वास देऊन फसविणें.

२ विश्वासघातासारिखें दुसरें घोर कर्म नाहीं. मांगापेक्षांही विश्वासघातकी फार वाईट आहेत. चोरापेक्षांही विश्वासघातकी दुर्जन होय. कारण मांग उघड कर्म करणारा आहे. चोर आपल्या गाफिलीचा उपयोग करतो परंतु विश्वासघातकी आपणास गाफिलींत टाकून त्याचा लाभ घेतो, व सुजनामध्यें आपली गणना करविण्यास प्रयत्न करितो.

३ विश्वासघातानें आपली अब्रू, वजन किंवा भरंवसा रहात नाहीं.

४ एक विश्वासघातकी सर्व देशाला दुःखांत टाकण्याला कारण होतो.

५ देशाची किंवा कुळाची नाश होण्याची वेळ आली म्हणजे घातकी पुरूष उत्पन्न होतात, व त्यांचे हातीं सत्ता येते.

६ घातकी पुरूष आपण अपयशांत मरून जातो; परंतु आपल्या कुळाला व देशाला पश्चात्तापासहीत कष्टांत व शरमेंत दुसरा लौकिकवान पुरूष उत्पन्न होईपर्यंत ठेवून जातो.

७ घातकी मनुष्य आपल्या कुटुंबापासूनही मान किंवा प्रीति मिळवूं शकत नाहीं, ह्यामुळें त्याला संताप व शोक उत्पन्न होतो.

८ घातकी पुरूषाला कुऱ्हाडीच्या दांड्याची उपमा देतात, पण कुऱ्हाडीचा दांडा दुसऱ्याच्या कारणानें गोतास काळ होतो; परंतु घातकी पुरूष आपणच होऊन आपल्या कुळास, जातीस किंवा देशास घातकी होतो! तेव्हां जड जो कुऱ्हाडीचा दांडा त्याच्यापेक्षांही हा नीच नाहीं काय?

९ विश्वासघातकी सर्पापेक्षां वाईट नव्हे काय? कारण सर्प एकच मनुष्याचा नाश करितो, दुर्जन ह्मणजे विश्वासघातकी बुद्धिपूर्वक सर्व देशाचा नाश करावयास भीत नाहीं.

१० घातकी ह्मणविण्यापेक्षां निर्धन ह्मणविणें फार बरें, किंवा बुद्धिहीन पदवी फार चांगली आहे. कारण बुद्धीचा किंवा धनाचा वाईट उपयोग केल्याचा दोष येत नाहीं.

---

# व्यवस्था.

१ व्यवस्था म्हणजे कोणत्याही कामाचा किंवा खर्चाचा ( नियमितपणा ) ठेवणें.

२ व्यवस्थेशिवाय कोणतें हीं काम कसें होईल? कारण, त्या कामाचा परिणाम काय, व तें आपण करूं शकूं किंवा कसें, व करूं शकूं तर कशा रीतीनें, आणि तें करण्यांत कोणकोणत्या अडचणी येतील,व आपण त्या कशारीतीनें निवारण करूं शकूं ह्या सर्वांचा मनांत विचार करून मग त्याची व्यवस्था लाविल्याशिवाय कामांत साफल्यता मिळणार नाहीं.

३ व्यवस्थेशिवाय मन गोंधळून जातें.

४ कामाच्या व्यवस्थेनें मेहनतीचा व वेळेचा बचाव होतो.

५ खर्चाच्या व्यवस्थेनें यश येऊन खर्चाचा बचाव होतो.

६ व्यवस्थेनें आपणांस त्या कामाचें किंवा खर्चाचें अगोदर ज्ञान होतें, यामुळें आपलें मन अंधारांत राहून ठोकरा खात नाहीं किंवा पश्चात्ताप पावत नाहीं.

७ व्यवस्थेनें पुष्कळ कामें करण्यास आपण शक्तिमान होतो. आणि आपल्या मनाची स्थीरता व शांतता राहते. संसारिक आबादी वाढते व आपल्याला ज्ञान संपादन करण्यास पुष्कळ मदत मिळते.

---

# दर्द किंवा दुखणें.

१ दर्द किंवा दुखणें ह्मणजे आपल्या प्रकृतीला किंवा शरीराला अस्वस्थता वाटणें.

२ दुखणें होण्यास बहुतकरून मनुष्य स्वतःच कारणी असतो.

३ दुखणें आलें ह्मणजे आरोग्यतेची किंमत समजते.

४ दुखण्यानें मनुष्य पथ्याची खुबी जाणतो.

५ दुखणें मनुष्यास अभिमान सोडून सन्मार्गानें चालविण्यास एक शिक्षक आहे.

६ दुखण्यांत मनुष्य सहनशीलतेनें किती सुखमिळतें हें समजूंशकतो.

७ दुखण्याचें मूळ कारण आरोग्यतेविषयीं निष्काळजीनें राहाणें हें होय.

८ दुखणें हें मनुष्याला विद्याभ्यासांत व उद्योगांत, एक अकस्मात हरकत आणणारें विघ्न होय.

९ शांत, संतोषी, व विचारी मनुष्यास अकस्मात दुखण्याशिवाय दुखणें बहुतकरून होत नाहीं.

---

## कृपणता.

१ कृपणता ह्मणजे जरूरखर्चेंही न करणें [ पैसा असताही अ-योग्य अडचण भोगणें ] व दुसऱ्याला साह्य करण्याचें साधन असतांही न करणें.

२ कृपण मनुष्यें धनरक्षणार्थ परमेश्वराचे विश्वासूक दूत आहेत.

३ कृपणतेनें लौकिक वाढत नाहीं किंवा बोज रहात नाहीं.

४ कृपणावर त्याच्या घरचीं मनुष्येंही प्रीति करीत नाहींत किंवा त्याला चाहात नाहींत.

५ कृपण मनुष्य दुःख सहन करून पैपैचा संग्रह करितो, त्यामुळें त्याच्या हयातींत त्याला सुख किंवा यश मिळत नाहीं, व त्याच्या पाठीमागें जो कर्ता होतो तो थोडक्याच दिवसांत त्या सर्व धनाचा चैनबाजींत फन्ना उडवून अखेरीस दुःखी होतो ह्यावरून कृपणता हा अव्वल पासून अखेर पर्यंत दुःख देणारी आहे.

६ कृपण मनुष्याच्या हातून कोणतेंही धर्मकृत्य घडत नाहीं.

७ कृपणाच्या हातून परोपकार किंवा दुसऱ्याचें दुःख निवारण होत नाहीं.

८ उदार मनुष्य संपत्तीला आपली दासी करितो, परंतु कृपण आपण तिचें दास्यत्व कबूल करून आपणांस चिरकाळ पर्यंत त्रासांत पाडून घेतो.

९ कृपणाचें मनांत दुसऱ्याचें दुःख पाहून कधीं ही दया उत्पन्न होत नाहीं, म्हणजे कृपणता त्याच्या मनांत दयेला उत्पन्न होऊं देत नाहीं.

१० कृपणता व लोभ ह्यामध्यें अंतर हेंच कीं, लोभांत मिळविण्यांत मनाची खोटी हाव व खर्चण्यांत कोतेपणा, कृपणतेंत फक्त खर्चण्यांत कोतेपणा असतो.

---

## व्यय.

१ व्यय म्हणजे खर्चणें किंवा उपयोग करणें.

२ मिळविण्यापेक्षां खर्च करण्यांत जास्त शहाणपणा आहे.

३ मनुष्याला दैवयोगानें धन मिळूं शकतें, परंतु योग्य व्यय दैवयोगानें करितां येत नाहीं.

४ खर्च करणें तो आपली प्राप्ती पाहून करावा.

५ शास्त्राप्रमाणें आपल्या प्राप्तीचा एक तृतियांश, खर्च जाता शिलक राहिली पाहिजे.

६ जो मनुष्य ख्यालीखुशालीच्या वस्तु घेण्यांत पैसा खर्च

करितो, तो एकाद्या वेळेस अगदी अवश्य वस्तूसाठीं देखील अडून बसतो.

७ अयोग्य खर्च केल्यानें एक आपणास पैशाची नुकसानी दुसरें लोक आपल्याला हसतात.

८ कार्यांत देखील आपल्या योग्यतेपेक्षां जास्त खर्च करूं नये. कारण जे लोक आपल्या-येथें यथेष्ट हात मारून जातात तेच आपण कर्जाच्या संकटांत आल्यावर आपल्या फजीतीचे व मूर्खपणाचे पोवाडे गात फिरतात.

९ अवश्य खोराकी व पोशाकाच्या खर्चाकडे वाईट नजर करूं नये.

१० विचारानें खर्च केला तर मनुष्य कर्जबाजारी न होता दोन पैसे बाळगून असतो, त्यामुळें तो आपले मागले दिवस अपमानाशिवाय सुखात घालवितो.

---

# औदार्य.

१ औदार्य ह्मणजे दातृत्व, मोठें मन, किंवा दान शक्ति.

२ मनुष्य विद्वान् मेहेनतीनें होऊं शकतो, परंतु उदार होणें परमेश्वराचीच देणगी होय.

३ एक उदारता सर्व अवगुणास झाकण्यास समर्थ आहे.

४ सत्ताधीशांपेक्षां उदारांची नांवें लवकर प्रसिद्ध होतात.

५ उदारपणा हा मनुष्यांनीं आपल्या शक्तीप्रमाणें करावा; कारण अति उदारतेमुळें बळी राजास पाताळी जावें लागलें.

६ उदारपणा हा योग्य पात्र पाहून करावा कीं, त्यापासून आपलें व ज्याच्यावर आपण उदार होऊं त्याचें व देशाचेंही कल्याण होईल.

७ उदारतेचा वाईट उपयोग केल्यानें आपलें व ज्याच्यावर आपण उपकार केला असेल त्याचें व जातीचें आणि देशाचेंही नुकसान होतें; जसें, एक दारूबाजाजवळ पैसे नसल्यामुळें तो रडत किंवा शोक करित अथवा संतापत बसलाआहे. आणि आपण दयेनें उदार होऊन त्याला पैसे दिले, तर तो जास्त दारूबाज होणार! अर्थात् तो वाईट स्थितीपासून सुटणार नाहीं हें त्याला नुकसान व आपणासही पैशाचें नुकसान, व एक मनुष्य व्यसनी जास्त झाला हें ज्ञातीला किंवा देशाला नुकसान नव्हे काय?

---

## धैर्य.

१ धैर्य ह्या शद्वाचा अर्थ हिंमत किंवा मनाची स्थीरता.
२ धैर्यवानाजवळ दुःख बहुतकरून येतनाहीं.
३ धैर्याशिवाय कोणत्याही कार्याचा आरंभ होत नाहीं.
४ धैर्य हें सर्व शास्त्रांत श्रेष्ट होय.
५ धैर्याशिवाय मनुष्य आपलें संरक्षण करूं शकत नाहीं.
६ धैर्य हें मनुष्य पदवीलायेण्याची पहिली पायरी होय.
७ धैर्य सोडल्यानें मनुष्याच्यानें कांहीं पराक्रमाचें कृत्य होऊं शकतनाहीं.

८ धैर्य सोडल्यानें मनुष्याचा लोकांत बोज रहात नाहीं.

९ धैर्य ठेविल्याशिवाय साह्य मिळतनाहीं.

---

## न्याय.

१ न्याय ह्मणजे योग्यायोग्याचा विचार करून योग्य दिसेल तें करणें.

२ न्यायी पुरुषाच्या हातून सहसा अन्याय घडतनाहीं.

३ प्रामाणिक मनुष्य मात्र न्यायि या मानास योग्य आहे; कारण तो अयोग्य कर्मास कधीं सामील होत नाहीं परंतु तें तो उलटें उघडकीस आणतो व त्याच्याहातून लोभानें किंवा शिफारसीनें पक्षपात होतनाहीं.

४ न्यायी मनुष्य जगताला पुष्कळ उपयोगी आहेत.

५ न्याय करणाऱ्या पुरुषाच्या प्रामाणिकपणावर सर्व लोकांचें सुख अवलंबून असतें.

६ न्याय करणाऱ्या मनुष्यानें मनांत खूब समजलें पाहिजे कीं गुन्हेगारावर वैर घेण्याकरितां त्यास शिक्षा करावयाची नाहीं परंतु त्याचे हातून असागुन्हा पुनः होऊंनये किंवा दुसऱ्याला तसा गुन्हा करणाऱ्यास उत्तेजन मिळूंनये हाच हेतु आहे. तर शिक्षेशिवाय वरील योजना जों पर्यंत पार पडेल तों पर्यंत प्रयत्न करावा.

७ गुन्हेगार सुटल्यापेक्षां निरापराधी मनुष्याला शिक्षा होणें फार वाईट कारण त्यापासून त्याला पश्चातापासहसंताप होतो [ पश्चात्ताप ही सर्वांत कडक शिक्षा आहे. ]

---

## सरळता.

१ सरता ह्मणजे सर्व व्यवहारांत साधेपणानें रहाणें किंवा दुसऱ्याशीं निर्मळ अंतःकर्णानें वागणें.

२ प्रामाणिक मनुष्याचें सरळेंत आणि नम्रतेचें बोलणें त्याच्या सर्व चुकी पासून त्याला मुक्त ठेवितें.

३ सरळतेमुळें दुसऱ्याला आपणाशीं व्यवहार ठेविण्याला हरकत पडत नाहीं.

४ सरळ बोलण्याऱ्या मनुष्याच्या बोलण्यावर जेवढा लोक भरंसा ठेवितात तेवढें ढोंगी व धूर्त मनुष्याच्या वचनाचें वजन पडत नाहीं.

५ सरळपणा हा प्रामाणिक व नम्र किंवा निराभिमानी मनुष्या शिवाय दुसऱ्याजवळ सापडत नाहीं.

---

## दुःख.

१ दुःख ह्मणजे शोक होणें किंवा मनास वाईट वाटणें

२ दुःखाचे मुळबीज चुक किंवा हलगरजीपणा होय.

३ दुःख पश्चातापांतून उत्पन्नहोतें.

४ गर्वापासून पश्चाताप होतो.

५ ज्ञान किंवा विचार नाहींसा झाल्यानें दुःख दुणावतें.

६ सुज्ञ मनुष्य चुक किंवा वाईट परिणामाबद्दल दुःख न करतां निवारणार्थ शांततेनें व विचारानें उपाय करतो.

७ कोणतेंही दुःख आपणास झालें तर अगोदर तें आपल्या कोणत्या चुकीमुळें झालें हें शोधून काढावें व ती चूकी कशी सुधारले याची योजना करून दुःखाचें मुळ नाहींसें करावें.

८ दुख केल्यानें आपलें मन शांततेपासून दूर रहातें या मुळें आपण गोंधळून जातो व ह्या कारणानें आपण कोणतेंही कार्य करूंशकतनाहीं व कार्य झाल्याशिवाय यशप्राप्ति होत नाहीं. आणि यश किंवा कीर्ति प्राप्तझाल्याशिवाय धन प्राप्त कसें होईल. आणि धन किंवा पैसा न मिळाल्यानें मात्र निर्वाहाची काळजी उत्पन्न होते.

---

## स्वच्छता.

१ स्वच्छता ह्मणजे निर्मळपणा.

२ ज्याला आरोग्य राखण्याची इच्छा असेल त्यानें स्वच्छता ठेविली पाहिजे.

३ हलके कपडेही धुऊन ठेवण्यानें शोभा देतात.

४ अमंगळपणानें किंवा कळकटपणानें राहिल्यानें अथवा मळकट

वस्त्रें धारण केल्यानें आपली तबीयत बिडघते, दुसरें लोक (आपणा पासून) दूर राहण्याची इच्छा करितात ह्मणजे आपले वजन त्यांच्यावर पडतनाहीं.

५ जो अंगावरील कपडे स्वच्छ ठेवितो त्याचें घरही स्वच्छ रहातें, कारण त्याला मग आपल्या घरांतीलही घाण किंवा कचरा आवडत नाहीं त्यामुळें जन जनावराकडचेंही भय नाहींसें होतें.

६ निर्मळ मनुष्याच्या अंगी सर्व कामें स्वच्छकरण्याची हौस असल्यामुळें त्याला ती काळजी पूर्वक करावी लागतात त्यामुळें त्याची कोणत्याही कामांत चूक पडत नाहीं.

---

## हत्या.

१ हत्या करणें ह्मणजे वध किंवा खून करणें किंवा जीव घेणें.

२ लहान जीवाचीही हत्या करूं नये.

३ वध किंवा खून करण्यास बहूतकरून क्रोध ममत (अभिमान) दुष्कृत्याचाबचाव हीं करणें असतात.

४ आपल्या शत्रुचाही आपण जीवघेण्याचा प्रयत्न करूंनये. कारण जीव घेतल्यानें आपण त्याला सर्व दुःखांतून आपल्या शिरावर घेउन मोकळा करितों व दुसरें त्यच्या बदल्यांत आपण पश्चाताप व भय मात्र उत्पन्न करून घेतो.

५ ह ा किंवा खून मात्र निर्दय मनुष्याच्या हातून होऊं शकतो.

६ खून करणारा इहलोकीं जगाचा व परलोकीं परमेश्वराचा गुन्हेगार आहे.

७ कोणाचा जीव घेणें किंवा जीव घेण्याचा विचारकरणें हें नरपशूंचें काम होय.

---

## पाप.

१ पाप म्हणजे दुसऱ्याला पीडा करणें ह्यालाच गुन्हा म्हणतात.

२ ज्या ज्या प्रमाणानें दुसऱ्याला जास्त किंवा कमी पीडा करण्यांत येतें त्या त्या प्रमाणानें पाप जास्त किंवा कमी लागलें जातें.

३ दुर्जन मनुष्यावर पीडा करण्यांत मोठा आनंद मानतो.

४ सज्जन दुसऱ्याला दुःखांत पाहून दुःख पावतात.

५ गमती करितां दुसऱ्याला पीडा करणें हें मूर्खाचें काम आहे.

६ दुसऱ्यला पीडा करण्यांत पुढें होऊं नये आणि मागूनही कोणाला दुःख होईल असें करूं नयें.

७ दुसऱ्याला पीडा होऊन आपणास सुख मिळण्याची इच्छा करू नये कारण कोणत्याही दुष्ट इच्छेस फल प्राप्त होत नाहीं.

८ ज्यांना आपण पीडा करतो त्यांच्या हातून आपलें कांहीं नुकसान न झालें तरी वेळेवर ते आपल्या नरडीचा घोट घे-

तल्यावांचून राहणार नाहींत.नाहीं तर निदान निंदातरि करित फीरतील.

८ पापा मनुष्याचा सर्व लोक तिरस्कार करतात त्याच्या कामांत कोणी मदत करीत नाहीं त्याचें सर्व अकल्याण इच्छितात.

---

## पुण्य.

१ पुण्य म्हणजे दुसऱ्याला सुख देणें.

२ दुसऱ्याला ज्या कामांत सुख होईल त्या कामांत आड येऊं नये.

३ दुसऱ्याला सुख देणें हा मनुष्याजा धर्म आहे.

४ दुसऱ्याला सुख देणारा मनुष्य सर्वकाळ आनंदांत असतो.

५ सज्जन मनुष्य दुसऱ्याला सुख देण्यांत हर्ष मानितों.

६ दुसऱ्याचे हीत इच्छणारा विषयीं सर्वांची पूज्यबुद्धि असते.

७ पुण्यवानाच्या सर्व कामांत लोक त्याची स्तुती करून त्याला मोठ्या खुशीनें मदत करतात.

८ पुण्यवानापासून शोक व पश्चात्ताप दूर रहातो.

९ आपल्या सारखे दुसऱ्याचें सुख दुःख जाणणें या सारिखा साधुपणा नाहीं.

---

## हर्ष.

१ हर्ष म्हणजे आनंद किंवा सुखाचे अश्रु होय.
२ हर्षा बरोबर कांहीं तरी शोक असतो.
३ हर्षा मध्यें मदोन्मत्त होऊं नये.
४ वाईट किंवा अयोग्य कामांत हर्ष मानूं नये.
५ वाईट कर्मानें हर्ष प्राप्त होतो, परंतु पुढें दुःखाची वाटणी येते.
६ चांगल्या कामांत हर्ष मानावा.
७ हर्षांत दुसऱ्या विषयीं बेपर्वा करूं नये.
८ हर्षांत कोणाची निंदा करूं नये.
९ हर्षा मध्यें कोणाचा अपमान करूं नये.
१० परोपकाराचा हर्ष अखेरीस पश्चात्ताप देत नाहीं (म्हणजे शेवट पर्यंत सारखा रहातो).

---

## धर्म.

१ धर्म म्हणजे फर्ज किंवा कर्तव्य कर्म.
२ मनुष्याला शांततेंत राहण्यासाठीं धर्मानें वागले पाहिजे.
३ आपल्या सारखें दुसऱ्यास मानणें हा मनुष्याचा पहिला धर्म होय.
४ मनुष्याचें मुख्य दहा प्रकारचे धर्म आहेत — दया, क्षमा, शांति, धैर्य, दमन, सत्य, ज्ञान, नम्रता, उपकार, मर्यादा,

१ दया म्हणजे परपीडा न करणें किंवा दुसऱ्याचें दुःख ऐकून खूश न होणें.

२ क्षमा म्हणजे अकस्मात् झालेला अपराध माफ करणें.

३ शांति म्हणजे कोणी कांहीं अपराध केला तर आपलें डोकें चढवून त्या बद्दल आपल्यालाच शिक्षा करून न घेणें.

४ धैर्य म्हणजे संकटसमयीं न घाबरतां आपल्या दुःखाच्या निवारणार्थ उपाय योजणें.

५ दमन म्हणजे इंद्रियांना वश ठेविणें.

६ सत्य म्हणजे खरेंपणानें किंवा सचोटीनें वागणें व बोलणें.

७ ज्ञान म्हणजे जाणणें किंवा माहिती करून घेणें.

८ नम्र म्हणजे योग्य ठिकाणीं गर्व सोडून वागणें. (कारण दुर्जनाशीं नम्रतेनें वागणें घातक आहे.)

९ उपकार म्हणजे दुसऱ्याला संकटसमयीं मदत करणें.

१० मर्यादा म्हणजे दुसऱ्याचा अपमान न करणें.

११ हे दहा प्रकरचे धर्म मनुष्यानें अवश्य पाळीले पाहिजेत.

---

## विद्वान्.

१ विद्वान शान्तीनें वागतो कारण दुसऱ्याच्या अपराधाबद्दल तो स्वतः शिक्षाकरून घेत नाहीं.

२ विद्वान सद्भवचन बोलतो कारण स्वकार्य बिघडून दुसऱ्याशीं वैर करण्यास तो इच्छित नाहीं.

३ विद्वान निराभिमानीपणानें वागतो. कारण तो ज्ञान संपादन करण्यास इच्छितो.

४ विद्वान सत्यतेनें वागतो कारण जगाचा विश्वास संपादण्यांत तो धन्य मानतो.

५ विद्वान नम्रपणानें वागतो कारण तो दुसऱ्याचें प्रेम संपादन करण्यास इच्छितो.

६ विद्वान उद्योगी राहातो कारण तो दारिद्र्यापासून दूर रहाण्याचा उपाय जाणतो.

७ विद्वान धारलेलें कार्य करण्यांत दृढाभिमान धरतो कारण मेहनत व निश्चयाशिवाय काम पार पडणार नाहीं, हें तो समजूं शकतो.

८ विद्वान काम करण्यांत चपळ असतो. कारण पुष्कळ काम करण्याची त्याला उमेद असते.

९ विद्वान बोलण्यांत अस्खलित असतो. कारण विद्या आणि सत्यता ही त्याच्या अंतःकर्णाची भीति व पोकळ लज्जा नाहींसी करितात.

१० विद्वान अल्प निद्रा ( नियमित ) करितो कारण तो वेळेची किंमत जाणतो.

११ विद्वान आपल्या मनुष्याविषयीं दक्षता ठेवितो. कारण त्याला आपल्या माणसाच्या संरक्षणाची काळजी असते.

१२ विद्वान परजनांवर दया ठेवितो. कारण तो दुसऱ्यांला दुःख देण्यास इच्छित नाहीं.

१३ विद्वान, मूर्खावर कडकपणा ठेवितो. कारण तो त्याला स्थितीवर आणण्यास इच्छितो.

१४ विद्वान सज्जनावर प्रीति ठेवितो कारण तो सज्जनाचें कल्याण इच्छितो.

१५ विद्वान दुर्जनाशीं गर्व ठेवितो कारण तो त्याचा तिरस्कार करितो.

१६ विद्वान विद्वानाजवळ सरळपणा ठेवितो कारण त्याला त्रास न व्हावा ह्याविषयीं त्याला काळजी असते.

१७ विद्वान शत्रुविषयीं शूर [ धैर्य ] पणा ठेवितो. कारण तो त्याला भिऊन उगाच न रहातां स्वरक्षणार्थ उपाय योजितो.

१८ विद्वान् गुरूच्या ठिकाणीं सहनशीलता ठेवितो. कारण तो जाणतो कीं ते आपले हित करणारे आहेत ह्मणून तो त्यांना त्रास किंवा दुःख न देतां विद्या प्राप्त करून घेतो.

१९ विद्वान् स्त्रीचेठायीं चपल ( हुशार ) रहातो कारण तो तिच्या मोहपाशांत न फसतां तीचे कावे ओळखूं शकतो.

२० विद्वान् निर्बळाला क्षमा करितो कारण निर्बळाला पीडा करण्यांत तो हलकेपणा समजतो.

२१ विद्वान् स्वधर्मच्याठायीं स्थीर असतो. कारण त्याचें मन ज्ञाना मुळें अंधकारांत गोते खाऊन फसत नाहीं. [ तक्रार करून ]

२२ विद्वान् योग्यदान करण्यांत उदार असतो द्रव्याचा उपयोग काय, हें जाणतो.

२३ विद्वान् परदुःख निवारण करण्यांत उल्हास मानिता कारण दुसऱ्याचें दुःखाकडे त्याचें अंतःकरण कोमळ असतें.

२४ विद्वान् दुसऱ्याची योग्यस्तुति करितो कारण दुसऱ्याच्या कीर्तीची त्याला ईर्षा येत नाहीं.

२५ विद्वान् इंद्रियदमन करण्यांत सामर्थ्यवान असतो कारण इंद्रियें वशठेविण्यांत तो पराक्रम जाणतो.

२६ विद्वान् व्यसनापासून दूर रहातो. कारण तो व्यसनाला, आपणाला दास करून टाकणारा शत्रु समजतो.

२७ विद्वान थोडें बोलतो. कारण आपल्या शब्दाचा तोल व परिणाम ह्याचा तो अगोदर विचार करितो.

२८ विद्वान मंद ( थोडें ) हांसतो. कारण ज्ञानामुळें त्याला आश्चर्य वाटण्या सारख्या गोष्टी थोड्या असतात.

२९ विद्वान निर्मळ राहतो कारण योग्य कामाशिवाय तो अमंगळ (अशौच) पदार्थाला शिवत नाहीं.

३० विद्वान थोर व वृद्ध यांच्या जवळ नियमानें वागतो कारण तो दुसऱ्याचा अपमान करून आपला हलकटपणा व अल्प विचार बाहेर प्रकाशित करण्यास धजत नाहीं.

# मूर्ख.

१ मूर्ख गर्वानें वागतो. कारण तो स्वतःचें ज्ञान पूर्ण समजतो.

२ मूर्ख दुर्वचनें बोलतो. कारण तो आपली चूक न सुधारतां दुसऱ्यास दोष देण्यास तयार असतो.

३ मूर्ख अतिशय बोलतो. कारण आपल्या बोलण्याच्या परिणामाचा तो विचार करित नाहीं.

४ मूर्ख अतिक्रोधी असतो. कारण तो सत्यासत्य ओळखूं शकत नाहीं.

५ मूर्ख उपकारावर अपकार करितो कारण तो उपकार समजूं शकत नाहीं.

६ मूर्ख उद्धटपणानें वागतो. कारण बेपर्वाइनें वागण्यांत तो मोठेपणा समजतो.

७ मूर्ख स्वकीयजनांशीं वैर करितो. कारण त्याला स्वतःचें कल्याण अकल्याणही कळत नाहीं.

८ मूर्ख स्वतःचीच स्तुति ऐकण्याची इच्छा ठेवितो. कारण ज्ञान संपादन करण्याची त्याला पर्वा नसते.

९ मूर्ख स्वतःची स्तुति करितो. कारण त्याच्या चुका त्याच्या लक्षांत येत नाहींत.

१० मूर्ख दुसऱ्याला हलकें मानितो. कारण गर्वामुळें त्याच्या ज्ञानचक्षूला उघडण्यासही वेळ सांपडत नाहीं.

११ मूर्ख आवका पेक्षां जास्त खर्च करितो. कारण तो आपल्या परिणामाचा विचार करूं शकत नाहीं.

१२ मूर्खाला अति लोभ असतो. कारण संतोषाच्या सुखाचा त्याला अनुभव येत नाहीं.

१३ मूर्ख आपल्या शक्तीबाहेरचीं कामें करण्यास इच्छितो. कारण आपल्याच्यानें तें होईल किंवा नाहीं ह्याचा तो विचार करित नाहीं. कारण कीं, तें कार्य करण्यांत काय काय अडचणी येतील त्या निवारणार्थ काय उपाय केले पाहिजेत हें ही त्याच्या लक्षांत येऊं शकत नाहीं.

१४ मूर्ख विनाकारण विरोध उत्पन्न करण्यांत हुशारी मानतो. कारण विरोधभावाचा परिणाम त्याच्या लक्षांत येत नाहीं.

१५ मूर्ख निर्बळास त्रास देण्यांत शौर्य मानतो. कारण आपल्या पराक्रमाचा उपयोग करण्यास त्याला दुसरी जागा नसते.

१६ मूर्ख दुसऱ्याची हमेश निंदा करितो, कारण तो स्वतः कांहीं कार्य करूं शकत नाहीं.

१७ मूर्ख वारंवार खोटें बोलतो. कारण त्याला आपली प्रतिष्टा मिरवीण्यास व अन्याय लपविण्यास दुसरा उपाय सुचत नाहीं.

१८ मूर्ख विषयासक्त असतो. कारण इंद्रियें वश ठेविण्याची त्याच्यांत शक्ति नसते.

१९ मूर्ख व्यसनाधीन असतो. कारण ह्या पराधीनपणाला तो ख्यालीखुशाली ( आनंद ) समजतो.

२० मूर्ख घरच्या कामाविषयीं निःष्काळजी असतो. कारण दुसऱ्याचा बोज आपल्यावर घेण्यास तो असमर्थ असतो ( आज्ञाना मुळें ).

२१ मूर्ख काम करण्यांत आळशी असतो. कारण त्याला दुसऱ्याच्या जिवावर मौजा मारण्यास लाज वाटत नाहीं.

२२ मूर्ख अतिशय जागतो. कारण ख्यालीखुशालीमुळें त्याला आपल्या प्रकृतीविषयीं काळजी रहात नाहीं.

२३ मूर्ख अति झोंप घेतों कारण निरुद्योगामुळें तो वेळेची किंमत जाणत नाहीं.

२४ मूर्ख दिर्घोटद्धपणानें वागतो. कारण आपल्या चुकीविषयीं कोणी आपल्याशीं कांहीं बोलूं नये असें त्याला वाटतें.

२५ मूर्ख हलक्या मनुष्यावर प्रीति करितो. कारण त्याला वागण्यास चांगला मनुष्य मिळत नाहीं.

२६ मूर्ख विद्वान व थोर लोकांशीं बोलण्यासही मागें पाय घेतो. कारण अविद्या व लबाडमिळें लज्जा व भीति त्याच्या अंतःकरणांत घरें करून रहातात.

---

## देशाटन.

२ देशाटन किंवा देशपर्यटन करणें ह्मणजे अल्प काळांत जास्त अनुभव किंवा माहीती करून घेण्याचा उपाय.

२ देशाटन केल्यानें चाणाक्ष अनुभवी व मिळणसार होतो.

३ देशाटनानें मनुष्यास ह्या क्षणिक दुःखकारक मायेचें खरें स्वरूप कळतें.

४ देशाटनानें दृढनिश्चय हिंमत ही मनुष्यांत वाढतात.

५ देशाटनानें स्वतःच्या कामाबद्दल प्रयत्नानें बनेल तोंपर्यंत दुसऱ्यावर अवलंबून न रहातां स्वतः कष्ट घेऊन पार पाडणें जास्त उत्तम, ह्या तत्वाचा मनुष्यांच्या मनावर ठसा बसतो.

६ देशाटनांत मनुष्यांला नाना प्रकारच्या स्वभावाचे व जातीचे लोकांशीं वागण्याचा, किंवा वर्तण्याचा प्रसंग येतो, त्या वेळेस नानातऱ्हेच्या बोलण्याच्या, चालण्याच्या व वर्तण्याच्या कलांची त्याला प्रत्यक्ष माहिती होते, ह्या मुळें त्याला प्रसंगोपात योग्य रीतीचें वर्तन करण्यास त्याचें मन गोंधळून जात नाहीं किंवा तो भांबाऊन जात नाहीं.

७ देशाटनांत मनुष्यांस नाना प्रकारची जमीन, व वनस्पति, वस्तु, हुन्नर, कला, विद्या, भाषा, रीतभात, इत्यादिकांची माहिती होते, ह्यामुळें तो मनुष्य स्वजातीस व देशास एक उपयोगीं रत्न होऊन पडतो.

८ देशाटनांत श्रम, थकवा, भूक, तान्ह, ऊन्ह, थंडी, अडचण व दुःखहीं सहन करावीं लागतात.

९ देशाटन करण्यास दृढनिश्चय व उमेदही दोन मुख्य साधनें होत. घराकडची निष्काळजी, स्वजातीकडचा अडथळा नसणें, आणि स्वदेशाकडून आश्रय असणें, ही वरच्याहून उतरत्या प्रकारचीं साधनें होत; यास्तव इतकीं साधनें असल्याशिवाय देशाटन होणें अशक्य आहे. व त्यांत दृढनिश्चय आणि उमेदही

प्राधान्य होत. कारण ह्याशिवाय वरची सर्व प्रकारची जरी प्रतिकूळता असली व मनुष्यांच्या अंतःकणावर दृढ निश्चय व ईर्षेचा मजबूत ठसा उमटलेला असला तर कोणतीही नड आल्याशिवाय देशाटन करण्यांत तो साफल्यता पावतो.

१० देशाटनांत आपला मोठेपणा सोडून नम्रता मनुष्यास धरावी लागते.

११ देशाटनांत मनुष्यास नम्र, प्रिय (मर्यादशीर) वर्तनकरून व मिष्ट बोलून दुसऱ्याचें मन आपल्याकडे ओढून घेऊन, त्या. च्या मदतीचा उपयोग करून घेण्याचा वारंवार प्रसंग येतो. व तदनुसार वर्तन करण्यांत न आलें तर अडचणींतून व दु;खांतून पार न पडतां तीं मुकाट्यानें सहन करण्याचा प्रसंग येतो.

१२ देशाटनांत मनुष्याला मातापिता, बंधु, स्वात्पवर्ग, जात व देश ह्यांचा वियोग सहन करावा लागतो; व भूक, तहान, थंडी, ऊन्ह, अडचण, श्रमही सोसावी लागतात! त्याच्या बद- ल्यांत तो मानास योग्य दरिद्रापासून दूर होतो, व क्षणिक मायेचें खरें स्वरूप त्याला कळल्यामुळें मोह मायारूपी कपट जाळयांत तो फसला जात नाहीं. आणि त्याचा स्व- भाव शांत, निश्चयी, व धैर्यवान् देशाटनानें झाल्यामुळें तो बहुतकरून सर्व धारलेल्या कामांत साफल्यता पावूं शकतो. त्याला नाना तऱ्हेच्या कळा, हुन्नर, युक्ति वगैरेची माहिती झाल्यामुळें [देशाटनानें] तो स्वदेशास एक उपयोगीं रत्न

होऊन स्वदेशाचें कल्याण करूं शकतो. ह्यामुळें त्याच्या पाठिमागेंही त्याचें नांव अजरामर होऊन जातें.

---

# मनांत

१ मनांत म्हणजे आपल्या अंतःकरणांत आपलें कर्म अयोग्य किंवा योग्य आहे ह्याचा विचार करून मनांत समजणें व योग्य वाटेल तें करणें (ह्यालाच मनःपुतंसमाचरेत्) म्हणतात.

टीप १ जो रस्ता किंवा जें वर्तन आपणास हितकारक वाटेल तदनुरूप वर्तण्याचा मनांत निश्चय किंवा ठराव करणें व तो अमलांत आणणें ह्याला मनुष्यत्व म्हणतात.

२ आपणास अयोग्य असें वर्तण्याचा किंवा कर्म करण्याचा विचारकरणें, किंवा दैविकपराक्रम, धन, अथवा सुख ह्यांची मनांत वांच्छा करणें किंवा आपणास दुर्मिळ अशा स्थितींत येऊन आपण असें वर्तन करूं असा विचार करणें ह्याला मनोराज्य किंवा कल्पिततरंग म्हणतात.

२ आपल्या अपराधांचा मनांत विचार करून आपल्या स्थिती बद्दल परमेश्वराचे उपकार मानण्यास किंवा संतोषित रहाण्यास अंतःकरणाच्या सत्य विचारा पेक्षां खात्री होईल असा अन्य मार्ग नाहीं.

३ अपराध्याचें मन त्याच्या गुन्ह्याबद्दल त्याला खातें;— त्यापेक्षांही जरब पडेल अशी कोणतीही शिक्षा नाहीं.

४ आपल्या फायद्यांत किंवा बचावासंबंधीं आपल्या मनासमान हितकर अशी दुसरी कोणाचाही सल्ला नाहीं. कारण आपणास प्रतिकूळ किंवा नडतर व अनुकूळ मार्ग व साधनें हीं जितकीं आपणास आपल्याबद्दळ माहीत असतात तितकीं दुसऱ्यास नसतात.

---

## सज्जन.

१ सज्जन म्हणजे दुसऱ्याच्या अपराधाकडे लक्ष न देतां सर्वांचें हित इच्छिणारा, दुसऱ्याला संकटांत टांकून स्वकार्य ( साधण्यापासून ) दुर रहाणारा आपल्यामुळें दुसऱ्यास त्रास न पडेल ह्या विषयीं काळजी बाळगणारा.

२ सज्जनाविषयीं सर्वांची पूज्य बुद्धि असते कारण त्याला कोणी दुखविलें तरी तो त्याचें हित करतो.

सज्जनाचें अंतःकरण शांत असतें कारण तो दुसऱ्याचें आहित करण्याच्या खटपटीपासून विमुक्त असतो.

४ सज्जन सुखी असतो कारण त्याचें अंतकरण शांत असतें.

५ सज्जनांवर संकटें येतात कारण दुर्जनाला तो आड काठी असतो परंतु सज्जनांचा नाश होत नाहीं कारण जग व परमेश्वर त्याचा कैवारी असतात; कदाचित् मनुष्यनजरेनें त्याचा नाश झाला असें झालें तरी त्याचें अंतःकरण शांत व-

सुखीं असतें. आणि त्या नाशा पेक्षां त्यांना अक्षय कीर्तीचा मोठा लाभ प्राप्त होतो.

६ सज्जनांच्यापाठीमागें कीर्ति अक्षय उभी असते कारण त्यांच्या हातून जनकल्याणाचीं कामें होतात.

७ सज्जनांसमोर दुर्जनाच्यानें उघड रीतीनें होऊं शकवत नाहीं कारण सज्जनांच्या कीर्ति समोर त्याच्यानें टिकाव धरवत नाहीं.

८ सज्जनांना संकट समयीं सर्वांकडून मदत मिळते कारण तो जनाला प्रिय असतो.

---

## दुर्जन,

१ दुर्जन ह्मणजे स्वकार्य बिघडूनही दुसऱ्यांस पीडा करण्याविषयीं उत्सुक होणारा, दुःखिताला पाहून आनंद मानणारा, व सर्वांचा उगाच द्वेष करणारा.

२ दुर्जनाविषयीं सर्वांस तिरस्कार असतो कारण तो सर्वांचें अहितइच्छितो.

३ दुर्जनाच्या अंतःकरणात शांतता नसते कारण तो दुसऱ्यांचें वाईट करण्याच्या खटपटींत अक्षय गुंतलेला असतो.

४ दुर्जन दुःखी असतो कारण त्याच्या अंतःकरणाला स्वस्थता नसते.

५ दुर्जन अल्पकाळ पर्यंत आपल्या सुखरूपीं जाळ्यांत मग्न असतो कारण त्याच्या दुष्कर्माच्या फळाची पूर्ण वृद्धि झाल्याशिवाय संकट व नाश रुपी शिकारीस आपली शिकार साधल्याची खात्री होत नाहीं.

६ दुर्जनावर संकटें येतात त्यावेळेस हटकून त्याच्या नाश होण्यास वेळ लागत नाहीं कारण तीं [ संकटें ] त्याच्या वाईट कर्मापासून उपन्न झालेलीं आसतात.

७ दुर्जनाच्या पाठीमागें अपकीर्ति अक्षय उभी असते, कारण त्याच्या हातून दुसऱ्याच्या अकल्याणाचींच कामें होतात.

८ दुर्जना समोर सज्जन उघड रीतीनें होत नाहींत कारण ते त्यांच्या दुर्गुणाचें किरण आपल्यावर न पडावे ह्मणुन फार जपतात.

९ दुर्जनाला संकट समयीं कोणाची हीं मदत मिळत नाहीं कारण तो जनाला आप्रिय असतो.

१० दुर्जन सज्जनांना पाहून मनांत ओशाळतो व त्याची योगता ग्रहण करण्यास इच्छितो परंतु दुर्गुण टाकण्यास तो मात्र प्रयत्न करीत नाहीं. ह्या मुळें त्याची नीचांत गणना होते, तेव्हां तो अर्थात् सज्जनांची निंदा करतो ह्यानें मात्र तो जास्त हलका पडतो व अक्षय दुःखांत असतो. आणि ह्याचा दोष दुसऱ्यांवर ठेवण्यास प्रयत्न करतो ह्यामूळें त्याला त्याची स्वतःचीच चूक लक्षांत येत नाहीं.

---

# भोजना विषयीं. ( आदरस्य प्रत्यादरं. )

१ भोजन ह्मणजे निदान वर्तमानकाळीं तरी ज्या पासून तृप्ति होऊन, मनास संतोष झाल्यानें अरसपरस पासून प्रीतींत ज्या पासून वृद्धि होईल असा प्रघात किंवा प्रचार.

२ प्रघाताचीं मुख्य कारणें:—दळण वळण वाढणें, प्रीतीची व-अगत्याची वृद्धि होणें.

३ कारणाच्या निमित्तांनीं मिष्ट भोजन मिळणें.

४ आपल्या शक्तिप्रमाणें दुसऱ्यास संतोषित ठेवण्याचा उपाय.

५ दुसऱ्याचें मन आपल्याकडे ओढून घेण्याची कला.

६ कोणास अगत स्वागत दाखविण्याची निशाणी. [खूण]

७ उदारतेची कीर्ति मिळविण्याची रीति किंवा प्रसिद्धीस ये-ण्याचा मार्ग.

१ फायदे. दुसऱ्याच्या घरीं भोजनास गेलों म्हणजे त्यापासून त्याचा आपला संबंध जास्त निकट होतो.

२ दुसऱ्याच्या येथें जेवणास गेल्यामुळें त्याला आपल्या येथें यावें लागतें. व आपलें म्हणणें बहूत करून (योग्य) ऐकावें लागतें.

३ मंडळींत कसें भोजन करावें किंवा मंडळींत कसें वागावें ह्याचें ज्ञान मिळतें.

४ आयतें बिन श्रमानें मानानें अगत्य पूर्वक व ओशाळ पणा विरहित मिष्टान मिळतें.

५ दुसऱ्यास आपल्या येथें जेवणास बोलाविल्यानें त्याचा आपला संबंध जास्त निकट होतो.

६ आपण त्याच्या प्रीतींत उतरण्यास कारण [बोलाविल्यानें].

७ आपलें त्याच्यावर वजन पडतें [सदर].

८ आपल्याविषयीं दुसऱ्याच्या तोंडून सद्वाक्यें निघतात [सदर].

९ आपण कृपण, मंडळींचें त्रासीक, आगत स्वागतच्या रीतीच्या ज्ञानापासून दूर आहों ह्या आरोपा पासून मोकळें रहातों. [सदर].

१७ तोटे योग्य विचार हमेश मनांत न आणिला तर फुकट हरामाचें खाणें पसंत पडतें.

१८ दुसऱ्यांच्या येथें जेवणाची संवय लागल्यानें आपण आपणाकडे हलकटपणा ओढून घेतों.

१९ लोभानें किंवा सहज [निष्काळजीपणा] जास्त खालें तर शरीरास अपाय कारक व लोकांस हसण्यास कारण होतें.

२० कोणी आपणास जेवण्यास न बोलाविलें तर निंदा करण्याची संवय लागतें.

२१ हरहमेश जो आपणास जेवावयास बोलावतो त्याची खोटी स्तुति करून त्याच्या हातून त्याची खराबी करविण्यास आआपण कारण होतों. [आळशी व मुर्खासलागु.]

२२ दुसऱ्याच्या येथें जेवणाच्यां इच्छेमुळें आपण स्वप्राक्रमानें मिळविण्याच्या आपल्या कर्तव्यापासून विनमुख होतों.

२३ प्रति बदला देण्यांत आपल्याच्यानें हयगय झाल्यास स्वतः होउन आपणास हलकें पडून घेण्याचा प्रसंग आणितों.

२४ दुसऱ्यास जेवणास बोलावण्याच्या खर्चात यावें लागतें.

२५ दुसऱ्याची बरदास्त व व्यवस्था ठेवण्याचे श्रम ध्यावे लागतात.

२६ दुसऱ्यास जेवणास बोलाविण्याच्या संबंधांमुळें कर्जबाजारी होण्यास किंवा स्वतः तंगी येण्यास आपण कारण होतों.

२७ आपल्या आद्याकडे नजर न देतां दुसऱ्यास जेवणें दिली तर आपण तंगीत येऊन तेच लोक आपली निंदा करितात.

२८ आपण कोणास जेवणास बोलावल्यामुळें दुसऱ्याच्या डोळ्यांत येण्यास कारण होतों.

२९ सारांश ह्या जगतात परस्पर व्यवहार कायम रहाण्याकरितां व लोभाची [ प्रीतीची ] वृद्धि ह्मणजे ह्या क्षणभंगुर जीवनाचें सार्थक होण्यास्तव परस्पर भोजनास बोलाविणे व जाणें इत्यादि " आदरस्यप्रत्यादरम् " कायम ठेविलें पाहिजे परंतु त्यांत नाकांतील नथीचे मोती गहाण ठेवून जांवयास तुपाची वाटी वाढणें हें अखेरीस पश्चातापाचें मूळ होय.

---

# कृति, कृत्य.

१ कृति ह्मणजे कृत्य अथवा ज्याचा कांहीं तरी परिणाम किंवा फळ उत्पन्न होईल असें आचरण किंवा वर्तन.

२ जशी बुद्धि तशी क्रिया, जशी क्रिया तसा काळ, काळ तशी वेळ आणि वेळ तशी स्थिति आणि स्थिति तशी व्यवस्था आणि व्यवस्था तसें सुख किंवा दुःख व त्याचा परिणाम; यास्तव आपल्या दुःख सुखास कारण आपली क्रियाच होय; आणि क्रियेस बुद्धि कारण आहे व बुद्धीस मनोविकार व मनोविकारास कारण ज्ञान व ज्ञानास कारण संगत किंवा शिक्षण; यास्तव आपल्या सुखदुःखाचें व त्याचा परिणामाचें मूळ बीज संगत किंवा शिक्षण ह्यांत आहे.

अर्थ—ज्ञानास, बुद्धीस, क्रिया करण्यास, आपला विचार देण्यास संगत किंवा शिक्षण हा आधार आहे. ह्मणजे संगत ह्याचा अर्थ जवळच्या पदार्थांच्या गुणांचा परिणाम, व शिक्षणाचा अर्थ त्यागुणांच्या परिणामाची माहिती.

टीका—प्रसंगानेंही ज्ञान माहिती किंवा अनुभव येतो परंतु प्रसंग ह्मणजे ही संगत होय कारण तो ही प्रत्यक्ष आपणास किंवा आपल्यावर येतो ह्मणजे त्याचीही संगत होते.

१ आतां जशी आपण क्रिया करितों तसें आपणास सुख दुःख व तिच्या परिणामाचा अनुभव येतो, अनुभव येतो ह्मणजे माहिती किंवा ज्ञान होतें; आतां माहिती किंवा ज्ञान होतें या वरून जो सुखाचा रस्ता असेल तशी क्रिया करावी अशी परमेश्वराची इच्छा आहे असें ह्मटलें पाहिजे; आतां ज्ञान होतें तद्वत् जर बुद्धीनें दुर्विकाराच्या स्वाधीन होऊन ह्मणजे ज्ञानाची अवाज्ञा करून आचरण [ ह्मणजे क्रिया ] केलें तर ज्ञानाच्या सल्ल्यानें जो परिणाम व्हावयाचा त्याच्या उलट झाला पाहिजे.

[ अर्थ दुःख कारक ] हीच परमेश्वराच्या ईच्छेची अवाज्ञा होय.

४ आतां ज्ञान हा बुद्धीस [ परियायानें आपणांस ] हितकर असा रस्ता दाखविणारा मंत्रि आहे. कारण त्याच्या विचाराच्या उलट जी क्रिया होते तिचा परिणाम दुःख कारक होतो, तर ज्ञानाच्या विचाराच्या उलट वर्तन करणें ह्मणजे आपला वाईट परिणाम करून घेण्यास किंवा होण्यास इच्छिणें ह्यालाच दुर्विकाराच्या स्वाधीन होऊन तदनुरूप वर्तन किंवा क्रिया करणें ह्मणतात.

५ सारांश क्रिया, कृति, किंवा काम, व वर्तनही विचार पूर्वक ह्मणजे परिणामाचा विचार करून योग्य वाटेल तसें करावें. कारण आपण चांगली कृति किंवा वर्तन केलें तर त्या पासून आपणास सुख होतें व त्या सुखास आपलीच कृति कारण असल्यामुळें आपणास आनंद उत्पन्न होतो. उलट आपली कृति वाईट असली तर तिजपासून आपणास दुःख होतें व त्याला आपलीच कृति कारण असल्यामुळें दुःखाच्या बरोबर पश्चात्ताप होतो ह्मणजे दुःखावर डाग.

---

## जनांत.

१ जनांत ह्मणजे आपल्या समान प्राण्यांत वागणें, असणें, वर्तणें, किंवा कार्य करणें, तें असें कीं आपल्याविषयीं त्यांच्या मनांत हलकट विचार किंवा तिरस्कार उत्पन्न न होतां व आपल्या पासून

अयोग्य त्रास त्यांनां न पोंचता त्यांच्या मनांत आपल्याविषयीं पूज्य बुद्धि कायम राहील; ह्यालाच दुसऱ्या शब्दांत संसाराचें चीज ह्मणतात.

२ जनांत ज्यारीतीनें लोकांनीं आपणाशीं वागावें असें आपण इच्छितों त्याच रीतीनें आपण लोकांशीं वागलों तर हटकून अपली इच्छा तडीस जाते.

३ जसें आपण ज्याशीं वर्तन करतों तसें त्याच्याविषयीं विचार आपल्या मनांत येतात.

४ जनांत ह्मणजे संसारांत मुख्या गोष्ट ही कीं विनाकरण कधींही आपणाकडून कोणाचें मन दुःखविलें जाऊं नये, कारण तसें केल्यानें आपलें मन आपणाला पुढें खातें किंवा आपणास पश्चात्ताप उत्पन्न होतो व आपणाकडून ज्याचें मन दुःखविलें गेलें असेल त्याच्या मनांत उदासीनता उत्पन्न होऊन आपल्या विषयीं संताप क्रोधही उत्पन्न होतो. एकंदरींत असें केल्यानें जगांत जो आनंदानें काळ क्रमण करावयाचा त्याच्याबद्दल्यांत उभय पक्ष, ह्मणजे आपण व ज्याचें मन आपल्याकडून दुःखविलें गेलें असेल तो, आनंद रहित होऊन दुःखी होतो, व त्याला आपलीच वर्तणूक कारण असल्यानें आपल्याकडे विशेष वाटणी असते कारण आपणाला संतोष मानण्यास कोणताही आधर नसतो.

५ जनांत आपणाच्यानें दुसऱ्याच्या जितकें उपयोगीं पडवेल तितके पडण्यास आळस करूं नये कारण प्रतिष्ठा व कीर्ति संपादन होण्यास दुसरामार्ग नाहीं.

६ जनांत सर्वांशीं नम्र पणानें वागावें आणि मधुर व सत्य बोलावें, कारण त्यापासून आपण सर्वांस प्रिय होतों व आपल्या करणीवर व बोलण्यावर सर्वांचा विश्वास असतो, व आपल्यावर विश्वास असल्यानें आपण त्यांचें व आपलें कल्याण करण्यास थोड्या श्रमानें यशस्वी होतों. व आपल्यावर सर्वांची प्रीति असल्यानें आपला काळ आनंदात व प्रातिष्टेंत जातों.

---

# समान परतंत्रता.

१ समान परतंत्रता ह्मणजे आपल्या बरोबरीचा किंवा समान असून त्याच्या ताब्यांत किंवा त्याच्या तंत्रानें चालण्याचा प्रसंग आला असतां कशा रीतीचें वर्तन ठेवावें कीं आपणाला धक्का न बसतां व त्याच्याशीं बिघाड न होतां आपण पार पडूं.

२ आपल्या बरोबरीचा असून आपणाला त्याच्या तंत्रानें किंवा त्याच्या इच्छेनुरूप वर्तण्यास भाग पडण्याचें कारण त्याच्यापेक्षां आपल्यांत कांहीं तरी कमतरता असली पाहिजे, किंवा त्याच्यापासून आपणाला नुकसान होण्याचा संभव असलापाहिजे, अगर त्याचें सहाय प्राप्त झाल्यास त्यांत आपला कांहीं तरी लाभ असला पाहिजे. मतलब, असा प्रसंग आला असतां त्याच्याशीं बिघाड न करितां आपलें काम साधणें हें शहाण पणाचें होय.

३ आपल्या बरोबरीचा असून त्याच्या तंत्रानें वर्तन केल्यानें

एकतर त्याच्या पेक्षां आपलें वजन कमी होतें, दुसरें आपणाला अपमान सहन करावा लागतो, तिसरें आपलें वजन कमी झाल्या मुळें त्याच्याशिवाय स्वतंत्रेतेनें आपण कोणतेंही काम करूं शकत नाहीं; आणि दुर्दैवानें तो दुर्जन असला तर आपणाशीं मिजासेनें वागतो व आपला अपमान करण्यांस मागें पुढें पहात नाहीं व मी तुझें कल्याण करणारा किंवा करतो यास्तव तूं माझ्याशीं नम्रतेनें वागलें पाहिजे असा आपल्या मनांत भास होईल असें वर्तन करतो व जर तो चढाऊ असला तर तोंडावर किंवा दृष्टांतर रूपानेंही सांगून दाखवितो. एकंदरींत आपल्या फायद्या करितां आपणास येवढा जाच सहन करावा लागतो.

४ आतां आपला लाभ साध्य होऊन आपणास वरचा जाच सहन करावा न लागेल किंवा कमी सहन करावा लागेल असें वर्तन ठेवणें भाग आहे. तर एकतर त्याच्याशीं फार बोलू नये, दुसरें बनेल तोंपर्यंत त्याची इच्छा त्याच्या मुखांतून निघण्याच्या अगोदर तदनुरूप वर्तन करावें; तिसरें त्याच्या पेक्षां आपणांत जी कमतरता असेल, ती भरून काढण्यास प्रयत्न करावा; चवथें मध्यम स्वतंत्रेतेनें ह्मणजे त्याला आपला अपमान झाला असें न वाटेल असें वर्तन ठेवावें; पांचवें आपणाला त्याच्या पासून जसा लाभ आहे तसा त्याला आपल्या पासून लाभ होईल असें बनेल तोंपर्यंत करावें, परंतु आपणाला जो लाभ त्याच्या पासून होणार आहे त्याच्याहून अधिक किंवा समान तोटा आपणास होउं नये; सहावें त्याच्यावरच अवलंबून न रहातां पुढें सरण्यास शांतपणानें व पूर्ण विचारानें प्रयत्न करावा

[ जर तो दुर्जन असेल तर ]; सातवें आपला भार त्याच्यावर कमी कशा रीतीनें पडेल ह्याचाही विचार करून वर्तन करावें. आठवें त्याच्याशीं बोलण्यांत व वागण्यांत विचारानें चालावें कीं विनाकारण आपणास हलकें पाडण्यास त्याला कारण सांपडणार नाहीं.

---

# परतंत्रता.

१ परतंत्रता म्हणजे दुसऱ्याच्या इच्छेनुरूप वागणें, अथवा आज्ञानुसार वर्तन करणें.

२ आपल्या शुभेच्छकाच्या इच्छेनुरुप वर्तणें हें आपल्या फायद्या करितां आहे; परंतु परक्याच्या तंत्रानें वागण्याचा प्रसंग येणें हें आपल्या अनिष्टास व त्याच्या हितास कारण होय.

३ जितकी परतंत्रता जास्ती असते तितकी जोखीम कमी असते.

४ जितकी स्वतंत्रता असते तितका मनुष्य काळजीनें महेनतीनें व दक्षतेनें वागतो.

५ जितकी परतंत्रता असते, तितका मनुष्य निष्काळजी, अव्यवस्थित दुसऱ्यावर अवलंबून, व निरुत्साही असतो.

६ परतंत्रता दुर्बळास आपल्या बचावा करितां स्वीकारावी लागते किंवा कबूल करावी लागते ह्मणजे परतंत्रता ही दुर्बलाचें सबळापासून रक्षण करविते.

७ शक्ति असून विनाकारण आळसांत राहून किंवा निष्काळजीत पडून परतंत्रानें वागणें ह्मणजे दुसऱ्यावर अवलंबून राहणे हें लज्जास्पद कर्म होय. कारण परक्याच्या ताब्यांत रहाणें हें निर्बळतेचें चिन्ह आहे.

८ परक्याच्या ताब्यांत रहाणें हें, मान, वित्त, लाभ, ह्याच्या नाशास कारण होय.

९ आपल्या शुभेच्छकाच्या ताब्यांत रहाणें हें, मान, वित्त, लाभ ह्याच्या वृद्धीस व आपल्या कमअक्कलेमुळें किंवा अक्कलहीन शक्तीमुळें आपला नाश न होतां निभाव लागण्यास कारण होय.

१० एकंदरींत आपल्या दुर्बळतेच्या वेळेस दुसऱ्याच्या ताब्यांत राहून वर्तमान काळीं आपला निभाव करून घेणें, व भविष्य काळीं स्वतः स्वतःचा बोजा उचलण्यास सामर्थ्यवान् होऊन परतंत्रतेच्या भारांतून मुक्त होणें हें शहाणपणाचें चिन्ह होय.

---

# काळ--वेळ.

१ वेळ, वक्त, स्थिति ह्या तीन शद्बाच्या अर्थाचा काळ ह्या शद्बांत समावेश होतो; व कृति किंवा कृत्य ह्याच्या अर्थाचा समावेश स्थिति, वेळ वक्त ह्यांत होतो.

टीका—कृति किंवा कृत्याप्रमाणें वेळ येतेवेळेस अनुसरून स्थिति होते.

२ वेळेच्या ( स्थितीच्या ) शक्तिनुरूप दर्वेकाराच्या स्वाधीन न

होतां, सुविचारास अनुसरून उपयोग केला तर काळ हा प्रभू-च्या कृपेचा प्रसादरूप होय.

वेळेच्या ( स्थितीच्या ) दुर्विकाराच्या स्वाधीन होऊन दूरुपयोग केला अथवा उपयोगच न केला तर दुःख कारक शासन रूप होय. ( काळ )

टीका—वेळ व तरवार ही दोन्ही समांन होत कारण सदुपयोग केला तर जशी तरवार आपल्या शत्रूचा नाश करून आपला बचाव. करते. (शत्रूपासून) तद्वत् वेळेचा सद्रुपयोग केला तर दुर्विकाराचा आपोआप नाश होतो. व त्याच्या ठायीं सद्‌गुणाचा प्रवेश होऊन पश्चातापरहित आपलें आयुष्य आनंदांत, यशांत व सुखांत जातें.

३ कृतिही काळास कारण आहे काळ, व हा कृतीस फळीभूत किंवा निष्फळ करण्यास कारण आहे.

४ काळ हा चमत्कार पाहून आश्चर्यांत गर्क होण्याचा ( आनंदात मग्न ) ह्याच्याहून उलट शुद्धीवर येण्याचा व ह्याच्याहून उलट वर्तमान किंवा भावी दुःखात ( मूर्खास ) गर्क होण्याचा आरसा होय.

टीका.-एक काळीं हर्ष, यश, धन, कीर्ति, विद्या, शक्ति हक्क, उदय; प्राप्त होतात, एके काळीं दुःख, अपयश, नाश, मूर्खता, निर्बळता, अस्त प्राप्त होतात; तेव्हां हे बनाव पाहून साधु आश्चर्यांत गर्क होउन प्रभूच्या लीलेचा आनंद मानतात व नम्रता गृहण करित जातात. सूज्ञ सावध होऊन दुर्विकारापासून आपणास बचावून घेतात व मूर्ख दुःख करून निरुत्साही होतात किंवा गर्वांत फुगून बेफाम होतात.

६ मनुष्यानें कृपणता न करतां उपयोगच करावा अशी परमेश्वराची प्रसादरूप वस्तु काळ किंवा वेळ हीच आहे. कारण हिचा जर उपयोग न केला तर ती आपण गमाविली असें होतें. कारण ती पुन्हा आपणाला मिळत नाहीं. तर हिचा ( वेळेचा ) उपयोग करून न घेणें हें आपणाजवळची आपणास अत्योपयोगी अशी वस्तु गमाविण्याची इच्छा करण्या बरोबर चातुर्याचें काम [ कृति ] होय.

---

# एकांत.

१ एकांत ह्मणजे एकाशिवाय दुसरा नाहीं असें स्थळ अर्थात स्वतःशिवाय दुसऱ्याचा जेथें उपसर्ग नाहीं असें स्थळ किंवा वेळ.

२ एकांतांत मनुष्याला कोणाचा उपसर्ग किंवा कोणत्याही प्रकारची हरकत नसल्यानें त्याचें मन स्थीर असतें. उलट एकांतांत मनुष्याला कोणाची मदत किंवा आश्रय अथवा आशा नसल्यामुळें त्याचें मन धास्तींत, खिन्नतेंत व निराशेंत असतें.

३ दृढ मनुष्य आपलें मन स्थीर करण्यांत, बुद्धिमान मनुष्य विचार करण्यांत, उद्योगी काम करण्यांत, ईश्वरभक्त परमेश्वराची भक्ति करण्यांत,निर्मळ व कोमळ अंःतकरणाचीं मनुष्यें आपल्या दुष्ककर्मा बद्दल पश्चात्ताप करून पुनः असें न होऊं देण्यावि-

षयीं ईश्वराची प्रार्थना करण्यांत व पुनः असें न करण्याविषयीं निश्चय करण्यांत, दयावंत परक्याच्या दुःख विमोचनाच्या उपायाचा विचार करण्यांत, सूज्ञ सर्वांच्या सुखाच्या साधनांचा विचार करण्यांत, एकांताचा लाभ घेतात. उलट आळशी मनुष्य कुंभकर्णा सारखे खुशाल निद्रपद भोगण्यांत, कुटिल आपलें दुष्कर्म साधण्याचा विचार करण्यांत, शठ दुसऱ्यांस आपल्या पासून पीडा कोणत्या प्रकारें होईल ह्याचा विचार करण्यांत, स्वतःच्या परिणामाचा विचार न करितां गाफिलींत रहाणारे, चैनीचैनीचे व ऐषआरामाविषयीं नानाप्रकारचे तरंग मनांत अणून मग्न रहण्यांत, व निशेमध्यें चकचूर होण्यांत, चुगलखोर व वरफोडे आपला बेत सिद्धीस नेण्याचा विचार करण्यांत, व कोणत्याही कारणानें कुबुद्धीनें ज्याला वेष्टिलें आहे असे मनुष्य, कुबुद्धि जो रस्ता दाखवील तीकडे विचार केल्याशिवाय एकदम गमन करण्यांत किंवा तदनुरूप आचरण करण्यांत व ज्याच्या हातून दुष्कर्म झालें आहे असे मनुष्य आपलें दुष्कर्म छपविण्या करितां उलट कुकर्म करण्यांत एकांताचा दुरुपयोग करितात.

४ सर्व अपराधांचें मूळ व सर्व अचाट आणि आश्चर्यकारक कार्यांची माता एकांत आहे.

# आप्तधर्म.

१ आप्त म्हणजे सोयरे, संबंधी, इष्ट, अर्थात परस्पराचें हित व कल्याण करणारे.

२ आप्तवर्गाशीं नम्रतेनें वागावें.

३ आप्त वर्गाच्या संकटाच्या वेळीं त्यांनां बनेल तेवढी मदत करावी.

४ आप्तवर्गाचें आपल्याच्यानें होईल तेवढें कल्याण करावें.

५ आप्तवर्गास आपल्याच्यानें बनेल तोंपर्यंत संतोषित ठेवावें.

६ आप्तवर्गाविषयीं तिरस्कार करूं नये.

७ आप्तवर्गाची निंदा करूं नये.

८ आत्पवर्गाची बेपर्वाई करूं नये.

९ आत्पवर्गाला त्रास होईल असें करूं नये.

१० आत्पवर्गाला बुडविण्याची दानत ठेऊं नये.

११ आत्पवर्गाच्या नुकसानींत खूष होऊं नये. ह्या प्रमाणें वर्तन केल्यास आपण त्यांची प्रीति संपादन करून त्यांच्यापासून मान पावूं.

---

# मित्रधर्म.

१ मित्र म्हणजे आपलें हित इच्छिणारा प्रसंगीं शक्तिप्रमाणें सहाय्य करणारा व मनास आनंद किंवा करमणूक देणारा.

२ मैत्री जोडण्यास तत्पर असावें कारण त्यानें आयुष्य आनंदात जातें.

३ मित्राशीं लबाडी करूं नये. नाहींतर अविश्वास उत्पन्न होईल.

४ मित्र निर्लोभी निष्कपट व सज्जन असवा कीं सुख होईल.

५ मित्राशीं फाजील मस्करी करूं नये, कीं मित्रता नष्ट होईल.

६ मित्राला सुख होईल असें करावें कीं प्रीतींत वृद्धि होईल.

७ मित्राच्या विचाराचें मनन करावें कीं आपण त्याचा लाभ घेऊं शकूं.

८ मित्राशीं अभिमानानें वागूं नये कीं बेपर्वाई उत्पन्न होईल.

९ मित्राला हलकें पाडण्याचा प्रयत्न करूं नये, कीं तिरस्कार उत्पन्न होईल.

१० मित्राला फाजील घस देऊं नये, कीं त्याला त्रास न होईल.

११ मित्राची निंदा करूं नये कीं संशयाला जागा न मिळेल.

१२ मित्रास योग्य कारणासाठीं हळुं नम्रतेनें व युक्तीनें ठपका द्यावा, कीं, त्याच्या मनांत विपरीत न येतां त्याचा फायदा होईल.

१३ मित्रास प्रसंगीं वाटेल तें झालें तरी सोडूं नका! व घस घेऊनही साह्य केल्यावांचून राहूं नका, कारण ह्यानें प्रीतिधडा दुसऱ्यांस घेतां येईल.

**टीप.** हें सज्जनांच्या मित्रतेंत लागू आहे; परंतु (व्यसनीखेळ, गडी,) वाईट चालीचे, परद्वार गमनी, उधळे, कर्जबाजारी, राजद्रोही, चोरटे, निंदक, खोटें बोलणारे, हांजीहा करणारे ह्यांच्या-

शीं मनापासून मित्रता जोडूं नका, व सोबत करूं नका. दैवयोगानें झालीच तर त्यांच्या गळ्यास मिठी मारूं नका, पण दूर व्हा.

---

# गुरुधर्म.

१ गुरु ह्मणजे शिष्याला अयोग्य त्रास न देतां निष्कपटानें विद्या शिकऊन त्याचें कल्याण इच्छिणारा व त्याच्या उत्कर्षा विषयीं अभिमान ठेवणारा.

२ गुरूनें शिष्याला मुलाप्रमाणें मानावें कीं त्याच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होईल.

३ गुरूनें शिष्याचें कल्याण इच्छावें, कीं आपलें कर्तव्यकर्म पूर्ण होईल.

४ गुरूनें शिष्याला निष्कपटानें विद्या शिकवावी कीं त्याचें कल्याण होईल.

५ गुरूनें शिष्याशीं मर्यादेनें वागावें कीं तो आपणाशीं योग्य रीतीनें वर्तेल.

६ गुरूनें शिष्याला नीतीनें वागण्यास शिकवावें कीं तो दुर्गुणापासून मुक्त होईल.

७ गुरूनें शिष्याला व्यवहारिक ज्ञान शिकवावे कीं त्याचें आयुष्य सुखांत जाईल.

८ गुरूनें शिष्याला स्वधर्माच्याठायीं स्थैर्यता ठेविण्यास शिकवावें कीं त्याचें अंतःकरण शांत राहील.

९ गुरूनें शिष्यावर अति कडकपणा ठेऊं नये कीं तो त्रासून जाईल.

१० गुरूनें शिष्याशीं अतिनम्रपणा ठेऊं नये कीं त्याच्या मनाची वचक जाईल.

---

# शिष्य धर्म.

१ शिष्य ह्मणजे गुरूची सेवा करून व नम्रपणानें वागून विद्या संपादन करून, गुरूला यश देऊन आपलें ही कल्याण करून घेणारा.

२ शिष्यानें गुरूचे आज्ञेंत वागावें कारण त्याची आज्ञा शिष्याच्या कल्याणाची असते.

३ शिष्यानें गुरूशीं नम्रतेनें वागावें कीं त्याच्या आज्ञा पाळण्यांत बेपर्वाई होणार नाहीं.

४ शिष्यानें गुरूची सेवा करावी कारण हाच गुरूपासून विद्या संपादन करून घेण्याचा उत्तम उपाय आहे.

५ शिष्यानें गुरूला मान द्यावा कारण तो त्याचा उपकारी आहे.

६ शिष्यानें गुरूला त्रास देऊं नये कारण आपणाला विद्या शिकविण्यास त्याला कंटाळा न येईल.

७ शिष्यानें गुरूची निंदा करूं नये कारण शिष्याच्या मनानें जो निंदेस पात्र आहे, त्याचीच विद्या शिष्यानें संपादन केलेली आहे.

८ शिष्यानें गुरूचें बनेल तेवढें कल्याण करावें कारण तो त्याचा ऋणी आहे.

९ शिष्यानें गुरूवर प्रीति ठेवावी कारण ते त्याचें कल्याण करणारे आहेत.

१० शिष्यानें गुरूला हलकेंपणा येईल असें कर्म करूं नये, कीं ज्या पासून त्यांनां (गुरूस) दुःख होऊन आपलीही अप्रतिष्ठा न होईल.

---

# भोजन.

१ भोजन ह्मणजे जीव संरक्षणार्थ व पोषणार्थ अन्न, फळें वगैरे भक्षण करणें.

२ भोजन नियमित वेळीं करावें कीं प्रकृति बिघडणार नाहीं.

३ भोजन साधें व निर्मळ असावें किं आपणास तें न बाधेल.

४ जड भोजन वारंवार जेऊं नये कीं अरुचि.र लागेल व पाचन शक्ति कमी होईल.

५ भोजन अहारावर जेऊं नये कीं अजीर्ण होईल.

६ जेवतांना फार बोलूं नये किंवा अपशब्दांचा उच्चार करूं नये

किंवा वाईट गोष्टी विषयीं विचार करूं नये कीं अन्न अंगीं न लागेल.

७ जेवतांना क्रोध किंवा संताप करूं नये किं पित्ताग्नि भडकेल.

८ जेवण फार मंद करूं नये किं आपला वेळ फुकट जाऊन पंक्तिच्यांनांही खोटी व्हावें लागेल.

९ जेवण अति ऊनऊन जेऊं नये किं काळीज व आतड्यांना इजा होईल.

१० जेवण फार उतावळीनें जेऊं नये कीं घास मानेंत अडकेल.

११ जेवण अति मिष्ट नसावें किं वीट येईल.

१२ जेवण अति तिखट नसावें की अंगाची आग होईल.

१३ जेवणाचें खरोखर सुख ज्याला मेहनतीनें श्रम झाले आहेत व पक्क क्षुधा लागली आहे त्याला मात्र प्राप्त होतें.

---

## गमन.

१ गमन ह्मणजे स्थान सोडणें अथवा एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाणें.

२ कामाशिवाय कोणाकडे जाऊंनये कीं आपला वेळ व श्रम फुकट जाऊन आपली प्रतिष्टा कमी होईल.

३ कोणाच्या एकांतांत कारणा शिवाय जाऊं नये कीं त्याला आपला त्रास होईल.

४ अति जरूरीच्या कामा शिवाय अवेळीं ( जेवणाच्या किंवा घर कामाच्या अथवा उन्ह, पाऊस वगैरे असल अशा वेळीं) घरांतून गमन करूं नये कीं मुख्य काम एकीकडे राहील किंवा व्यर्थ आपण श्रम घेतल्या सारखें होईल.

५ अपरात्रीं संरक्षणाचा उपाय योजिल्याशिवाय आणि अगत्याच्या कामाशिवाय बाहेर उगाच जाऊं नये कीं हानी अथवा व्यर्थ त्रास मात्र विशेष असें होईल.

६ शत्रूच्या गृहीं योग्य कामाशिवाय व अवेळीं आणि एकटे जाऊं नये कीं आपण होऊन त्याच्या भक्षस्थानीं पडूं.

७ देशांतरीं जाणें झाल्यास घरची व्यवस्था अगोदर लावावी कीं घरच्या मनुष्यांना आपल्या पाठीमागें अडचण न येईल.

८ घरांतून बाहेर पडतांना शक्तिप्रमाणें स्वच्छ व चांगलें वस्त्र घालावें कीं आपली अपरिचित मनुष्यापासूनही मान हानी न होईल.

९ आप्तवर्ग व इष्टमित्र ह्यांच्या समाचारास योग्य वेळीं जाण्यास हयगय करूं नये कीं संघट्टण कायम राहील (व्यवहार).

१० परगांवीं जातांना चालेल तोंपर्यंत भोजन करून जरूर त्या वस्तु बरोबर घेण्याचें विसरूं नये कीं क्षुधेनें पीडित बहुदा आपण होणार नाहीं, व जरूर वस्तूंची आपणास हरकतही पडणार नाहीं.

११ मनुष्यानें बनेल तर सकाळीं नाहींतर सायंकाळीं स्वच्छ उघड मैदानांत किंवा बागेंत व्यायाम करावा कीं प्रकृति चांगली राहील; ह्या गोष्टीकडे शहरांत रहाणारानें विशेष लक्ष द्यावें.

---

# कुटुंबवर्तन.

१ कुटुंबांत ह्मणजे आपला व ज्यांचा निकट कामाचा संबंध आहे, व परस्परांच्या हितहितांचें व सुख दुःखाचें परस्परांवर दृढीकरण आहे व ज्यांनां मदत करण्याचें आपलें व आपणास मदत करण्याचें ज्यांचें कर्तव्य कर्म आहे अशा मनुष्यांत रहाणें असल्यास कशा प्रकारचें वर्तन ठेविलें पाहिजे कीं, त्यापासून उभयतांस सुख व यश प्राप्त होईल.

२ आईबाप ह्यांच्याशीं निष्कपट, नम्र व आज्ञाधारक वर्तन ठेवावें. कारण निष्कपटवर्तन न ठेवलें तर त्यांच्या मनांत आपल्याविषयीं संकोच व शोक वाटतो, आणि त्यांचें मन आनंद रहित रहातें, व आपणास ते एक अमोल्य दुर्मिळ व प्रिय वस्तु वाटण्याच्या ठिकाणीं त्रास व अडचण कारक बोजा रूप वाटतात .त्यामुळें आपलें वर्तन त्यांनां अपमान लागेल असें होत जातें. ह्यामुळें ते व आपण दोघेही असुखी होतो व आपणाकडे जगाचें हास्य तिरस्कार व अयोग्य वर्तनाचा कलंक हे विशेष येतात. नम्र वर्तन न ठेवलें तर त्यांच्या मनाचा संतोष न झाल्यानें त्यांच्या बद्दल आपण घेतलेलें श्रम व्यर्थ

होतात ह्यामुळें आपणासही दुःख होतें. आज्ञाधारकपणा न ठेविला तर त्यांनां अपमान वाटतो, व त्यांची आज्ञा आपल्याच हिताची असते ह्यामुळें आपणच आपलें अहित करून घेतल्या सारखें होतें.

३ बहीणभाऊ ह्यांच्याशीं सरळ, चोख निष्कपट मायेचें वर्तन ठेवावें, व कलह न करितां आनंदांत रहावें. ह्यांच्याशीं सरळ-पणानें न वागलों तर धुसपुस हमेश होत जाते व त्यांतून एकमेकांविषयीं तिटकारा उत्पन्न होतो व ह्यामुळें ते व आपण दोघेही आनंदापासून मुकतो. चोख वर्तन न ठेविलें तर एकमेकां-च्या मनांत परस्परांविषयीं संशय उत्पन्न होऊन शुद्ध पर-स्पर प्रीतीचें जें सुख त्यांत दांभिकपणाचा प्रवेश होऊन त्याला [ सुखाला] कीड लागते, व निष्कपटमाया [ अर्थ किंवा मतलबाशिवायची प्रीति किंवा शुभेच्छुकपणा ] ही न ठेविली तर परस्पर लज्जास्तव व वरवर प्रीति दाखविण्यांत येते. ह्यामुळें आपण व ते दोघेही खऱ्या प्रीतीच्या सुखापासून मुकतो, व ह्याला आपलें वर्तन कारण असल्यामुळें आपणास विशेष वाईट वाटतें.

४ काका, मामा, ह्यांच्याशीं नम्र व मर्यादपणानें वर्तावें, व त्यांच्या-विषयीं शुभेच्छुकपणा ठेवावा कीं त्यांना आपल्याविषयीं संतोष राहून त्यांच्या मनांत प्रीति कायम राहील.

५ काकी, मामी, मावशी, आत्या ह्यांच्याशीं मर्यादपणानें वर्तावें व नम्र बोलावें व शक्तनुसार मदत करावी व त्यांच्या मुला-

बाळांवर प्रीति ठेवावी, ह्मणजे त्यांनां आपल्याविषयीं आनंद होईल व आपणास वाखाणतील.

६ सासुसासरे ह्यांच्याशीं नम्र व मर्यादपणाचें वर्तन ठेवावें कीं त्यांना आपल्या विषयीं आनंद होईल.

७ मेहुणमेहुणी ह्यांच्याशींही त्यांचें मन न दुखवेल असें वर्तन ठेवावें. कारण उगाच अहंपणानें राहून आपल्या मनास कोंडून ठेवण्यांत काय अर्थ आहे?

८ आप्तवर्ग ह्यांच्याशींही मिलनसारपणाचें वर्तन ठेवावें व बनेल तोंपर्यंत त्यांनां संतोष होईल असें करावें.

९ चाकर माणसाशीं गोडी गुलाबीनें कामा पुरतें बोलवें व चोख वर्तन ठेवावें, त्यांच्या दुखण्याच्या व उदासीनतेच्या वेळेस त्यांना संतोष होईल असें वर्तावें, व त्यांच्या कामाची बूज व सोय जाणावी, त्यांनां हलकट व नीच शह्वांनीं बोलावूं नये किंवा शिव्या देऊं नये. असें केल्यानें एकतर प्रामाणिक होतात आंग मोडून मेहनत कारितात व आपणावर खूष असतात.

१० सावकाराशीं प्रामाणिक चोख व व्यवस्थेशीरपणानें वर्तावें व आपली प्राप्ति पाहून काम करावें किं आपला व्यवहार कायम राहील व आपण अडचणींत येऊन आपणास दुःख व पश्चात्ताप होणार नाहीं.

---

# नृपधर्म.

१ राजा ह्मणजे दुर्जन अधर्मी मदान्मत्त इत्यादि दुष्ट जनांचा नाश करून किंवा त्यांच्या वृद्धिची सव्दर्तनाकडे प्रवृत्ति करून त्यांच्या पासून अनाथ वृद्ध अशक्त सज्जन उद्मी वगैरेंचें रक्षण करून आपले धर्म बजावितो अर्थात काम अर्थ मोक्ष धर्म ह्याच्या ठायीं प्रकाशमान होतो.

२ राजानें प्रजापालकाच्या कामांत दक्षता ठेवावी कीं आपल्या गाफील पणाचा लाभ लुच्चे मनुष्य न पावतील.

३ राजानें दुर्जनांशीं निर्दयपणानें वागावें कीं त्यांना दहशत राहील.

४ राजानें सत्यावर प्रीती ठेवावी कीं खुशामति बडेजाव शद्बांनीं तो वेष्टित न होईल.

५ राजानें न्यायांत निस्पृहता ठेवावी ह्मणजे प्रजाजनांचा विश्वास निरंतर वृद्धिंगत होत जाईल.

६ राजानें उदार मन ठेवावें ह्मणजे सर्व प्रजाजन संतोषांत निमग्न राहतील.

७ राजानें रणांत शौर्यता ठेवावी कीं स्वपक्षाच्या लोकांना धैर्य येऊन ते स्वामी कार्यार्थ आपल्या जिवाकडे न पहातां शत्रूचा पराभव करतील व स्वामिभक्तीचा बाणा नित्यशः मनांत बाळगतील.

८ राजानें दुःखितावर दया करावी कीं त्यांचें दुःख निवारण झा-

ल्यानें ते आपल्या नृपाळाचें नित्यशः कल्याण चिंततील.

९ राजानें निर्बळांचें रक्षण करावें कि त्याचें वजन वाढेल.

१० राजानें शरणागतांनां अभय द्यावें कीं त्यांचें रक्षण होऊन किर्ति होईल.

११ राजानें राजकार्यांत विचारीपणा ठेवावा कीं तें पार पडेल.

१२ राजानें राजकार्यांत दूर दृष्टि ठेवावी कीं,चुकीचा भयंकर परिणाम न होईल.

१३ राजानें बोलण्यांत माधुर्य ठेवावें कीं तो लोकप्रीय होईल.

१४ राजानें द्रव्य व राज्य वाढविण्याविषयीं उत्सुकता ठेवावी कीं आपणालाही फायदा होऊन बुद्धिमान् पुरुष वर तरून येतील.

१५ राजानें वृद्ध विद्वान् साधु गुरु वडील ह्यांच्या ठिकाणीं नम्र असावें कि आपल्या ज्ञानाची वृद्धि होऊन त्याचा मान राहील्यानें ते ही संतुष्ट राहतील.

१६ राजानें व्यापार कला कौशल्य वृध्दिगत करण्यांत सहाय्य करावें कीं देश सधन होईल.

१७ राजानें विद्येविषयीं अभिलाष ठेवावा कीं त्याची वृध्दि होऊन प्रजा अज्ञानापासून मुक्त होईल.

१८ राजानें प्रजेच्या कल्याणाविषयीं हर प्रयत्नांनें उपाय करावें कीं आपल्या राज्यांतील अनेक अन्याय नाहींसे होतील.

१९ राजानें हरएक कामाचा तपास केल्यावर त्या कामाचा ठराव करावा. कीं सहसा अन्याय न होईल.

२० राजानें फिर्याद ऐकण्यांत कंटाळा किंवा त्रास करूं नये कीं जुलमी फावले जातील.

२१ राजानें आवका पेक्षां जास्त खर्च न करावा कीं प्रजाजनांला जास्त कराच्या बोजाखालीं टाकण्याचा प्रसंग न येईल.

२२ राजानें स्वकीय बलाबल पाहून कार्य करावें कीं संकट प्राप्त न होईल.

२३ राजानें कार्य करण्यांत त्याचा अगोदर परिणाम नड उपाय शक्य अशक्य ह्याचा विचार करावा कीं पश्चात्ताप न होईल.

२४ राजानें स्वकीयांना साम दाम भेद दंड याहीं करून ताब्यांत ठेवावें कीं फूट न होईल.

२५ राजानें परस्थळ परदेश व स्वराज्यांत विश्वासू व गुप्त बातमी दार ठेवावें कीं आपणाला संकटां पासून सावध होऊन उपाय करण्यास वेळ सांपडेल.

---

## प्रजाधर्म.

१ प्रजा ह्मणजे तिचें जो पालन करील त्याला स्वसंरक्षणाप्रित्यर्थ आपल्या उत्पन्नाचा नियमित हिसा देऊन त्याच्या आज्ञेंत राहीतील.

२ प्रजेनें राजाच्या आज्ञा मान्य करणें व त्या प्रमाणें वर्तणें ह्मणजे स्वतांच्या रक्षणाच्या कामांत हरकत न करणें.

३ प्रजेनें राजाला योग्य कर देण्यांत जुलूम समजूं नाहीं, कारण त्याच्या बदल्यांत राजापासून सरंक्षण विकत घेते.

४ प्रजेनें राजाच्या विरुद्ध प्रयत्न करणें ह्मणजे आपल्यावर जास्त-कर किंवा संकट ओढून घेणें होय.

५ प्रजेनें राजाशीं एक निष्टेनें असावे कीं राज्य मजबूत झाल्यानें प्रजेला आपली स्थिति सुधारण्यांत उत्तेजन व वेळ मिळेल.

६ प्रजेनें आपआपसांत एक विचारानें चालावें कीं राजाला मध्यें पाडण्याचा त्रास पडणार नाहीं.

७ प्रजेनें नाना व्यापार उद्योगकरोंव किं स्वतःचें पोषण करून राजाला कर देण्यास जडपडणार नाहीं.

८ प्रजेनें राजाचा अभिमान धरावा कीं त्याला विश्वास राहील.

९ प्रजेनें राजाच्या अन्याया बद्दल उतावळि न होतां त्याच्या जवळूनच चालेल तों पर्यंत सुधारा करवावा कीं शांतता कायम राहील.

१० प्रजेनें स्वराज्याच्या जुलमानें त्रासून एकाएकी विचार न करितां दुसऱ्या राजाचा आश्रय मागण्यास जाऊं नये किं विकत दास्यत्व घेतल्यासारखें होईल.

# वृद्धधर्म.

१ वृद्धास्था म्हणजे पूर्ण संसारसुख अनुभवून आपण संपादन केलेल्या ज्ञानानें, अनुभवानें दुसऱ्याचें कल्याण करण्याची व स्वतःच्या मोक्ष साधनाची वेळ.

२ वृद्धमनुष्यानें कोणावर फार रागाऊं नये-कारण आखेरच्या वेळेस आपली प्रतिष्टा यत्नानें संभाळावी.

३ वृद्धमनुष्यानें धिमेपणानें व युक्तीनें दुसऱ्याला ज्ञानाच्या अर्थात त्याच्या हिताच्या गोष्टी सांगाव्या कीं आपल्याकडे तो मानाने वर्तेल.

४ वृद्धमनुष्यानें घर संबंधीं खटपटींत [ भांडण वगैरे ] फार पडूं नाहीं कीं घरची मनुष्ये आपला फार त्रास न करतील.

५ वृद्धमनुष्यानें आनंदित रहावें कीं दुसरी मनुष्यें रिकाम्या वेळीं आपल्या जवळ येऊन बसतील कीं ज्या मुळें उभय पक्षाची वेळ कर्मणुकींत जाईल.

६ वृद्धंमनुष्यानें फार निजूं नये कीं त्याची प्रकृति बिघडेल.

७ वृध्दमनुष्यानें चालेल तोंपर्यंत उद्योगी रहावें कीं तो प्रिय होईल.

८ वृध्दमनुष्यानें घरांत सर्वांशीं सारख्या भावानें वागावें कीं

त्याच्या विषयीं कोणाच्या मनांत वाईट न येईल.

९ वृध्दमनुष्यानें वडीलपणा फार मिरवूं नये कीं दुसरे त्यांचा अपमान करण्यास तैयार होतील.

१० वृध्दमनुष्यानें सार्वजनिक उपयोगी कामांत आपल्या आयुष्याचा कांहीं वेळ तरी खर्च करावा कीं जगाला त्याचें आयुष्य किमती होईल.

११ वृध्दमनुष्यानें स्वतःचा पैसा स्वतःच्या ताब्यांत ठेवावा कीं त्याची आज्ञा उल्लंघन न होईल.

१२ वृध्दमनुष्यानें आहारांत वगैरे जपून वागावें कीं त्याच्या आयुष्याचे मागले दिवस सुखांत जातील.

---

## योवन धर्म.

१ योवन काळ ह्मणजे वृध्द बाळ स्त्री व अनाथ ह्यांचे रक्षण करून ( पोषण ) आपल्या वृद्धापकाळा साठीं धन संपादन व स्वदेश कल्याणाची कामें करण्याची वेळ.

२ तरुण मनुष्यानें बढाईच्या गोष्टी करू नये कारण तो काम करण्यास समर्थ आहे.

३ तरुण मनुष्यानें अति ममता करू नये कारण त्या पासून तो

आपले मुख्य कर्तव्य करण्या पासून अंतरतो.

४ ज्वान मनुष्यानें आपला परिणाम व स्थिति ह्या विषयीं विचार करावा कीं पुढें दुःख न होईल.

५ तरुण मनुष्यानें पैसा फारच जपून वापरावा कीं पुढें वृध्दापकाळीं अडचण न पडेल.

६ मनुष्याला ज्या वेळेस असे वाटेल कीं हे भाऊ वगैरे कोणी आपल्या उपयोगी पडणार नाहींत त्या वेळेस त्यानें असा ही विचार करावा कीं ही बायका मुलें आपल्याला उपयोगी पडतील हें तरी कशा करून?

७ जर मनुष्याला त्याच्या घरांतील कंकास विझविण्याची इच्छा असेल तर त्यानें आपले दोन्ही ओठ एकमेकाला चिकटवून ठेवावे.

८ तरुण मनुष्याला कुटुंबांत राहावयाचे असेल तर त्याला कांहीं गोष्टी विषयीं काना डोळा किंवा हेळसांड करावी लागेल व दुसऱ्याचा दोष मागच्या पडशींत व आपला पुढच्यात घालावा लागेल.

९ मनुष्याला किती ही काम भय ऋण दुःख असलें तत्रापि त्यानें आपल्या मनाची शांतता ठेवावी कीं तो निभावला जाईल.

१० तरुण मनुष्यानें बायकोवर प्रीति ठेवावी पण तिच्या कबज्यांत जाऊं नये.

११ मनुष्यानें मुलावर ममता ठेवावी पण त्याला आपली मर्यादा उल्लंघन करण्याची वेळ येऊं देऊं नये.

१२ तरुण मनुष्यानें प्रत्येक काम करते वेळेस ईश्वरा कडे पाहून करावे म्हणजे योग्य अयोग्य ह्याचा विचार करावा कीं आप-

त्या अविचारी उतावीळ व बेपर्वाईपणा बद्दल पश्चात्ताप करण्याची वेळ न येईल.

१३ तरुण मनुष्यानें वडीलाशीं अवश्य नम्रतेनें वागावें किं त्यांचा कोणी अपमान न करील.

१४ तरुण मनुष्यानें अतिशय जागूं नये. कीं त्याची प्रकृति बिघडेल.

१५ तरुण मनुष्यानें आळस टाकून उद्योग व श्रम करावें कारण दुसऱ्याचे पोषण व संरक्षण करण्याचा त्याच्यावर बोजा आहे.

१६ तरुण मनुष्यानें आपल्याच्यानें बनेल तोंपर्यंत दुसऱ्यावर उपकार करावा ( सुख द्यावे ) कारण पुढे त्याला दुसऱ्याच्या उपकाराची गरज पडणार आहे.

१७ तरुण मनुष्यानें जन व देश कल्याणाची कामें करावी कारण त्याला कीर्ति संपादन करण्याची ती वेळ आहे.

१८ तरुण मनुष्यानें निराश किंवा उदास होऊं नये कारण पुढें त्या पासून उद्योग श्रम आशा इत्यादिकाचा झरा बंद पडणार आहे.

---

# बाळधर्म.

१ बाळकाळ ह्मणजे दुसऱ्यांच्या संरक्षणांत राहून त्यांच्या आज्ञेंत वागून ज्ञानसंपादन करून घेण्याची वेळ.

२ मुलानें आपल्या लहान भावंडांवर सक्ती न करितां त्याला त्या-

च्या अभ्यासांत किंवा त्याचें मन रंजविण्यांत मदत करावी.

३ मुळानें आपणाला जें कांहीं मिळेल त्यांत आपल्या भावाला वाटून देऊन व आपण खाऊन संतोष मानावा.

४ मुलानें आपल्या वडिलांची अगर ज्यांच्या येथें तो असेल त्यांची, परम पूज्य गुरूची व जो कोणी आपल्या फायद्याचें सांगेल त्याची आज्ञा मान्य करावी.

५ मुलानें कधहि मोठ्या माणसाशीं तकरार करूं नये.

६ मुलानें सर्वांशीं विनयाने व गोड बोलावे, आणि सर्वांशीं मिळुन राहावे.

७ मुलानें खोटें बोलून आपला अपराध कधींही गुप्त ठेवण्याचा प्रयत्न करूं नये.

८ मुलानें खोटें न बोलण्या विषयीं प्रयत्न करावा ह्मणजे सहसा अपराध होणार नाहीं.

९ मुलानें कधींही स्वतंत्रपणानें निष्काळजीनें अव्यवस्थेनें वर्तू नये व अपरात्रीं बाहेर फिरण्यास निघू नये.

१० मुलानें गाणेंबजावणें ( अनीतीचें ) तमासे व नाटकें वगैरे पाहाण्याची चट ठेऊं नये.

११ मुलानें जुगार खेळूं नये व्यसन करूं नये.

१२ मुलानें पैशाचा लोभ करूं नये.

१३ मुलानें कोणाच्या घरीं कामा वांचून जाऊं नये.

१४ मुलानें वाईट मुलाची सोबत करूं नये.

१५ मुलानें अहारावर किंवा जेवल्यावर पुन्हां जेवूं नये.

१६ मुलानें मुलींशीं कामा वांचून बोलूं नये व बोलणें झाले तर

दुरून कामा पुरते बोलावें व कधींही त्यांच्याशी खेळू नयें व त्यांच्यांशीं एकांतीं बसूं नये.

१७ मुलानें पाहिलें तें घरांत मागूं नये.

१८ मुलानें चाकर माणसांशीं खेळूं नयें व कामावांचून फार बोलूं नये तसेंच अपशब्द बोलूं नये व मारूं नये.

१९ मुलानें आपल्याला योग्य व सुशील मुलाची सोबत करावी.

२० मुलानें आपल्या घरच्या माणसांना विचारल्या वांचून कांहीं करू नये.

२१ मुलानें अयोग्य हट्ट घेऊन घरच्या माणसाना त्रास देऊ नये.

२२ मुलानें पहाटेस उठून नित्य नियमाप्रमाणें शौच्य मुखमार्जन करून अक्षर वळविण्यास बसावें किंवा इतर अभ्यास करावा कारण प्रातः काळीं स्मरण व वर्तन जास्त दृढतर होत असतें.

२३ मुलानें पथारीतून उठल्या बरोबर व निजतांना परमेश्वराची अनन्यभावें प्रार्थना करावी.

२४ स्नान केल्यावर भोजन करावे जेवतांना उगाच बोलूं नये किंवा हांसूं नये.

२५ जेवल्यावर मुलानें शाळेंत जावें विद्यलयांत जातांना कोणाच्या खोडाळ्या काढूं नये व कांहीं पहात उभे राहूं नये.

२६ शाळेंत गेल्यावर मुलानें आपल्या अभ्यासाकडे लक्ष लावावें कारण ती वेळ शिकण्याची आहे.

२७ शाळेंत शिक्षक जें कांहीं सांगेल तें मुलानें आपल्या स्मरण-वहींत उतरून घ्यावें व घरी आपल्यावर ते पाठ करून चांगल्या वहींत शाईनें लिहून ठेवावे व त्याची नित्यशः पुनरावृत्ति करीत असावें.

२८ शाळेंत खेळण्याची ( विश्रांतीची ) एक तासाची किंवा अर्ध्या तासाची रजा मिळते त्यांत मुलानें खुशाल खेळावें पण आपला अभ्यास रात्रीं व लवकर करून ठेवला पाहिजे व खेळण्यांत चावटपणा नसावा.

२९ शाळेंतून जातांना मुलानें मुकाट्यानें घरीं जावें.

३० घरीं आल्यावर मुलानें अर्धा तास विश्रांति घ्यावी व मग फराळाचें तयार असल्यास फराळ करावा नसल्यास एक तास खेळण्यास जावें.

३१ मुलानें हिवाळ्यांत व उन्हाळ्यांत बॉल इटीदांडू चेंडू लपवालपवी इत्यादि खेळ खेळावें सारांश शरीरास कांहीं तरी व्यायाम झाला पाहिजे.

३२ पर्जन्य काळांत ही शरीरास श्रम पडतील असेच खेळ खेळावे.

३३ मुलानें अभ्याशांच्या वेळे शिवाय अन्यत्र आपल्या आईबापाला मदत करावी.

---

# नास्तिक आणि आस्तिक.

१ नास्तिक ह्मणजे जे आपणास प्रत्यक्ष दिसते किंवा ज्याची प्रत्यक्ष आपणावर असर होते त्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं ( परमेश्वर ) असें मानणार !

टीप. नास्तिक ह्या शब्दाचा अर्थ जे जसे आहे त्यास तसे न मानणें.

आस्तिक ह्मणजे जे आपणास प्रत्यक्ष दिसतें किंवा ज्याचा आपणावर प्रत्यक्ष बोध होतो व ज्यांस नांव आहे त्या शिवाय ही दुसरा कोणी आपला व त्या सर्वांचा उत्पन्नकर्ता पालनकर्ता व संव्हार कर्ता एक आहे. [ ह्मणजे ज्याला आपण परमेश्वर ह्मणतो तो ] असे मानणारे.

२ नास्तिकाला जें प्रत्यक्ष दिसतें किंवा ज्याचे प्रत्यक्ष अस्तित्व ज्यांच्या मनावर ठसतें त्या शिवाय कोणी नाहीं असे त्याचें मत असल्यामुळें त्याला देव धर्म पूजा अर्चा उपासना नवस दान वगैरे कांहीं करण्याचें कारण नसतें. यास्तव परियायानें होणारा सहज परोपकार त्याच्या हातून होत नाहीं.

३ आस्तिकास आपल्या कर्मा बद्दल आपणास पुढें मरणानंतर जाब द्यावयाचा आहे. परंतु नास्तिकास तसे नसल्यामुळें जगा पुढें न येईल अशी सावधगिरी ठेऊन त्याचें मन कोणतेंही नीच किंवा वाईट कर्म करण्यास आचका खात नाहीं ह्यामुळें नास्तिक समाजबंधूस किंवा जगतास अहित कर होत.

४ नास्तिकास मरणाच्या काळीं त्याच्या मनाचा विश्वास नसल्या मुळें त्याचें मन स्थीर रहात नाहीं व स्थीरता नाहीं तेथे चैन किंवा सुख कोठून? ह्या वरून मरणकाळा पर्यंत त्याचें मन संसारविचारांत मग्न असल्यामुळें त्याला स्थीरता किंवा सुख नसतें व मरणकाळीं त्याला आपल्या कर्मा बदल पश्चात्ताप व भय उत्पन्न होऊन त्याचा जीव घाबरतो त्याच्या सर्वांगाला कापरें सुटतें व हाय हाय करिता दुःखांतल्या दुःखांत त्याचें

स्वासोच्छवास बंध होतात. मरणा नंतर ही सर्वांची त्याच्या कडे तिरस्कार नजर असल्यामुळें ( कारण नास्तिकाच्या हातून बहूत करून दुसऱ्यास पीडा कारक अशींच कर्में घडतात ) त्याच्या पाठीमागें निंदेशिवाय दुसरें कांहीं उरत नाहीं.

५ आस्तिकाला देव धर्म उपासना कुलाचार यात्रा दान वगैरे करावी लागतात. ( हा आस्तिकाला तोटा ).

६ आस्तिकाच्या मनाची आपल्या मरणा नंतर आपल्या कर्मा बद्दल परमेश्वरा जवळ जाब द्यावा लागेल अशी खात्री असल्यामुळें सहसा त्याच्या हातून गुप्त ही अचाट घोर कर्मे होत नाहींत.

७ आस्तिकाचें मन भयांत संकटांत मरण काळीं त्याचा परमेश्वरा वर विश्वास असल्यामुळें स्थीर असतें. ह्यामुळें तो भयांत व संकटांत घाबरत नाहीं व त्यांतून परमेश्वरावर विश्वास ठेऊन मुक्त होण्यास उपाय करतो ह्या मुळें तो बहूतकरून पार पडतो; व मरण काळीं त्याचें मन स्थीर रहातें. कारण त्याला प्रत्येक कर्म करते वेळीं आपणास ह्या बद्दल परमेश्वरास जाब द्यावा लागेल अशी भीति असल्यामुळें सहसा त्याच्या हातून अन्याय घडत नाहीं. ह्या मुळें त्या वेळीं ही त्याला दुःख होत नाहीं व मरणा नंतर ही त्याच्या कडे लोकांचें पूज्य अंःत करण असतें कारण त्याच्या हातून बहूतकरून कोणास पीडा झालेली नसते. ( त्याला फायदा ).

८ एकंदरींत नास्तिकाजवळ वितंडवाद, व आपलें मत खरें

करण्याकडे सर्व आयुष्याचा व्यय ह्या शिवाय कांहीं नसतें.

९ आस्तिकाजवळ मनाची स्थीरता, नम्रता, दुष्कर्माचें भय, हीं असल्यामुळें त्याच्या आयुष्याचा आपलें व दुसऱ्याचें कल्याण करण्याकडे व्यय होतो.

---

# अस्तोदय.

१ चहडतीमध्यें फुगून जाऊं नये कारण ती अशाश्वत आहे ( केव्हां जाईल ह्याचा नेम नाहीं ).

२ पडतीमध्यें नाउमेदींत गर्क होऊं नये, कारण ती कायम राहूं शकत नाहीं.

३ पडतींत आपली टेक संभाळून रहाणें कठीण आहे.

४ चहडतीमध्यें सम [ मध्यम ] रहाणें फारच कठीण आहे.

५ पडतीमध्यें मनुष्याचे चांगले स्वभाव दिसून येतात.

६ चहडतीमध्यें मनुष्याच्या अंगीं वाईट गुण उत्पन्न होतात.

७ पडतीमध्यें आपली बुध्दि व नजर तीक्ष्ण होते, कारण आपणास खरें खोटें समजण्याचीच ती वेळ आहे.

८ चहडतिमध्यें आपण आपल्या शुध्द बुध्दीची पर्वा बाळगीत नाहीं, व आपल्या दृष्टी समोर खुशामतींचे व अभिमानाचे पडदे पडतात कारण आपणास बुध्दीची गरज पडत नाहीं व लक्ष्मी बरोबर तिचे परम मित्र ( आपले परम शत्रु ) अभिमान

खुशामत आपल्या समोर अक्षय उभी असतात.

९ पडतीमध्यें आपण द्रव्याचा उपयोग कसा करावा हें जाणतों.

१० चहडतीमध्यें आपण द्रव्य ह्मणजे काय हें ही ओळखूं शकत नाहीं.

११ पडती ही आपण मनुष्यत्व ह्या शद्बास किती योग्य हें पहाण्याची कसोटी आहे.

१२ चहडती हें आपण बुध्दिहीन पैशून्य होण्यास किती वेळ लागतो हें पहाण्याचें सूक्ष्मयंत्र आहे.

१३ पडतींत मनुष्य संपानें रहाण्यास, धैर्य ठेवण्यास, नीतीनें वागण्यास, उद्योगी होण्यास शिकतो कारण पडती ही हिंमत उद्योग, पराक्रम, निश्चय यास जन्म देणारी माता आहे.

१४ चहडतींत मनुष्य बेपर्वाई करतो अनीतीनें वागतो व आळशी क्षणिक विचारी व त्रासीक होतो. कारण तो आपलें कर्तव्य समजूं शकत नाहीं. व आपल्या परिणामाविषयीं आणि स्वतःविषयींही ज्ञान त्याला होत नाहीं.

१५ पडतींत दुःखामुळें आपलें अंतःकरण धैर्य ( आशा ) पकडण्यास शिकतो.

१६ चहडतींत आनंदाच्या लहरीनें आपलें अंतःकरण डगमगून धीर पकडण्यास अशक्त होतें.

१७ पडतींत आपल्या अंतःकरणाचा ..रोक आवाज आपणास सम ( मध्यम ) रीतीनें वागण्यास वारंवार सूचवीतो.

१८ चहडतीमध्यें आपल्या उतावळे व अभिमानी मनाचे विचारत-

रंग आपणास वारंवार हद्दीच्या बाहेर जाण्यास भाग पाडतात.

१९ पडतीमध्यें आपण देव, वडील, सज्जन, ह्यांच्याकडे मानानें पहातों व निर्बळ दुःखी वृध्द ह्यांच्या समोर दयेची दृष्टि करितों.

२० चहडतींमध्यें आपण देव, वडील, सज्जन, धर्माधिकारी, ह्यांच्या कडे उध्दटपणानें वागतों व निर्बळ दुःखी वृध्द ह्यांच्याशीं बेपर्वाई करतों. आणि त्यांच्या स्थितीविषयीं मस्ककरी व तिरस्कार करतों [ शरम ].

२१ पडतीमध्यें आपण कुटिल स्त्रियांचे व लबाड घातकी पुरुषांचे कावे ओळखूं शकतों ह्यामुळें आपण त्यापासून सावध रहातों.

२२ चहडतीमध्यें आपण कुटिल स्त्रियांचे व लबाड घातक पुरुषांच्या करतुकींत भुलून गर्क होतों ( ह्यामुळें अखेरीस फसले जातों ).

२३ पडतीमध्यें आपल्या शत्रूलाही आपल्याविषयीं दया उत्पन्न होते.

२४ चहडतीमध्यें ईर्षेनें आपले मित्रही आपला द्वेष करितात.

२५ पडतीमध्यें आपण सर्व कामांत आपल्या स्वतःवर, व परमेश्वरावर भरंवसा ठेवितों [ ह्यामुळें पार पडतों ].

२६ चहडतीमध्यें आपण अज्ञाना सारखें होऊन दुसऱ्या वरती आपला भार ठेवितों ( ह्यामुळें फसले जातों ).

२७ पडतीमध्यें आपण दुसऱ्याचें सुख इच्छितों.

१८ चहडतीमध्यें आपण दुसऱ्याला त्रास देण्यास व दुःखी करण्यास आपल्यानें होईल तेवढा प्रयत्न करण्यांत शौर्य मानतों.

२९ पडतींत आपण परमेश्वराची वारंवार प्रार्थना करतों व क्षमा मागतों-

३० चहडतींत आपण परमेश्वराची निंदा करतों व नास्तिक होतों.

### सारांश.

चहडतींत आपल्याला जे जे दुर्गण जडण्याचा प्रसंग येतो त्या वेळेस सावध राहून त्या दुर्गुणापासून दूर रहाणें व पडतींत मनुष्यांवर सद्गुणाचे जे जे ठसे उमटतात ते चहडतीमध्यें वितळून जाऊं न देतां कायम ठेवणें. कारण पडतीचा मुख्य हेतु दुर्गुणाचा ह्मणजे दुष्ट मनोविकाराचा नाश होऊन भावी चहडतींत सद्गुणामुळें सुख संपादन करण्यास योग्य होणें.

---

## स्त्रीधर्म.

१ स्त्रीधर्म ह्मणजे स्त्रीयांनीं कशा रीतीनें वर्तन केलें पाहिजे कीं जेणें करून ईहपर लोक साधतील.

२ स्त्रीयांनीं आपल्या पतीशीं नम्र पणानें व साळसूद वागलें पाहिजे. कारण स्त्री आपलें व आपल्या कन्या पुत्रांचें पोषण स्वपती जवळून काबाड कष्ट करवून पुरें करवून घेते.

३ स्त्रीयांनीं पतिशीं मिळून रहाणें ह्मणजे त्याच्यांशीं नम्रतेनें व गोडीगुलाबीनें वागणें.

४ स्त्रीनें पतीच्या योग्य सुचनेचें उल्लंघन करणें ह्मणजे त्याच्याशीं बेइमानीपणा करणें. अर्थात त्याचें व आपलें नुकसान न समजणे.

५ स्त्रीने पतीचे माता, पिता, बंधु भगिनि इत्यादिकांशीं द्वेष करणें ह्मणजे पतीच्या विरुध्द कर्म करण्यास प्रवृत्त होणें.

६ स्त्रीनें पतीला खुष ठेवणें ह्मणजे आपलें आयुष्य सुखांत जाण्याची इच्छा करणें.

७ स्त्रीनें पती क्रोधांत, संतापांत, काळजींत कष्टानें श्रमित असतां त्याचें शांतवन करणें ह्मणजे आपल्या कर्तव्या पैकिएक फर्ज आदा केली असे होय.

८ स्त्रीनें पतीशीं सत्यानें वागलें पाहिजे नाहीं तर शंका आणि अविश्वास प्रीतीचा ह्मणजे तिच्या सुखाचा नाश करितील.

९ ज्या स्त्रीनें आपले प्रेम तोडले तिच्यांत आणि वाईट स्त्रींत काय फेर !

१० जी स्त्री आपल्या पतीचें ह्मणजे घरचें हिताहित समजत नाहीं तिच्यांत व मोलकरणींत काय अंतर !

११ स्त्रीनें आपल्या सासुसासऱ्याला माता पित्या प्रमाणें समजलें पाहिजे व चाकराशीं ममतेनें व चोख वागलें पाहिजे.

१२ स्त्रीनें आपल्या पतीचे मित्र ते आपले हितचिन्तक व चीपते शत्रु ते आपले ही वैरी असें मानलें पाहिजे.

१३ स्त्रीनें कामाशिवाय पर घरीं जाऊं नये.

१४ स्त्रीनें परपुरुषाशीं विनोद किंवा हंसू नये त्याची मस्करी करूं नये, अन्य पुरुषांशीं एकांत गोष्ट करूं नये.

१५ स्त्रीनें वाईट बायकांच्या कपटी काव्याविषयीं जपावें किं फशी पडण्याचा प्रसंग येणार.

१६ स्त्रीयांनीं पाहुण्याची बरदास्त ठेवण्यास झटावें किं घरचा आब वाढेल.

१७ स्त्रीयांनीं वागण्यांत सुघडतेनें, बोलण्यांत मधुरतेनें, कामांत चपलतेनें धर्मात आतुर, निष्टेंत अचळता व भयांत धीरतेनें रहावें.

१८ स्त्रीनें आपल्या कर्मानें स्वपतीचें मन दुःखवेल किंवा तो लज्जेस पात्र होईल ह्या विषयीं पूर्वी विचार करावा.

१९ स्त्रीनें आपल्या पतीची आवक व खर्च याविषयीं विचार करून वागावें.

२० स्त्रीनें स्वपतीच्या कल्याणाविषयीं विचार किंवा काळजी न करणें ह्मणजे आपण दोन पायाचे पशु आहोंत अशी जनाची खात्री करणें.

## सुशील स्त्रीयांची लक्षणें.

१ सल्ला किंवा विचार देण्यांत दूरदृष्टि व पोक्तपणा.

२ काम करण्यांत मेहेनती.

३ प्रीतिमध्यें अपूर्वता.

४ धर्मात श्रध्दावान.

५ क्षमावान.

६ नम्र.

७ सत्य बोलणारी.

८ सहनशील.

९ निर्मळ.

१० लज्जावान.

११ स्वपतीचें हितचिंतक.

१२ दयावान.

१३ आज्ञांकितपणानें वागणारी.

१४ मंदहासणारी.

१५ सरळ व थोडें बोलणें.

१६ पोशाख साधा व नटण्यांत थोडावेळ लावणारी.

---

## पतिधर्म.

१ पुरुषानें एक बायको करावी कारण एकाहून जास्त स्त्री करणाराची स्थिती एकाच्या जागी दोन खर्च करणारा सारखी होत नांहीं का!

२ पुरुषानें स्त्रीस अमोल्या वस्तु सारखी संभाळावे कारण तिनें आपल्या वचनावर भरंवसा ठेविला आहे.

३ पतीनें आपल्या ममतेच्या वागणुकीनें स्त्रीच्या मनांत आपल्या विषयीं प्रति उत्पन्न करावी.

४ पुरुषानें स्त्रीच्या विचारच्या आड प्रयोजना शिवाय येऊं नये

५ पुरुषानें आपल्या सुखांत ही स्त्रीची वाटणी काढावा कारण दुःखात ती आपल्या आपुण भाग घते.

६ पुरुषानें स्त्रीच्या गुन्ह्या बद्दल चालेल तो पर्यंत हळू व योग्य

रीतीनें ठपका द्यावा.

७ पुरुषानें स्त्रीला जबरदस्तीनें ताब्यांत आणण्याची इच्छा करूं नये.

८ पुरुषानें आपल्या घरच्या संबंधानें नफ्यातोट्याची गोष्ट बिनधोक स्त्री जवळ सांगावी कारण तिची सल्ला वाजवी ह्मणजे हितकर असल्यानें सहसा आपण फसले जाणार नाहीं.

९ स्त्रीला जेव्हां कोणतेंही दुःखणें होईल तेव्हां तिची प्रेमानें बरदास्त करावी कारण पतीची नजर आणि दया यांनीं जो गुण येईल तो वैद्याच्या औषधांनींही येणार नाहीं

१० स्त्रीला मुद्दाम त्रास देऊं नये.

११ स्त्रीशी अति वश होऊं नये.

१२ स्त्रीशी उध्दटपणा करूं नये.

१३ स्त्रीवर भलताच आरोप संशयांनीं किंवा कोणाचें ऐकून ठेऊं नये.

१४ स्त्रीला अयोग्य स्वतंत्रता देऊं नये.

१५ स्त्रीला सक्त बंधनांत ठेवूं नये.

१६ स्त्रीशी निर्दय होऊं नये.

१७ स्त्री सांगेल त्याचा नीट विचार व तपास करावा.

१८ स्त्रीचा चौघांत तमाशा करूं नये.

१९ स्त्रीचे मीजास वाढवूं नये.

२० स्त्रीचें वजन कमी करूं नये.

२१ स्त्रीचें रूपाविषयीं मनांत अभिमान धरू नये, कारण पितळेच्या व सोन्याच्या भांड्यांतलें पक्वान्न सारखें असतें.

२२ स्त्री कुरूप असली तर तिच्याविषयीं मनांत हलका विचार आणूं नये व त्याबद्दल बाहेर मस्करींतही कांहीं बोलूं नये. ह्मणजे तिला दुःख होईल असें करूं नये,

२३ स्त्रीला शिव्या तर अगदीं देऊं नये कारण तसें केल्यानें मात्र आपला हलकट स्वभाव बाहेर दिसून येतो.

२४ स्त्रीला मारूं नये कारण मारणें हें तिच्याशी संबंध तोडण्याच्या अगोदरचीच पायरी आहे.

२५ नीतिमान पुरुषाचीं लक्षणें.—

स्त्रीशीं मानानें वागणें, स्त्रीवर प्रीति करणें, स्त्रीशीं नीतीनें वागणें, स्त्रीशीं निष्कपटानें वागणें, स्त्रीचे हाल न करणें, स्त्रीविषयीं काळजी बाळगणें, स्त्रीशीं गोड बोलणें, स्त्रीला योग्य व अयोग्य हें युक्तीनें सांगणें, स्त्रीचें दुःख पाहून तिच्यावर दया करणें, स्त्रीला हलकें न समजणें, स्त्रीविषयीं संशयांनीं न वागणें, स्त्रीला योग्य मोकळीक देणें, स्त्रीवर उगाच न रागावणें, स्त्रीशीं फाजील चावटपणा न करणें, स्त्रीची वांरवार निंदा न करणें (मस्करींतही).

---

# पिताधर्म.

१ पिता ह्या शद्बाचा अर्थ जनक, पालक, मालक व उत्पादक.

२ पित्यानें मुलाचें अति कष्टानेंही संरक्षण करावें कारण तें विश्वासानें सोपलेली वस्तु आहे [ परमेश्वराची ].

३ पित्यानें मुलाच्या मनाच्या डाहळ्या सुनीतीकडे प्रयत्नानीं वळवाव्या कारण डाहळ्याखालीं पुढें विश्रांती घ्यावयाची आहे.

४ पित्यानें आपल्या योग्य वागणुकीनें पुत्राचें मन आपल्याविषयीं शुद्ध ठेविले पाहिजे कारण त्या शिवाय आपल्याविषयीं पूज्य बुद्धि त्याच्या मनांत कशी उत्पन्न होईल.

५ पित्यानें पुत्राचें हाल न करितां त्याच्या शरीराला जपावें कारण आपण घोड्यावर व घोडा आपणावर हें लक्षात आणिलें पाहिजे.

६ पित्यानें पुत्राला विद्या शिकवावी कारण त्याशिवाय त्याला स्वतःविषयींही ज्ञान होणें कठिण तर पिता ह्मणजे काय पदार्थ हें त्याच्या लक्षांत कसे येईल.

७ पुत्राचें शुभ इच्छिणाऱ्या पित्यांनीं फाजील खर्च करूं नये कीं आपल्या पाठी मागें त्याच्या वर कर्जाचा बोजा न पडेल.

८ पीत्यानें पुत्राला आपला कुलाचार व वाडवडिलांची हकीकत सांगावी कीं तो त्या कामांत अजाण राहून आपल्या पाठीमागें आपल्या वंशजांची हकीकत लयास न जाईल.

९ पित्यानें पुत्राच्या अपराधाचें कौतुक करूं नये कीं तो चावट होईल.

१० पित्यानें पुत्राला वारंवार मारूं नये कीं तो उद्धट होईल.

११ पित्यानें पुत्राला वारंवार मारूं नये कीं तो कोडगा होईल.

१२ पित्यानें पुत्राला शिव्या देऊं नये कीं तो निर्लज्ज होईल.

१३ पित्यानें पुत्राला तांबेदारींत ठेवावा ( युक्तीनें ] कीं त्याला पुढें जड न जाईल.

१४ पित्यानें पुत्राला नम्रता शिकवावी कीं पुढें त्याला लाज न वाटावी.

१५ पित्यानें पुत्राला उदारता शिकवावी कीं तो सुखी होईल.

१६ पित्यानें पुत्राला उदारता शिकवावी कीं तो दुसऱ्याची प्रीति संपादन करूं शकेल.

१७ पित्यानें पुत्राला खाण्यापिण्याचा अदमास शिकवावा कीं त्याचें प्रकृतीस वारंवार विकार होणार नाहीं.

१८ पित्यानें पुत्रास न्यायानें वागण्यास शिकवावें कीं तो जगांत प्रतिष्ठा पावेल.

१९ पित्यानें पुत्राला शुभेच्छुकपणा शिकवावा कीं त्याचें मन त्याला न खाईल.

२० पित्यानें पुत्राला उद्योग शिकवावा कीं त्याला दरिद्रता न येईल.

२१ पित्यानें पुत्राला कलाकौशल्य शिकवावें कीं त्याचें आयुष्य जगाला उपयोगी होईल.

२२ पित्यानें पुत्रास धर्मानें वागण्यास शिकवावें कीं त्याच्या मरणाच्या वेळेस त्याच्या मनाची शांतता राहील.

२३ पित्यानें पुत्राला दक्षता शिकवावी कीं त्याचें नशीब उघडेल.

२४ पित्यानें पुत्राला मेहनत करण्यास शिकवावी कीं त्याचें शरीर कसेल.

२५ पित्यानें पुत्राजवळ बोबडे बोलूं नये किंवा चावटपणा करूं नये कीं तो तोतरा व ख्याली खुशाली होईल.

# बंधुधर्म

१ बंधु ह्मणजे सहाय्यकारी.

२ भावाशीं निष्कपटांनीं वागावें कीं संशयाला जागा मिळणार नाहीं.

३ भावांना टाकून एकटें खाण्याची इच्छा करूं नये किं ज्यामुळें एक जूट कायम राहील.

४ विभक्त राहिलों तरी भावाला मदत करावी किं प्रीतीची वृद्धि होईल.

५ भावाशीं बायकोवरून विटूं नये कारण तसें केल्यानीं मात्र आपली अल्पबुद्धी दृष्टोत्पत्तीस येते.

६ भावाशीं निर्दयतेनें वागूं नये कीं त्याला आपला त्रास होईल.

७ भावाची निंदा ऐकण्याची इच्छा करूं नये कीं जेणें करून दुसऱ्याचे मनांत आपल्याविषयीं हलका विचार उत्पन्न होईल.

८ भावाचे कोणत्याही प्रकारें हाल करूं नयेत कीं त्याला दुःख होईल.

९ भावावर खोटी तोहमत ठेवूं नये कीं त्याच्या मनाचा संताप होईल.

१० भावाला अपराधाविषयीं क्षमा करावी कीं त्याच्या मनांत पूज्य बुध्दि उत्पन्न होईल.

११ भावाची काळजी बाळगावी कीं तो आपल्या वचनांत राहील.

१२ भावाचा घात करूं नये कीं आपण जगाचा विश्वास आपल्या वरचा घालवून तिरस्करास पात्र होऊन आपणास पश्चात्ताप व दुःख प्राप्त होईल.

१३ भावाला टोचून बोलू नये कीं त्याच्या मनांत आपल्याविषयीं द्वेष उत्पन्न होईल.

१४ भावाची फजीती करण्याची इच्छा करूं नये कीं आपल्या कुळाचा बोज जाईल.

१५ भावाचा पक्ष सोडूं नये किं आपण बंधुधर्म ( सहाय्य करणें ) ह्या पासून भ्रष्ट होऊन अपमानास पात्र होऊं.

१६ भावाला चांगली सल्ला द्यावी कीं त्याला चुकीच्या तडाक्यांत सांपडून पश्चात्ताप व संकट प्राप्त न होईल.

---

# पुत्रधर्म.

१ पुत्र ह्मणजे आज्ञांकित, विश्वासु, शुभेच्छक, कल्पवृक्ष होय.

२ पुत्रानें मातापित्यांचे आज्ञेंत वागावें कारण तो स्वतःस्वतंत्रपणानें वागण्यास लायक नाहीं ( ह्मणजे अज्ञान आहे. ).

३ पुत्रानें मातापित्याला सुख द्यावें, कारण कृतज्ञता हेंच मनुष्य जातीचें पहिलें लक्षण होय.

४ पुत्रानें बाळपणांत व ज्वानींतही आईबापच्या आज्ञेंत वागावें कारण तरुणपणांत तो अल्लड अविचारी व उतावळा असतो.

५ पुत्रानें आईबापाला कोणत्याही प्रकारें दुःख देऊं नये कारण त्यांनीं पुष्कळ दुःख सहन करून पुत्राला सुख दिलें आहे.

६ पुत्रानें आई बापांच्या विचाराशिवाय किंवा त्यांच्या विचारा विरुध्द कांहीं करूं नये कारण त्यांच्या पेक्षां काया वाचा

मन व धनें करून पुत्राचें कल्याण इच्छणारे व करणारे दुसरे कोणी नाहीं.

७ पुत्रानें आईबापांचा अपमान करूं नये कारण त्यांच्यामुळेंच तो येवढ्या योग्य पदास चढला आहे.

८ पुत्रानें आईबापांची निंदा करूं नये कारण डहाळीच्यानें झाडाची निंदा करवेल काय ?

९ पुत्रानें हरेक प्रकारें आईबापांला सुख द्यावें कारण [ लहानपणापासून ) त्यांनीं त्याच्या पासून सुख मिळविण्याची आशा ठेविली आहे.

१० पुत्रानें नीतिनें वागावें व यशाचें कार्य करावें. कारण त्या पासून त्यांना संतोष होऊन स्वतःचेंही कल्याण होतें.

११ पुत्रानें आईबापाची सेवा करावी कारण त्यापासून त्याच्या जीवाचा थकवा नाहींसा होतो.

१२ पुत्रानें आईबापावर रागाऊं नये, कारण पुत्राविषयीं त्यांचें अंतःकरण फार कोमळ असतें.

१३ पुत्रधर्म पाळणें म्हणजे जगाच्या पहिल्या कसोटींत पास होणें होय, कारण सर्व कामांत व श्रमांत पुत्रधर्म पाळणें फार कठीण आहे.

१४ निष्टावान पुत्राची सेवा गुलाबाच्या फुलां पेक्षां किंवा केवड्याच्या कणसापेक्षांही श्रेष्ट आहे. कारण ती अक्षय सुगंध देते [ सुकत नाहीं ].

१५ पुत्रानें आईबापांच्या ठिकाणीं आपला पुत्रधर्म पाळला तर तो या जगाच्या दुःखपश्चात्तापशरमरूपीं जाळ्यांत न फसतां यशासहीत शांतीच्या मंडपांत जाऊन पोंहोचतो.

# धनी आणि चाकर.

१ चाकराशीं धन्यानें कामाशिवाय फार बोलूं नये कीं तो उद्दाम होईल.

२ चाकराला अयोग्य त्रास देऊं नये कीं त्याला कंटाळा येईल.

३ चाकराला मारूं किंवा शिव्या देऊं नये कीं आपल्याविषयीं हलका विचार त्याच्या मनांत उत्पन्न होईल.

४ चाकराला काम सांगावें त्यांत योग्य कारण असलें पाहिजे कीं तो आपल्याविषयीं मनांत बड बडणार नाहीं.

५ चाकराच्या कामाची बूज अवश्य करावी कीं त्याला संतोष होऊन कामाची हुरूप येईल.

६ चाकराशीं पैशा संबंधीं लबाडी करण्याचें मनांत आणूं नये कीं आपल्याविषयीं त्याच्या मनांत विश्वास राहील.

७ चाकरावर योग्य दया ठेवावी कीं त्याच्या अंतःकरणांत आपल्या विषयीं पूज्य बुध्दि उत्पन्न होईल.

८ चाकरावर जुलूम करण्याची इच्छा धरूं नये कीं त्या मुळें त्याच्या अंतःकरणांत आपल्या विषयीं वाईट बुध्दि उत्पन्न होऊन आपला घात करण्याविषयीं तो उत्सुक होईल.

९ चाकराशीं वागण्यांत दरारा, उदारता व ममता ह्यांचा प्रसंगाप्रमाणें उपयोग करावा किं जेणें करून आपली ताबेदारी उठविण्यांत त्यांचें अंतःकरण खुष राहील.

१० गुन्ह्या शिवाय चाकराला काढून टाकण्याचा रिवाज ठेऊं नये कीं जेणें करूंन चाकरींत त्याचें मन स्थीर राहील.

११ चाकराला हलका पाडूं नये कि तो निर्लज्ज होईल.

१२ चाकरावर तपास केल्या शिवाय अपराध ठेवूं नये कि त्याच्या मनांत आपला अल्प विचार व कमअकलेविषयीं खात्री होईल.

१३ चाकराला आपले गुह्यछिद्र किंवा अयोग्य कर्म ह्यासंबंधीं माहीती देऊं नये कि तो आपल्या वरती तार करील.

१४ चाकरानें नोकरी विषयीं दुःख मानूं नये, कारण चाकरीमुळें संसारी कर्जजाळ आणि चिंतेपासून त्याचें मन मोकळें रहातें.

१५ चाकरानें नम्रपणा व सांगीतलेलें काम तुर्त करणें ह्या दोन गुणाचा अवश्य आश्रय करावा कि ज्यामुळें धन्याची प्रीति प्राप्त होईल-

१६ चाकरानें धन्याचा ठपका शांतपणें सहन करावा, कि ज्यामुळें त्याला ( चाकराला ) आपल्या चूकीविषयीं ज्ञान होईल.

१७ चाकरांनीं धन्याच्या फायद्याच्या कामांत लक्ष द्यावें कारण झाडाला खतपाणी दिल्या शिवाय फळ मिळेल काय ?

१८ चाकरानें धन्याच्या कामांत उद्योगी रहावें कि धन्याच्या मनांत त्याच्या कल्पनें विषयीं बुध्दि उत्पन्न होईल.

१९ चाकरानें आपल्या नोकरीचा वेळ फुकट घालवूं नये. कारण तो तिचा मालक नाहीं.

२० चाकरानें धन्याला हलकेपणा येईल असें कर्म करूं नये कि जेणें करून स्वतःच्या [ आणि कुळास जातीस व देशासही ] अब्रूस बट्टा लागेल.

---

# श्रीमंती.

१ श्रीमंत ह्मणजे स्वतः सुखी असून दुसऱ्याला सुख देण्याची साधनें ज्या जवळ आहेत तो.

२ श्रीमंतांनीं गरीबाला त्याच्या पीडा आणि दुःख निवारणार्थ मदत करावी किं जेणेंकरून तो मानास पात्र होईल.

३ श्रीमंतांनीं गरीबाचे हरामी आणि लुच्चे लोकापासून रक्षण-करावें किं त्याची कीर्ति होईल.

४ श्रीमंतानें दयेस योग्य असा कामाचा शोध करावा किं जेणें करून दुःखीताचें दुःखा निवारण होईल.

५ श्रीमंतानें गरीबांच्या दुःखाविषयीं तपास करावा किं ज्यानें तो दुसऱ्याचें प्रेम संपादन करूं शकेल.

६ श्रीमंतांनीं सद्गुणाला आश्रय द्यावा किं लुच्च व लबाड ह्या पासून त्याला धोका न पोंचता त्याची वृध्दि होईल.

७ श्रीमंतांनीं व्यापार, हुन्नर व कळा ह्याला साह्य करावें किं जेणें करून स्वतःचीही श्रीमंती वाढून देशाचेंही कल्याण होईल.

८ श्रीमंतांनीं विद्येला मदत करावी किं जेणेंकरून स्वतः व देश-बंधु अज्ञानांत राहणार नाहींत.

९ श्रीमंतांनीं महाभारत कामें चालूं करावी किं जेणेंकरून देशाची शोभा वाढून गरीबास आश्रय मिळेल.

१० श्रीमंतानें गरीबाच्या दौलती वर नजर ठेऊं नये किं जेणें करून तो सर्वांच्या विश्वासास पात्र होईल.

११ श्रीमंतांनीं पैशाचा अभिमान धरूं नये, कारण तो अशाश्वत आहे.

१२ श्रीमंतांनीं निर्धनाचा तिरस्कार करूं नये. कारण विनाप्रयोजन दुसऱ्यास दुःखविणें हे मूर्खांचें लक्षण होय.

---

## गरीब.

१ गरीबी ह्मणजे मेहेनत करून स्वतःचा निर्वाह काटकसरीनें करणें.

२ गरीबीनें खुशींत असावें, कारण तो संप आणि शान्तीमध्यें असतो.

३ गरीबानें संतोषित रहावें. कारण तो खुशामती आणि लटपटी मनुष्यापासून मोकळा रहातो.

४ गरीबानें श्रीमंताचा द्वेष करूं नये. कारण गरीबाला श्रीमंताच्या सुखाचा जसा लाभ मिळत नाहीं, तद्वत् त्याच्या दुःखाचाही अनुभव येत नाहीं.

५ गरीबानें आपल्या हलकेपणा बद्दल दुःख मानूं नये. कारण तो जगाच्या निर्वाहाच्या आणि सुखाच्या वस्तु उत्पन्न करणारा आहे.

६ गरीबानेंही दुसऱ्याला यथाशक्ति साह्य करावें. कारण दुसऱ्याचें सुख इच्छिणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे.

७ गरीबानें लबाडी व लुच्चेगिरी न करितां उद्योगानें आपला निर्वाह करावा, कारण त्याला अन्न व प्रतिष्ठा मिळविण्यास हाच मार्ग मोकळा आहे.

८ गरीबानें नम्र व प्रामाणिकपणानें रहावें. कारण त्या शिवाय त्याला साह्य किंवा आश्रय मिळणार नाहीं.

९ गरीबानें उदासीनपणानें राहूं नये. कारण उदासीन राहिल्यानें उद्योग होत नाहीं, त्यामुळें निर्वाह होण्यास मात्र जास्त अडचण पडते.

१० गरीबानें आपल्या स्थिती बद्दल परमेश्वरास दोष देऊं नये. कारण एकतर परमेश्वराची निंदा होते; दुसरें आपला उद्योगाचा अमोल्यवान् वेळ फुगट जातो आणि तिसरें दुसऱ्याला आपल्या विषयीं तिरस्कार उत्पन्न होतो.

---

## गृहकार्यदक्षता.

१ गृहकार्यदक्षता ह्मणजे स्वतः उद्योग करून घरच्या मनुष्यांचें संरक्षण व पोषण करून आप्त वर्गास संतोषीत ठेवणें.

२ गृहकार्यदक्षता न ठेवल्यानें कुटुंबांतील मनुष्यें कंटाळतात.

३ कुटुंबांतील माणसें कंटाळल्यानें त्याची आपल्यावरची ममता कमी होते. अर्थात् आपण अप्रीतीस पात्र होतोंच.

४ आपण गृहकार्यदक्षतान ठेवल्यानें घरचीं मनुष्यें आपली वर्तणूक सुधारावी ह्या हेतूनें वारंवार बोलतात.

५ घरांतील मनुष्यांच्या वारंवार बोलण्यानें आपण जे फक्त गृहकार्य दक्षता ठेवीत नव्हतों तेच आतां घरांत रहाण्याचा किंवा घरांतल्या मनुष्यांशीं बोलण्याचा व सहवासाचा तिरस्कार करितों.

६ घरास कंटाळल्यामुळें व घरांतल्या माणसाच्या त्रासामुळें आपण बाहेर विश्रांतीस ठिकाण शोधतो.

७ दुसऱ्याची प्रीति संपादण्यास व परक्या बरोबर आपल्या करमणूकींत काल क्रमणकरण्यांत आपणाला घरांपेक्षां विशेष खर्च करावा लागतो व आपणास हलकेपणाही येतो.

८ ह्यास्तव अखेरीस आपलें घराकडे लक्ष लागतें परंतु आपल्या इतक्या दिवसांच्या निष्काळजी वर्तणूकीनें घरांतील स्थिति देशोधडीस लागलेली असते, ती आपल्याच्यानें पुनः सुधारली जात नाहीं. ह्या करितां आपला सर्व जन्म दुखांत, त्रासांत संकटांत व पश्चापत्तांत व्यर्थ जाऊन पाठीमागें अपकीर्ति मात्र रहाते.

९ गृहकार्यदक्षता ठेवल्यानें कौटुंबिक मनुष्यें संतोषी रहातात; संकटांतही त्यांचें धैर्य न सुटतां ते आनंदांत शांततेनें वागतात. कारण आपणावर त्यांचा विश्वास रहाण्यास हा गुण साधन होतो. आपल्या हातून अयोग्य खर्च व वाईट वर्तणूकीचें कार्य घडत नाहीं.

१० या योगानें आपलें आयुष्य सुखांत, व आनंदांत जातें, आपल्या कडून आपले धर्म बजावले जातात, ह्या मुळेंपश्चात्ताप होत नाहीं व आपल्या पश्चातहीं सर्वांच्या मनांत आपल्याविषयीं पूज्यबुद्धि कायम रहाते. अर्थात् ह्या एका गुणानें आपण कुटुंबाच्या सुखास कारणीभूत होतो.

———

# विचार.

१ विचार ह्मणजे आपल्या कार्याचा आरंभ व परिणाम या बद्दल कार्यास आरंभ करण्यापूर्वी ज्ञान करून घेणें.

२ योजलेल्या कार्याच्या परिणामाचें व तें सिद्धीस नेण्याचें ज्ञान करून घेणें व मग मी असें करीन मी तसें करीन अशा बाता न मारितां तें सिद्धीस नेण्यास झटणें हें सुज्ञाचें लक्षण होय. कारण कार्य सिद्धीस गेल्या शिवाय तें उघडकीस आलें तर तें सिद्धीस जाण्यास आडचणी उभ्या होतात व जर तें सिद्धीस न गेलें तर आपली फजीती होते. दुसरे परिणामाचा विचार केल्याशिवाय आरंभ केला तर मागून पश्चात्ताप व दुःखें उत्पन्न होतात.

३ कोणेंतही कार्य करण्यापूर्वी त्या विषयीं विचार केल्यानें क्रोधांत असलों तर क्रोध, संतापांत असलों तर संताप, निराशेंत असलों तर निराशा प्रथम दूर होऊन आपलें मन स्थिर होतें. या योगानें जें आपण कार्य करणार त्याविषयीं दूरदृष्टीनें विचार करितों यास्तव आपणास पुढें पश्चात्तापाची पाळी येत नाहीं.

४ विचार हेंच गणपतिपूजन होय. कारण ज्या कार्याच्या आरंभीं त्या विषयीं पोक्त विचार झालेला आहे, त्यांत बहूतकरून विघ्न येत नाहीं, किंवा पश्चात्तापाची पाळी येत नाहीं.

———

# मान अपमान.

१ मान ह्मणजे आपण जे सत्कर्म किंवा चांगलें काम कि ज्यापासून अयोग्य कोणास हरकत न होतां आपलें दुसऱ्याचें किंवा सर्वांचें व विशेष करून अनाथाचे कल्याण होईल असें, व त्यामुळें दुसऱ्याच्या मनांत आपणा विषयीं जीं पूज्यबुध्दि उत्पन्न झाली व तिच्या योगानें ते आपणाशीं नम्रतेनें वर्तू लागले व मनापासून आपलें कल्याण व्हावें असें चिंतू लागले, ह्या योगानें आपल्यास सद्वर्तणुकीचेंच हें फळ आहे, असें आपल्या मनास वाटून जो आनंद होतो ह्यालाच मान किंवा सत्कर्माचें फळ म्हणतात.

२ अपमान ह्मणजे आपण जें दुष्कर्म किंवा वाईट काम ह्मणजे ज्यापासून बहुतकरून आपणास किंवा दुसऱ्यास पीडा होऊन कोणाचेंही व त्यांत विशेषें करून गरीबाचें अकल्याण होईल, व त्यामुळें दुसऱ्यांच्या मनांत आपणा विषयीं वाईट बुध्दि उत्पन्न होऊन ते आपलें अहित इच्छितील व शक्ति असेल तर करतील व जग आपला तिरस्कार करील ह्या योगानें परिणामीं आपलें अकल्याण होऊन आपणास पश्चात्ताप उत्पन्न होऊन आपलें अंतःकरण दुःखसागरांत निमग्न होईल व अशा वेळीं कोणी आपणा विषयीं दया न करतां सर्व आपला तिरस्कार करतील. ह्यालाच अपमान किंवा दुष्कर्माची शिक्षा म्हणतात.

३ ज्या कामांत आपली चोख वर्तणूक असतां, आपला अपमान होण्याची वेळ येईल किंवा होईल तर त्या विषयीं मनांत दुःख

करूं नये किंवा भिऊन आपली वर्तणूक बदलून होला हो करण्यास तयार होऊं नये. कारण तसें केल्यानें लोकांत आपल्या विषयीं हलका विचार उत्पन्न होऊन आपला बोज उठून जातो. परंतु अयोग्य किंवा गैर समजुतीनें उत्पन्न झालेल्याला अपवादास न डगमगता आपलें चोख वर्तन कायम ठेवलें तर परिणामीं आपल्या श्रमाची बूज होऊन लोकांच्या मनावर आपल्या शहाचा पगडा बसून त्या बरोबर आपल्या विषयीं पूज्यबुद्धि त्याच्या मनांत उत्पन्न होते.

४ मान ह्मणजे आपणा विषयीं लोकांच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होण्यास आपणास श्रम, धन, बुद्धि ह्यांची घस घेऊन व पीडा किंवा दुःख सहन करून देशहिताचें कामीं झटावें लागतें व धनाहून मानाची किंमत विशेष आहे. कारण मान ह्मणजे कीर्ति किंवा बोज असला तरच अपण धन मिळवूं शकतों व दुसरे आपल्या पाठीमागें आपणास उपयोगी अशी वस्तुमान ह्मणजे आपणाविषयीं लोकांच्या मनांत पूज्यबुद्धी हिच आहे.

---

## संगत.

१ संगत ह्मणजे भेट किंवा प्रत्यक्ष व्यवहार [ प्रसंग ] अथवा प्रत्यक्ष अनुभव किंवा ज्ञान होणें.

२ आपणांस ( आत्म्यास ) प्रथम कोणत्याही प्रकारचें कांहींच ज्ञान नसतें. परंतु तो ( आत्मा ) स्थिर नसतां चंचळ आहे.

ह्यामुळें त्याला जसा मार्ग [ संगत ] मिळते तसा तो [ आत्मा किंवा आपण ] गमन [ वर्तन किंवा आचरण करतों ]

**टीप**—जसें तलावाच्या पाण्याला कोठें जावें हें माहीत नाहीं; परंतु ज्या बाजूनें बांद फुटून रस्ता मिळतो तिकडे त्याचा प्रवाह जातो.

३ आपणास जशी संगत होते तदनुरूप आपण आचरण करितों. ह्यावरून सुसंगत झाली तर आपणास सदाचरणानें वागणार व कुसंगत झाली तर आपण दुराचरणानें वर्तणार व जसें आपण आचरण करणार त्याप्रमाणें आपणावर त्याच्या ( आचरणाच्या ) परिणामाचा दृढ ठसा होणार आहे. व जशी आपणावर त्याची ( आचरणाची ) उमट होईल ( सुखकर किंवा दुःखकार ) त्याप्रमाणें तें आचरण हितकर किंवा अहितकर आहे. ह्याचें आपणास ज्ञान होईल. व हितकर किंवा अहितकर ह्याचें ज्ञान झाल्यामुळें ज्या ज्ञानांन ( संगतीनें ) आपण असें आचरण केलें तें ज्ञान ( संगत ) बरें किंवा वाईट ह्याचा ठसा आपल्या मनावर उमटणार आहे.

टीप-लहान मुलास संगत चांगली पाहिजे असें जें मत आहे, त्याचा अर्थ त्याला सुसंगतीला लावा; कारण त्याला बऱ्या वाईटाचें ज्ञान नसतें. व आपणास (मोठ्या माणसास) त्याच्या ( संगतीचा) परिणाम माहीत असल्यामुळें त्याचें ज्ञान झालेलें असतें. व आपणास ज्ञान झालेलें असल्यामुळें हयगय किंवा बेपर्वाई न करितां जी संगत अनुभव किंवा ज्ञान हितकर असा आपल्या मनावर ठसा उमटलेला आहे. त्याप्रमाणें आचरण करणें

व लहानास ( अज्ञानास ) त्याप्रमाणें आचरण करण्यास भाग पाडणें हा आपला धर्म होय.

४ ह्या वरून संगत ही आपल्या आचरणास मूळ कारण होय, व आपल्या परिणामास किंवा स्थितीस आपलें आचरण कारण होय ह्यामुळें आपली वरी किंवा वाईट स्थिती असण्याचें मूळ कारण संगत झाली, तर आपली बरी स्थिती असण्यास संगत ( ज्ञान ) चांगली असली पाहिजे. यास्तव सर्वांनीं [ जें स्वतःचें कल्याण व्हावें असें इच्छित असतील त्यांनीं ] सुसंगत करावी. म्हणजे आपोआप आपलें वर्तन सदाचरणाचे होत जातें व त्यामुळें आपली उन्नती होते.

---

## सभास्थानीं कर्तव्य.

१ सभा ही दुःख निवारून सुखाभिवृद्धिचा प्रयत्न करण्याचें महान साधन होय.

२ सभा सत्कृत्यासाठींच असते, बहुमत हा तिचा पिता म्हणजे उत्पादक आहे.

३ सभेंत कोणी आपल्या विरुद्ध बोलले तर त्याविषयीं तिरस्कार किंवा द्वेष करूं नये; कारण जर प्रतिपक्षाचें बोलणें योग्य असेल तर आपलें मत व्यर्थ अपायकारक होईल. परंतु सद्हूचें म्हणणें जर अयोग्य असेल तर आपण मोठ्या शांतपणानें सत्यतेचें उल्लंघन न करितां त्याचें खंडण करावें.

४ जेथें विद्वानांचे सभेचा वास असतो तेथें दांभिक धर्माधिकारी, जूलमी अधिकारी, व कुटिलकर्म करणारे उघडे पडतात,

५ नीतिमान, सज्जन व विव्दान् तसेंच स्वदेशाभिमानी ह्यांस सभा जन्म देते.

६ अध्यक्षाशिवाय सभेची व्यवस्था बिन नायकाच्या फौजेसारखी होते.

७ सभेला अध्यक्ष पोक्त, विव्दान्, नम्र, व चलाख असा असला पाहिजे.

८ सभेंत कोणचाहि अपमान न होऊं देणें, कोणालाही उध्दटपणानें न बोलूं देणें आणि एकतर्फी ठराव होऊं न देणें, सर्वांस यथान्याय मोकळीक देणें, व सर्व कार्यांची दक्षतेनें मिसल लावणें हे अध्यक्षाचे मुख्य धर्म होत.

९ सभेंत भाषण करण्यांत फाजील वेळ न रोकणें, मधुर बोलणें बोलण्यांत श्रोतृजनांचा तिरस्कार न करणें हळूच युक्तीनें व नम्रपणानें दोष दाखविणें, सर्वांला समजेल असें अस्खलीत व धिमेपणानें बोलणें हें भाषण कर्त्यांचे धर्म आहेत.

१० सभेच्या कामास मदत करणें व सभेचे हेतु तडीस जाण्यास श्रम घेणें हें स्वदेशाभिमानी पुरुषाचें कर्तव्य आहे.

११ सभेंत जे ठराव होतील ते सभेच्या उत्पादकांनीं तसेंच अनुयायांनीं पाळिले पाहिजेत. कारण आपल्या कल्याणार्थ ज्या योजना काढिल्या त्यांचा आव्हेर करणें. म्हणजे मुख्य सत् कृत्यावर कुठार मारिली असें होणार नाहीं काय ?

१२ सभेंत जो ठराव होईल तो सर्वांना सारखा फायदेकारक असावा.

१३ सभेंत खानगी संबंध आडवा आणून तिचें कामास व्यत्यय आणूं नये.

१४ सभेंत एकादे व्यक्तीकडून आपला अपमान झाला किंवा एकादी गोष्ट आपल्या मनाप्रमाणें न झाली किंवा सामनेवाल्यास एकादे कामीं जय प्राप्ती झाली म्हणून आपण [ सुज्ञानें ] सभेस मदत करण्याचें सोडूं नये व तिचे विरुध्दही प्रयत्न करूं नये.

१५ सभेंत भाषण कडक, कठोर, अश्लाघ्य अशा शद्बांनीं होऊं नये कारण सत्य प्रसारणार्थ प्रभूनें सुशद्ब दुनियेंत पुष्कळ ठेविले आहेत. आपल्यास ज्याकडून त्रास पोंहोंचतो त्यास जर आपण निंदा व्यंजकशद्ब किंवा दुरुत्तरें बोललों तर त्यामुळें आपलें वजन न वाढतां इतर सभ्य गृहस्थ आपली किंमत उलट कमी समजतात.

१६ सभेंत व्यर्थ तकरारी वाढविण्यांत वेळ खर्च न करितां त्यांचा अंत सत्वर आणावा; कारण ऐक्य वृद्धिंगत होणें हा सभेचा मुख्य हेतु असतो.

१७ भाषणांतील शाद्बिक चुकीकडे किंवा एकाद्या खोडीकडे लक्ष्य न देतां ग्राह्याग्राह्यतेकडे लक्ष्य द्यावें.

---

# अपंग

१ अपंग ह्मणजे व्यंग किंवा उणेपणा अर्थात् कोणत्याही वस्तूंत किंवा प्राणास कोणत्याही पदार्थाचा, वस्तूचा, अवयवाचा अथवा मनुष्याचा किंवा ज्ञानाचा उणेपणा असणें.

२ कोणास ज्या वस्तुचा कमीपणा आहे त्या वस्तुबद्दल अशक्त

हीन आणि दीन आहे. यास्तव त्याला आपल्याच्यानें बनेल तर ती वस्तु पुरी पाडणें ह्मणजे त्याची ती उणीव भरून काढणें ह्याला परमार्थकृत्य ह्मणतात. ह्याची उत्पत्ति दयेपासून ह्मणजे सर्वांस सुख असावें अशी जी बळकट इच्छा तीपासून होते.

३ ज्याला वस्तूची उणीव असेल त्याला ती पुरी पाडण्यांत आली म्हणजे त्याला त्या बद्दल आनंद होऊन ती पुरी पाडणाराविषयीं त्याच्या मनांत पूज्य बुद्धि उत्पन्न होते व त्याचे तो कल्याण इच्छितो. जगास हा मनुष्य प्रिय व उपयोगी वाटतो यास्तव लोकांकडून त्याला मान देण्यांत येतो.

४ दुसऱ्याच्या उणवि भरून काढणारास आपण त्याच्या सुखास कारण आहों असें वाटून दुसऱ्याची उणीव भरून काढण्यांत जें त्याला नुकसान झालेलें असतें त्याच्या बदल्यांत त्याच्या मनांत आनंद व संतोष उत्पन्न होतो. म्हणजे त्यानें त्याच्या बदल्यांत आनंद व संतोष विकत घेतला असें नव्हे कां ?

६ अपंगास साह्य करणें हा आपला धर्म आहे. कारण परमेश्वरानें आपणांस शक्ति दिली आहे. यास्तव तिचा त्याच्या इच्छेप्रमाणें म्हणजे सदुपयोग न केला तर आपण अपराधी होणार नाहीं कां ?

---

## स्वभाव.

१ स्वभाव म्हणजे आपली वासना, इच्छा, मनोवृत्ति किंवा प्रकृति.

२ जितक्या प्राण्यांच्या आकृति आहेत तितक्या प्रकृतिही आहेत; कारण जसी संगत प्राप्त होते त्याप्रमाणें प्रकृति उत्पन्न

होते. कोणाला सारखी संगत मिळत नाहीं. त्यांत कांहीं तरी न्यूनाधिकता असते हेंच भिन्नभिन्न प्रकृत्तिस कारण होय.

३ ज्या ज्याप्रमाणें संगत पालटत जाते त्या त्याप्रमाणें प्रकृति ( बुद्धि ) ही पालटत जाते; परंतु मूळ संगतीचें बीज ज्या प्रमाणें वस्तूचा नाश झाल्याशिवाय किंवा तिचें स्वरूप बदलत नाहीं. तद्वत् नाश पावत नाहीं अथवा अगदीं स्वरूप बदलून टाकित नाहीं. ह्याच्याच गर्भित अर्थ श्रेष्ट कुलोत्पन्नास प्रसंग पाडण्यांत आहे.

४ आपल्या बऱ्या किंवा वाईट स्वभावाची परिक्षा आपल्यापेक्षां इतरास लवकर होते. ह्याचें कारण आपल्या स्वभावाची असर आपल्यापेक्षां इतरास प्रथम होतें ह्यामुळें आपल्या आचरणानें [ ज्याप्रमाणें स्वभाव असेल तसेंच आचरण करण्यांत येते. ] दुसऱ्यावर काय परिणाम झाला ह्याचा विचार व तपास करून आपलें आचरण [ स्वभाव ] सुधारण्याचा प्रयत्न करावा. ( ह्या अर्थाचा समावेश जगताकडे लक्ष द्यावें ह्यांत आहे. )

५ आपल्या स्वभावाप्रमाणें आपलें आचरण असतें व आपल्या आचरण वर आपलें सुख दुःख अवलंबून असतें यास्तव आपला सुस्वभाव करण्याचा हळुहळु सर्वांनीं प्रयत्न केला पाहिजे.

६ जोंपर्यंत बुद्धीला जडत्व [ स्थिरता किंवा पुढें वाढण्याच्या गतीचें मंदत्व ] आलें नाहीं तोंपर्यंत संगतीची असर लवकर होऊन स्वभाव पालटु शकतो. [ ह्यालाच बाळकाळ म्हणतात ] कारण ज्याप्रमाणें हाडें मनुष्याच्या आंगांत पूर्ण वाढीस आ-

ल्यावर लवत नाहींत किंवा अति कठिण पडते. त्याप्रमाणें बुद्धीची वाढ आटपल्यावर ति लवूं शकत नाहीं. चांगला स्वभाव ठेवावा हें प्रत्येक मनुष्याच्या हितास कारण होय.

---

## लहर.

१ लहर म्हणजे मनाचा कल, झोंक, वळण किंवा परिणामाच्या विचारा शिवाय मनाची इच्छा अथवा अखेरीवर धोरण ठेवल्या शिवाय कोणतेही कार्य करण्यांस तैयार होणें किंवा आरंभ करणें म्हणजे मनांतून आपण निस्पृही निष्काळजी आहोंत व आपली वर्तणूक वेपर्वाईची आहे. असें लोकांस दाखविणें. अर्थात् आपण इतके मूर्ख आहों अशी लोकांची खात्री करण्यास इच्छिणें. आश्चर्य किती मूर्खपणा?

२ लहरींत जें कार्य मनुष्य करतो तें चुकीचें म्हणजे अपायकारक असतें. कारण त्या वेळेस तो एक प्रकारच्या तारेंत ( निशे सारखा ] असतो.

३ ज्या वेळेस लहरींत मनुष्य आपला मोठेपणा लोकांस दाखविण्याचा प्रयत्न करतो त्यावेळेस लोकांच्या मनांत मात्र तो ज्यास्त हलका व मूर्ख ठरतो

४ लहरींत मनुष्य आपला मोठेपणा दाखविण्यास व्यर्थ खर्चांत येतो, लोक त्याला चढवितात. अखेरीस तेच त्याची फजेती करतात.

६ लहरींत मनुष्याच्या कृत्यावर कोणाचा विश्वास नसतो. लोकांत त्यांचें वजन नसतें त्यांचें कार्य सिद्धिस जात नाहीं. आणि लोक पाठिमागें त्याला हंसतात व त्याची थट्टा मात्र करतात.

---

# परधर्म

१ परधर्म किंवा दुसऱ्याचा धर्म म्हणजे आपल्या मताविरुद्ध आपल्या रीतीच्या उलट आपल्याला पसंत किंवा सोइवार नाहीं असा धर्म.

२ परधर्माची निंदा करू नये. कारण तो जरी आपणास पसंत नाहीं किंवा सोईवार नाहीं तरी तो परलोकवास म्हणजे जो त्याधर्माचा आहे त्यास हीतकर आहे. तर आपणास ज्यापासून नफा नाहीं परंतु त्यापासून दुसऱ्यास फायदा आहे. यास्तव त्याची निंदा करणें ही ईर्षा किंवा हलकट बुद्धि नव्हे कां ?

३ परधर्माच्या लोकांसही साह्य करावें व त्यांच्या दुःखाकडे ही दयार्द्र अंतःकरणानें पाहावें. कारण असें न केलें तर त्यांना ( पर धर्मींना ) जो मार्ग हितकर नाहीं. त्यांत त्यांना गमन करण्याची फर्ज पाडणें किंवा इच्छिणें नव्हें कां ?

४ धर्म सर्व मनुष्यप्राण्याचे एक आहेत; [ दया, क्षमा, शान्ति, मर्यादा, धैर्य, दमन, ज्ञान, नम्रता, उपकार ] परंतु हे पाळण्याची रीत किंवा आचार भिन्न आहेत. ह्यामुळें परस्पराचा मतांत विरोधता उत्पन्न होऊन परस्पराविषयीं अल्प बुद्धि जनाचा तिरस्कार उत्पन्न झालेला असतो. परस्पर भोजन नसण्याचें

कारण आचार भिन्नता आहे. जसें एखाद्याशी आपले खानगी रीतीनेंही वांकडे असलें तर आपण त्याच्या येथले पाणीही ग्रहण करित नाहीं, कारण ज्या आचाराचा अथवा रीतीचा आपणास तिरस्कार आहे त्या आचार व रीतीस अनुसरून वागणारा जवळ आपले कसें पटेल?

५ एकंदरींत परधर्मापासून भिऊन दूर असावें व आपल्या धर्माचें संरक्षण करावें. आणि तसेंच परधर्माची निंदा किंवा तिरस्कार ही करूं नये. सर्व धर्माच्या लोकांशी नम्रतेनें वागावें. सर्व प्राणि ईश्वराचे आहेत यास्तव सर्वांवर दयादृष्टि ठेवावी. कोणाशीं वैर उत्पन्न होईल अथवा कोणास वाईट वाटेल असें वर्तन करूं नये.

---

## कान नाहीं पण सान.

१ कान नाहीं पण सान ह्मणजे कोणतीही गोष्ट करणें, किंवा कोणाविषयीं मत बांधणें अथवा कोणतेंही कार्य करणें तें स्वतःच्या कानानें ऐकून किंवा स्वतः अनुभव घेऊन किंवा विचार करून करावयाचें तें न करतां ज्या प्रमाणें दुसरा ( जवळचा ) सांगेल किंवा अभिप्राय देईल त्या प्रमाणें करणें अथवा वर्तणें.

२ दुसऱ्याच्या सांगण्यावरून किंवा अभिप्रायाप्रमाणें आपण जें कांहीं कार्य करतो किंवा ज्या प्रमाणें वर्ततों त्याची जोखीम त्या मनुष्यावर नसून आपल्यावर आहे. व त्याच्या बऱ्या

वाईटाचा परिणाम आपणास भोगावा लागणार आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

३ स्वतः च्या अनुभवानें किंवा अक्कलेनें न करता दुसऱ्याच्या तंत्रानें जें कांहीं करण्यांत येतें, त्याचा परिणाम आपण फसले जाऊन आपल्या हातून अनर्थ घडतात हा होतो. परंतु अनर्थ होण्याच्या आगोदर आपणास कळत नाहीं किंवा आपले डोळे उघडत नाहींत, व तो झाल्यावर आपण ज्याच्या सल्यानें हें काम केलें त्याला दोष देण्यास तयार होतों किंवा आरंभ करतों ह्यामुळें आपली जास्त फजीती व नुकसान होतें.

४ परक्याच्या तंत्रानें वागल्यानें ज्या वेळेस आपण पेचांत येतों त्या वेळेस ते आपली सुटका करण्यास येत नाहींत. पण आपल्या मूर्खपणाबद्दल आपल्या निंदेचे पवाडे मात्र घरोघरीं गात फिरतात.

५ परमेश्वरानें आपणास ऐकण्यास कान, पाहाण्यास चक्षु, विचार करण्यास ज्ञान दिलें असून त्याचा उपयोग न करतां, ह्मणजे परमेश्वराची अवज्ञा करून, अज्ञानां सारखे निर्बळ होऊन दुसऱ्याच्या तंत्रानें वागून आपला नाश करून घेऊन पुढें पश्चात्ताप करीत कां बसावे ?

---

## प्रीति.

१ अंतःकरणाच्याठायीं ज्याचा वियोग दुःखकारक वाटतो व त्याचा संयोग आनंदास कारण होतो.

२ ज्यापासून आपणास सुख होतें किंवा होईल अथवा ज्या पासून आपणास फायदा आहे अथवा मनास आनंद होईल तेथें प्रीति उत्पन्न होते. त्या सुखाची किंवा फायद्याची आशा नष्ट होतांच तो प्रीतीचा झरा बंद होतो.

३ परस्पर मतलबाची प्रीति कारणापुरती बळेंच व अतिशय जी दाखविण्यांत येते तिचा कार्या नंतर एकदम नाशही होतो.

४ शुद्ध प्रेमाची प्रीति मात्र कायम रहाते. कारण परस्पराच्या सुख दुःखाचा परिणाम परस्परावर अवलंबून असतो.

५ प्रेमाची प्रीति संयोगकाळीं जितकें सुख देतें तितकें वियोगाच्या वेळेस दुःखास कारण होतें.

६ प्रीति ह्मणजे माया यास्तव तिचें मूळच दुःखांतून उत्पन्न झालेलें आहे. यास्तव तिचें फळ किंवा परिणामही दुःखकारक होणार आहेत.

७ प्रेमाच्या प्रीतींत एकनिष्ठा व दृढ निश्चय याशिवाय मनास सुख वाटेल अशी दुसरी कोणतीही वस्तु सांपडावयाची नाहीं.

---

## परगृहवास.

१ परगृहवास ह्मणजे ज्या ठिकाणीं आपला हक्क नाहीं. सत्ता नाहीं अशा ठिकाणीं आपल्या गरजेस्तव अथवा दुसऱ्याच्या तंत्रानें वागणें भाग आहे यास्तव होणें.

२ दुसऱ्याच्या घरीं राहिल्यानें त्याच्या तंत्रानें आपणास वागावें लागतें, आपली स्वतंत्रता नष्ट होते, ह्मणजे आपणास लघुत्व प्राप्त होतें. कारण तो दाता व आपण याचक असें ठरलों.

३ दुसऱ्याच्या घरीं राहिल्यानें आपणास अपमान सहन करावा लागतो. आपणा कडे मूर्खपणा येतो. आपली योग्यता नष्ट होते. आपणास हाजी हाजी खुशामत करावी लागते. इतकीं दुःखें असतात. कारण तेथें स्वकष्टाचें खाणें नसून दुसऱ्याच्या श्रमावर आपला निर्वाह होतो.

४ दुसऱ्याच्या घरीं राहिल्यानें मनुष्यास दुसऱ्याचीं मर्जी संपादन करण्याची विद्या येते. त्याला स्वतःचीं वस्त्रें शरीर व सामान ह्यांची वज व काळजी स्वतः कशी ठेवावी हें कळतें. स्वतःचें काम कसें काढून घ्यावें ह्याबद्दल त्याच्या अंगांत दक्षता येते. आळस, मिजास, तिरसटपणा हा त्याच्या अंगांतून जातो दुसऱ्यास दुःख दिल्यानें किंवा टोंचून बोलल्यानें त्याला कसें वाटतें, ह्याचा त्याला प्रत्यक्ष अनुभव असल्यानें त्याची वर्तणूक प्रेमळ दयाळू होते. स्वतःचें काम स्वतः करावें हा गुण त्याच्या अंगीं पूर्ण बिंबतो. एकंदरींत दुसऱ्या ठिकाणीं मनुष्य राहिल्याशिवाय त्याला ज्ञान व विद्या प्राप्त होत नाहीं.

---

## वचन.

१ वचन ह्मणजे कोणत्याही शर्तीनें कोणत्याही प्रकारचा बरा किंवा वाईट आपला कबूलजाबाचा शद्ब.

२ जो एकदां आपण कबूलजाब दिला किंवा कोणासही ज्याप्रमाणें दम अथवा विश्वास दिला तर त्याप्रमाणें न वागण्यानें त्याला दिलेल्या दमाचा किंवा विश्वासाचा नाश करून त्याच्या मनास अधीरता

अर्थात् अस्वस्थता उत्पन्न केली. ह्याचा अर्थ आपण आपल्या वचनाचा भंग केला व त्याच्याशीं विश्वासघात केला.

३ परस्पर विश्वासावर ज्या जगांचे सर्व व्यापार चाललेले आहेत व विश्वासाला मात्र सत्यतेचा आधार आहे. आतां जर आपण वचनाचा ह्मणजे सत्यतेचा भंग केला तर सर्व जगांतील व्यवहाराचा नाश केला असें नाहीं का ? आणि व्यवहाराचा नाश झाल्यावर जगाचा नाहीं कां होणार ?

४ ज्याठिकाणीं वचनाचा भंग होत नाहीं. तेथें परस्पर विश्वास असतो; ह्यामुळें तेथें कपट, लबाडी, दुर्बुद्धि, परस्पराविषयीं ईर्षा, द्वेष ह्यांचा प्रवेश होत नाहीं. आतल्या आंत फूट होऊन शत्रुचें घर भरलें जात नाहीं; निंदकांना थारा मिळत नाहीं व कोणाविषयीं हलका विचार मनांत येत नाहीं. एकंदर वचनाचा जेथें भंग नाहीं, ह्मणजे सत्यतेचा जेथें लोप नाहीं तेथें कोणत्याही दुर्गुणास थारा मिळत नाहीं; व परस्पर एकमेकांस सुख व्हावें अशी बुद्धि असते, व त्याप्रमाणें वर्तन करण्यांत येते ह्यामुळें ऐक्यतेची जूट कायम रहाते, व सुखाची वृद्धि होते. सारांश वचनाचा भंग न होणें हेंच सुखास कारण होय.

---

## गरज.

१ गरज ह्मणजे कोणताही पदार्थ, वस्तु, अथवा मनुष्य, बुद्धि नसल्यामुळें जें आपलें अडतें किंवा आपणास अडचण पडते नड येते अर्थात् आपलें कार्य सिद्धीस जात नाहीं ह्यालाच आवश्यकता म्हणतात.

२ जोंपर्यंत ज्या वस्तूची आपणास गरज किंवा आवश्यकता असते तोपर्यंत आपणास ती वस्तु प्रिय असते व त्याची किंमत आपणास कळते.

३ मनुष्य आपली गरज किंवा आवश्यकता ज्याठिकाणीं आहे तेथें मान पावतो, व त्याची तेथें किंमत केली जाते.

४ गरज पदार्थ साखरेपेक्षां फार गोड आहे. कारण आपली ज्या ठिकाणीं पार पडेल अशी मनुष्याला आशा उत्पन्न झाली म्हणजे तो त्या ठिकाणीं लीन व दीन होऊन जातो.

५ गरजेशिवाय मूर्खाच्या मनांतून अभिमानाचा नाश करणारा दुसरा पदार्थ ह्या पृथ्वीवर नाहीं. मूर्ख, अज्ञान, अशक्त, ह्यांना वारंवार दुसऱ्याची गरज पडते; ह्यामुळें त्याच्या नाकावरचें अभिमानाचें गुमडें वारंवार विरघळून लहान होत जातें. ह्याचा परिणाम ते सुखी होतात. सारांश सुज्ञाचा ज्ञानापासून व मूर्खाचा गरजेपासून अभिमान नाहींसा होतो.

---

# कंटाळा

१ कंटाळा किंवा त्रास म्हणजे कोणतेंही काम उद्योग किंवा प्रयत्न करण्यास प्रतिकूळ असें अल्प कारण पुढें होऊन, मनास अस्थीरता किंवा नाहिंमत उत्पन्न होणें, म्हणजे निश्चयाचा भंग होणें व त्या वेळेस पुढें करूं अशावर मनाची समजूत करणें.

२ पुरुष व स्त्री ह्यांत स्त्रीला जी अबला मानली आहे, त्याचें मुख्य

कारण स्त्रियांच्या अंगीं क्षणिक विचार म्हणजे अदृढपणा हा बहुतकरून असतो हेंच होय. ह्या वरून त्रासीक किंवा कंटाळा करणारा प्राणी म्हणजे ज्याचा निश्चय अल्प व पोकळ [ जें कारण विचारांतीं खोटें आहे हें त्यालाही कळूं शकतें ] कारणानें भंग होतो त्याला कोणती उपमा द्यावी किंवा योग्य आहे?

३ कंटाळ्याचा जेथें वास असतो तेथून उद्योग पलायन करतो व त्याचें परमस्नेही कीर्ति व लक्ष्मी ही त्याच्या पाठोपाठ धूम ठोकतात. या मुळें कंटाळा करणारा व त्याचें कुटुंब दोघे-ही दारिद्र्यानें वेष्टिलें जातात. त्या वेळेस त्याला कंटाळा व त्याच्या बरोबर त्रास उत्पन्न होऊन त्याचें धारिष्ट खचून जातें, त्याचीं ज्ञानेंद्रियें शिथिल पडतात. ह्या योगानें त्यांतून सुटण्या-चा त्याच्या हातून कांहीं प्रयत्न न होतां हा दैवा अरे नशीब, असे करितां करितां दुःखांत, संकटांत, काळजींत, अपमानांत त्याचा शेवट होऊन पाठीमागें त्याच्या नांवावर धिःकार मात्र राहून जातो.

४ कंटाळा करणारा प्राणी काम न करतां तें न होण्यास कांहीं तरी अडचणीची सबब शोधून काढतो, व आपला वांक लोकां-त न दिसावा ह्या बद्दल मात्र काळजी बाळगतो.

५ कंटाळा करणारा प्राणी काम करण्यास इच्छितो, परंतु तें पारपाडण्यास प्रयत्न करण्यापासून मागें हटतो. म्हणजे तो बदामाचा गीर खाण्याची वांच्छा ठेवितो, परंतु तीं फोडण्याचे श्रम करण्यास त्याला गोड वाटत नाहीं. ज्या ज्या वेळेस प्रत्येक कार्यांत त्याला निष्फळता प्राप्त होते त्या त्या वेळेस

दैवास पुढें करण्यास त्याला लाज वाटत नाहीं; परंतु ह्या योगानें परिणामीं त्याचेंच नुकसान होतें, हें त्याला कळतें; परंतु तो हें जगत्प्रसिध्द करीत नाहीं व आपली बढाई मात्र मारतो ह्मचा परिणाम मात्र तो आपणास जास्त हलका पाडून घेतो.

---

## स्वदेश.

१ स्वदेश किंवा आपला देश ह्मणजे ज्या देशांत आपल्या वडिलांचा व आपला जन्म झाला आहे; ज्या देशाच्या स्थितीवर आपलें सुख दुःख अवलंबून आहे; ज्या देशांत आपल्या जातीचे, आपल्या मताचे किंवा आपलें कल्याण इच्छिणारे व साह्य करणारे देश बांधव आहेत; आणि ज्या देशाच्या अन्न पाण्याचें शुध्द तत्व आपल्या बापाच्या पाठींत उत्पन्न होऊन आपल्या उत्पत्तीस कारण आहे; ज्या देशाची हवा, पाणी, वृक्षाची शितळ छाया, खाद्य पदार्थांचें सेवन, आपल्या वडिलांनें आज पर्यंत उपभोगिलें व आपण उपभोगीत आहों व आपले वशंज उपभोगतील ह्यामुळें त्याचे ( देशाचे ) आपण अभारी आहोत; व ज्या देशाच्या पृथ्वीच्या योगानें उत्पन्न झालों व आखेरीस त्याच पृथ्वींत आपला समावेश होणार आहे आणि ज्या पृथ्वीनें आपल्या पृष्टभागावर ह्मणजे छातीवर आपला बोजा उचललेला आहे, असा देश.

२ स्वदेश कसाही असो, पण आपण त्या देशाचे व तो आपला

देश म्हणजे आपला हा शद्ब जो त्याला लागलेला आहे, त्यामुळें आपण त्याचे होऊन राहिलें पाहिजे व त्याला आपला मानला पाहिजे.

३ आपला ह्या शब्दाचा ज्यास अभिमान नाहीं. तो मनुष्य नाहीं कारण ज्या वेळेस मनुष्य संसारांत असतो त्या वेळेस माझे आईबाप, भाऊबहीण, सोयेरधायेर, बायकोमुलें, धनघर, जमीनामित्र ह्या शब्दानें वेष्टित असून तदनुचिंतेंत मग्न असतो. त्या वेळेस मनुष्य साधु किंवा विरक्त होतो, त्या वेळेस माझा देव, माझा धर्म, माझें कर्तव्यकर्म ह्यांनीं वेष्टित असतो. सांराश माझा [ आपला ] ह्या शब्दारहित कांहीं नाहीं. कारण परमेश्वरासही माझे भक्त, माझे हा शद्ब आहेच.

४ स्वदेशस्व ह्मणजे आपला. आपला हा शद्ब किती मधुर व मनुष्याला गोड वाटतो? कारण आपला हा शद्ब जेथें लागू होत नाहीं तेथेंच भिन्नत्व उत्पन्न होऊन दंभ, लोभ, शत्रुत्व, खेद, अविश्वास, निष्काळजी ह्यांची उत्पत्ति होते, व वेळेस अपहाराची इच्छा प्रबळ होऊन नाना अनर्थ उत्पन्न करविते. तर पहा " आपला " ह्या शद्बाचे किती माहात्म्य आहे?

५ "आपला " ह्या शद्बाची योग्यता त्याचा उपयोग व "आपला" ह्या शद्बाकडे आपलें कर्तव्यकर्म हें ज्याला कळत नाहीं तो नरपशू होय. नाहींहो चुकलों तो नरपशूहू नही नीच. महानीच, निर्माल्य, निरुपयोगी, भुमीस भाररूप होय, त्याचें जीवन व्यर्थ होय. कारण त्याची स्थिति हातचे टाकून पळत्याच्या पाठीस लागणाऱ्या सारखी होते. तो मध्येंच लटांबळया खातो

व अखेरीस पश्चत्ताप, दुःख व अप्रतिष्टेंत काळाच्या शरणीं जातो.

---

# कर्ज.

१ कर्ज किंवा ऋण ह्मणजे आपल्या डोक्यावर कोणाचें देंणे, अथवा आपल्यावर कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क असणें अर्थात् आपण स्वतंत्र असता परतंत्र असणें.

२ आपण परमेश्वर, मातापिता, देशराजासंबंधीं मित्र व जो आपणास उपयोगीं पडला आहे, त्याचें ऋणी आहोंत, ह्या शिवाय इतरांचें ऋणी होण्याचा जो आपण प्रयत्न करतो, त्यांत आपला मूर्खपणा आहे. कारण आपण बुद्धीपूर्वक आपली स्वतंत्रता नष्ट करतो.

३ कर्ज काढण्यांचा जो आपणास प्रसंग येतो, त्याचें कारण आपल्या अद्यापेक्षां खर्च फार हें असलें पाहिजे. व आद्यापेक्षां खर्च फार यांत कां तर आपली गैर किंवा अव्यवस्था कारण असते. कां तर आपली स्थिती कारण असते. व ज्या वेळेस आपली गैर किंवा अव्यवस्था कारण असतें, त्या वेळेस आपल्या स्वतंत्रतेचा नाश होऊन आपणास मूर्खपणा व लोकाचा आपणाकडे तिरस्कार इतकी विशेष असतात आणि सर्वांत विशेष आपल्या शिरावर पश्चात्तापाचा एक बोजा पडतो, व व ज्या वेळेस स्थिति कारण असते, त्या वेळेस आपली स्वतंत्रता नष्ट होऊन लाचारी मात्र आपणाकडे येते.

४ यामुळें चालेल तोंपर्यंत कर्ज किंवा ऋण न काढणें किंवा करणें

हें सुखकर होय; परंतु दैन्यावस्थेमुळें किंवा अडचणीमुळें कर्ज काढावें लागतें; त्यावेळेस जरूरीपुरतें काढावें कारण पुढच्या आपल्या उत्पन्नांतून आपला निर्वाह करून जें उरेल त्यांतून ह्याची फेड करावयाची आहे. ह्मणजे जितकें आपण कर्ज काढूं तितकें एकदम फेडण्याची आपल्या अंगीं शक्ति नाहीं ह्मणजे तें कर्ज फिटेपर्यंत आपण त्या विवंचनेंत (काळजींत) रहाणार आहोंत. ह्यावरून जितकें कर्ज जास्त तितकें आपणास जास्त वेळ काळजींत रहावें लागेल व जितकें कमी तितकें कमी रहावें लागेल.

५ कर्ज काढल्यावर त्याच्या फेडीची काळजी ठेवावी ह्मणजे तिकडे दुर्लक्ष्य करून आपल्या खर्चांत काटकसर न करणें, अर्थात निरंतर कर्जाच्या विवंचनेंत राहण्याचें सुखकर मानण्यासारखें नव्हें काय?

६ ज्या मनुष्याला कर्ज नसतें, तो स्वतंत्र असतो त्याला कोणाची लुलुपत् करावी लागत नाहीं. कोणाचा ओशाळपणांत नसतो. तो चिंतेंत ग्रासीला जात नाहीं. सारांश तो सुखी असतो.

---

## यजमान आणि याचक.

१ यजमान आणि याचक किंवा आश्रयदाता, आणि आश्रित ह्मणजे रक्षण करणारा किंवा आश्रय देणारा व आश्रय मागणारा व रक्षणाची इच्छा करणारा होय.

२ आश्रय देणारा किंवा रक्षण करणारा हा कल्पतरुरूप वृक्ष होय,

व आश्रय मागणारा हा अनाथ व दारिद्र्यानें तप्त झालेला अशक्त प्रवासीरूपीं होय.

३ यजमानानें [ गृहस्थ ह्मणजे स्वतःचें पोषण करून कोणास यथाशक्ति सहाय करण्याचा ज्याचा धर्म आहे तो ] आश्रितांस साह्य यथाशक्ति हस्तेंपरहस्तानें करीत जावें. कारण ते याचक आपणावर अवलंबून आहेत.

४ याचकानें बनेल तोंपर्यंत यजमानास त्रास देऊं नये. कारण ज्याप्रमाणें शेत त्याच्या शक्तिप्रमाणें एकदां किंवा दोनदां पेरल्यानें अनंतकाळ पर्यंत त्याचा उपभोग घेता येतो. परंतु वर्षांतून दहा पांच वेळां पेरलें, तर त्याचा कांहीं एक उपयोग न होतां बहूतकाळ पर्यंत त्याच्या उपयोगापासून आपण मुकतो.

५ याचकवृत्ति शक्ति असून करूं नये कारण तसें केल्यानें दाता यजमानास जास्त त्रास पडतो व खरे याचक संकटांत पडतात. दान ह्या शद्बाचा अर्थ व्यर्थ गमावणें असा करण्यांत येतो व याचक ह्मणजे फुकट खाणारे लुटारू असा समज उत्पन्न होतो आणि आपण परमेश्वराचे व जगाचे चोर होतो.

६ यजमानानेंही पात्र पाहून दान करावें, नाहीं तर दानाचा उपयोग दुष्कर्माची वृद्धि होण्यांत होऊन देशास दैन्यावस्था प्राप्त होऊन आपणास पापाची मोट उचलावी लागते.

---

# मौन.

१ मौन ह्मणजे शांतता नष्ट होईल. कार्याचा भंग होईल किंवा दुःख व पश्चात्ताप उत्पन्न होईल यास्तव तशा वेळीं शब्दोच्चार न काढतां स्वस्थ बसणें.

२ मनुष्यानें मौन धारण केल्यानें कलहाची उत्पत्ति होत नाहीं. कारण ध्वनिस प्रतिध्वनि मिळाल्यावांचून क्रोधाची उत्पत्ति होत नाहीं.

४ आपला ज्यांत संबंध नाहीं किंवा ज्यांत आपणास कोणी बोलाविलें नाहीं, त्यामध्यें पडूं नये. कारण त्यापासून आपणास व्यर्थ त्रास पडून आपला अपमान होतो. ह्यामुळें व्यर्थ क्रोधाग्नींत जळून पश्चात्तापानें शांत होण्याची आपणास शिक्षा होते.

५ जोंपर्यंत मनुष्यानें मौन धारण केलें आहे, तोंपर्यंत त्याचे अव-गुण दुसऱ्याच्या लक्षांत येत नाहींत व त्याच्याविषयीं चांगलें-च तर्क मनांत येतात.

६ क्रोधाग्नीची झळ [ लुक ] मनुष्याला लागून त्यांचें भस्म न व्हा-वें यास्तव परमेश्वरानें मनुष्यास मौन हा मंत्र दिला आहे.

---

# स्वदेशहितचिंतक.

१ स्वदेशहितचिंतक ह्मणजे माझा देश कोणता, हें ज्याच्या नेहमीं आठवणींत रहातें. माझ्या देशाप्रीत्यर्थ माझें कर्तव्य काय ह्या विषयींचें विचार ज्याच्या डोक्यांतून कधींहीं

पलायन करित नाहींत. माझ्या देशाची स्थिती काय आहे? माझा देश कोणत्या संकटानें आच्छादित आहे; माझे बांधव कोणत्या विवंचनेंत गर्क आहेत; ह्याच्या शोधांत ज्याचें अंतःकरण नेहमीं आत्मविचारांत फिरत आहे. स्वदेश बांधवांचीदुर्दशा पाहून ज्याचें डोळे पाण्यानें भरतात, अंतःकरण दयारूपी उ-ष्णतेनें विरघळते. मी जो ह्या देशांत उत्पन्न झालों व ज्याच्या योगानें आजपर्यंत पोसला गेलों. मातेच्या गर्भातून निघालों, त्या वेळेस मी जो विष्टेंत लोळत होतों, तो ह्या देशाचें अन्न, पाणी. हवा, औषधी व ह्या देशाचे माझे देशबांधवांच्या साह्यानें आज ताठ उभा राहु शकतो. म्हणजे आपत्तीच्या वेळीं मला जें साह्य मिळालें व पुढेही मिळणार आहे. यास्तव ह्या देशा-चा जो मी ऋणी आहें, तर मी त्या कर्जाच्या व्याजाचा तरी कांहीं भाग परत दिला किंवा नाहीं, ह्या विचाराचा नेहमीं प-थारींत निजण्यापूर्वी जो विचार करतो. स्वदेशरूपी नौकेंत मी व वंशज बसलों आहोंत तर माझ्या वंशाच्या कल्याणाचा आधार स्वदेशरूपीनौकेच्या सुरक्षतें वर अवलंबून आहे हें, ज्याला कळूं शकतें. माझ्या मातेनें मला कांहीं ( अल्प ) काळापर्यंत आपल्या छातीवर बाळगिलें; परंतु ह्या स्वदेशपृथ्वीनें आजन्मपर्यंत आपल्या पृष्टभागावर आश्रय दिला आहे.

२ आखेरीस त्याच्याच उदरांत माझा समावेश होणार आहे. ह्यामुळें स्वमातेपेक्षांही मी स्वदेशाचा जास्त ऋणी आहे, असें ज्याला कळू शकतें. स्वमाता ही माझ्यांत एखादा अती वाईट दुर्गुण असला, तर माझा त्याग करील; परंतु मी किती

ही नीच आहें किंवा असलों तरी स्वदेशांत माझा समावेश होत आहे. तर स्वदेशाचें पोट किती मोठें आहे, ह्याची तुलना ज्याच्या अंतःकरणांत होऊ शकते. माझा देश ह्या शब्दाच्या अभिमानानें ज्याचें अंतःकरण फुगलेलें आहे, असा मनुष्य.

३ स्वदेशहितचिंतक रणांत प्रवास करणाऱ्या तप्त प्रवाशांस शितल जलरूप उपयोगी आहे. संसारांत दग्ध झालेल्या मनुष्यास शीतल करण्यास जसे साधु पुरुष होत, तसे देशासस्वदेशहितचिंतक शंकटरूपी तापाचा नाश करून शीतल जलाचा वर्षाव करणारे आहेत. दुष्ट जनाचा नाश करून स्वराज्याच्या प्रजेत नितीमान व स्वधर्म जाणणारास शांततेचा वास करवितो. तव्दत् देशास स्वदेशहितचिंतक ही सुखाच्या प्रवाहानें स्वदेशबांधवांची तृषा तृप्त करितात नौकेचा समुद्रांत नाश होऊन एखाद्या बुडत्या मनुष्याच्या हातीं एखादी फळी लागल्यानें ती जसी त्याच्या बचावास कारण होते, तव्दत् स्वदेशहितचिंतक हे देशांत स्तंभरूप आहेत. अनाथ मुलाचें पालन करणाऱ्याहूनही स्वदेशहितचिंतकांची योग्यता मोठी आहे. विजयी सरदाराहून त्याची प्रतिष्टा थोर होय. वायुपेक्षांही त्याची कीर्ति लवकर व्यापते. पर्वतापेक्षांही त्याच्यां सुकीर्तिचे स्तंभ स्थिर रहातात. अहो, स्वदेशहितचिंतकाची काय थोरवी? त्यांचें नांव निघालें कि सर्वांच्या पूज्यबुद्धिनें माना खालीं वाकतात. दुर्बळ त्याच्या कल्याणाविषयीं ईश्वराजवळ भिक मागतात. थोर त्यांचें कल्याण असो, असें इच्छितात व करतात. त्यांना मान देतात. आणि धन्य आहे त्या मावलीला कि अशा सुपूत्रास उदरीं

जन्म दिला; असें सर्व जग ह्मणतें. एकंदरीं तमाम वित्त, आनंद, कल्याण व सुख ही सर्व स्वदेशहितचिंतकाच्या अधीन असतात.

---

## आत्मश्लाघ्यनिंदा.

१ आत्मश्लाघ्यनिंदा ह्मणजे स्वतःच्या स्तुतीचा तिरस्कार करणें. स्वतःची स्तुति ऐकून स्वतःची खरी योग्यता विसरून फुगून न जाणें. अर्थात् स्वतःची योग्यता वाढविण्यास इच्छिणें.

२ ज्याला स्वतःविषयींच ज्ञान नसतें, तो स्वस्तुतींत गर्क होऊन आनंदसागरांत मूर्छा पावतो.

३ जर मला स्वतःची स्तुति प्रिय झाली तर माझे दुर्गुण मला कसे कळतील? ह्यावरून स्वतःची स्तुति प्रिय होणें ह्मणजे स्वतः अज्ञान असण्याची इच्छा करणें नव्हे का?

४ जर मी माझ्या सद्गुणाकडे लक्ष देऊन त्यांत संतोष मानला तर माझ्या सद्गुणाची वाढ कुटणें बंद होईल व माझ्या ज्ञानाची वृध्दि होण्यांत मी प्रतिबंध केला असें होईल.

५ मी जर माझ्या शरीराकडे नजर केली, तर त्यांतला कोणता अवयव शुध्द आहे? सर्व मलीन पदार्थानें भरलेले आहेत. माझी कोणती इंद्रिय आलस्यारहीत आहेत, असा कोणता धन्य दिवस माझ्या आयुष्याचा उजेडला आहे किं ज्या दिवशीं मी कायावाचामनें करून सत्यतेचा लोप केला नाहीं अशी कीं, ज्या वेळेस मझें मन, काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादिकानें कोणती वेळ गेलेली माझ्या आयुष्यांत मला आठवत नाहीं.

किं ज्या वेळेस माझें मन काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादि कांनीं वेष्टिलें नसून शुध्द सद्विचारांत लीन आहे, असें माझें कोणतें कर्म आहे कीं ज्यांत स्वार्थाचा लेशही नसून परमार्थ मात्र राहिलेला आहे, असे माझे कोणते विचार आहेत कीं ज्यापासून कोणास दुःख न होतां माझें कार्य साधेल? सारांश असें माझें कोणतेंच कर्म नाहीं कीं ज्याच्या स्तुतीचे पवाडे मी गात बसूं.

६ मी जर माझ्या स्तुतींत लीन झालों तर मी दुसऱ्याच्या स्तुतीची किंमत न करता तिचा द्रोह केला असें नाहीं कां होणार?

७ मी जितकी माझी निंदा करीन ह्मणजे जितके मला माझे दुर्गुण कळतील, किंवा माझ्या लक्षांत येतील तितके ते सुधारण्यात मी प्रयत्न करणार नाहींकां? व त्या योगानें माझी योग्यता नाहीं कां वाढणार? आतां मी जितकी माझी निंदा करीन तितकी माझी योग्यता वाढण्याचा रस्ता मोठा झाला असें नव्हे काय?

८ जर मी माझ्या प्रत्येक कर्माबद्दल निरपेक्षबुद्धीनें विचार करीन, तर त्यांत स्तुतीस योग्य असें एकही मला आढळणार नाहीं.

९ मी जर माझी स्तुति करूं लागलों, तर मी माझ्या दुर्गुणांत वृद्धि करण्याची इच्छा करितों असें होईल.

---

## स्वज्ञाति.

१ स्वज्ञाति ह्मणजे आपली जात किंवा आपल्या मताच्या आचरणानें वागणारे. आणि ज्या जातीच्या वर्तनाच्या प्रचारावर, आचारावर आपलें आचरण अवलंबून असल्यामुळें त्या जा-

तीच्या स्थितीवर आपली स्थितीही अवलंबून आहे. कारण वर्तन किंवा क्रियेप्रमाणें काळ व काळास अनुसरून स्थिती असते.

२ आपली स्थिती स्वजातीच्या स्थितीवर अवलंबून असल्यामुळें तिची ( स्वजातीची ) स्थिती चांगली असणें किंवा करणें हा आपला धर्म होय.

३ आपल्या विचाराचें किंवा आपल्या समान व आपल्या सारखें वर्तन करणारे व आपणास उपयोगी, अशांस स्वतःकष्ट सोसूनही साह्य करणें, त्यांना उपयोगी पडणें, त्यांच्या मनांत आपल्या विषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न करविणें व त्याची कृपा संपादन करणें हा मनुष्य प्राण्याचा नैसर्गिक धर्म आहे.

४ स्वज्ञातीमध्यें अहंकार ठेवूं नको. कारण ते तुझ्या समान आहेत, व असें केल्यानें त्याच्या मनांत तुझ्या विषयीं बेपर्वा व तिरस्कार उत्पन्न होईल.

५ स्वज्ञातीस आपल्या शक्तीप्रमाणें वेळोवेळीं साह्य केल्यानें तिचा बोज राहतो. परक्याच्या तोंडाकडे पाहण्याची तिला वेळ येत नाहीं. व आपल्या पडतीच्या वेळीं आपणास मदत मिळते.

६ स्यज्ञातीच्या मनांत आपल्या विषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न करणें ह्यालाच यश ह्मणतात. ह्मणजे हेंच संसाराचें बीज होय.

७ स्वज्ञातीशीं वैर करूं नको कारण तसें केल्यानें तुझा निभाव कसा लागेल? जळांत रहाणें व माशांशीं वैर न करावें, कारण अखेरीस तूं संकटांस येऊन व पश्चात्ताप होऊन तुला दीनासारखी क्षमा-मागावी लागेल.

८ स्वज्ञातीचा अभिमान धर, कारण तूं त्या इमारतीचा स्तंभ आहेस आणि तुझ्याच जर मुळाशी कीड लागेल, तर त्या इमारतीचा निभाव कसा लागेल.

९ स्वज्ञातीशी नम्र व प्रामाणिक ऐस असें केल्यानें तुझी योग्यता वाढेल व तूं मान पावशील व तुझें वजन दुसऱ्यावर पडेल.

१० स्वज्ञातीचें कल्याण इच्छित जा; कारण तिच्या कल्याणावर तुझेंही अवलंबून आहे.

११ स्व ज्ञातीचा तिरस्कार करूं नको. कारण डाहाळ्याच्यानें वृक्षाची निंदा करवेल काय?

---

## परदुःख.

१ परदुःख ह्मणजे दुसऱ्याचें, परक्याचें किंवा परिणाम अथवा असर आपणावर होणार नाहीं असें दुःख.

२ दुसऱ्याच्या दुःखाकडे तुझें अंतःकरण कोमळ कर. कारण धर्माच्या मुळाच्या शीरा दया होत.

३ परदुःख निवारणार्थ तुझ्यानें होईल तेवढा तुझ्या शक्तीचा उपयोग कर कारण त्या शिवाय जगांत पश्चात्ताप रहित अक्षय आनंद देणारा झरा दुसरा नाहीं.

४ परदुःख पाहून तुझें अंतःकरण कठीण करूं नको कारण असें केल्यानें तूं तुझा निर्दयपणा जगापुढें उघड करून आपलें नांव निंदेस व तिरस्कारास पात्र करून घेशील.

५ तुझ्या चांगल्या काळांत परदुःख निवारणार्थ प्रयत्न कर,

ह्मणजे तुझ्या पडतींत तुला खालीं पहावें लागणार नाहीं, व तुझ्यावर लोकांची पूज्यबुद्धि असल्यानें तुला साह्य मिळेल.

६ चढतींत परदुःखाची हेळसांड किंवा बेपर्वा व थट्टा करू नको. कारण असें केल्यानें लोकांत तुझ्याविषयीं हलका विचार उत्पन्न होईल व तुला अखेरीस लज्जेंत गर्क व्हावें लागेल.

७ चढती किंवा सुस्थिती देण्याचा परमेश्वराचा मुख्य उद्देश तुझ्या हातून दुःखीत व निर्बळास साह्य मिळावें असा आहे. चढतीचा किंवा तुला पाहिजे त्यापेक्षां ज्यास्त साधनाचा अथवा प्राप्तीचा तूंच उपयोग करावा असें नाहीं. कारण असें असतें तर, ज्याप्रमाणें तुझी संपत्ति वाढली त्याप्रमाणें तुझा आहार वाढवावयाला नको कां?

८ चढती, हेतु, ज्ञान, नीति व दया ह्यापासून दूर होतोस किंवा नाहीं हें पाहण्याची कसोटी आहे.

९ आज जर परदुःख पाहून तुझें अंतःकरण विरघळेल, तर उद्यां पडतींत त्या विरघळलेल्या जळामुळें तुझ्या दुःखाग्नीची शान्ति होऊन ता ( दुःखाग्नि ) तुझ्या अंतःकरणास जाळू शकत नाहीं.

१० परदुःख जाणणारास स्वदुःख असर करूं शकत नाहीं. तो लोकांत मान्यता पावतो त्याच्याविषयीं सर्वांची पूज्यबुध्दि असते. त्याला संकटांत साह्य मिळतें, त्याला पश्चात्ताप करावा लागत नाहीं. लज्जेंत गर्क होण्याचा प्रंसग येत नाहीं. अनंतकाळ जाऊन पाठीमागें सुकीर्ति राहून जाते.

———

# स्वदेशकल्याण.

१ स्वदेशकल्याण किंवा आपल्या देशाचें हित ह्मणजे आपलें ज्या देशांत वास्तव्य आहे, किंवा ज्या देशाच्या हिताहितावर आपली स्थिती व परिणाम अवलंबून आहे, अशा देशाची उन्नति. ज्या देशाचे आपण उतराई आहों त्या देशाचे कल्याण इच्छिणें व करणें हें आपलें कर्तव्यकर्म व भूषणरूप होय. अशा देशाचें शुभ होणें ज्या देशाला माझा देश, असे आपण आनंदानें व छाती ठोकून ह्मणु शकू. अशा देशाची भरभराटी होणें, जो देश आपल्या व आपल्या वडिलांच्या उत्पत्तीस कारण आहे, व अखेरीस आपल्या वडीलांना ज्यांनीं आश्रय दिला आहे व आपणास ज्यापाशीं आश्रय मागावयाचा आहे, किंवा ज्यापासून मिळणार आहे अशा कीर्तीस चढणें ज्या पृथ्वीनें आपल्या छातीवर आपला भार सहन केला आहे, अशा देशावर सुखरूप जलाची वृष्टि होणें किंवा आनंद समुद्रांत मग्न असणें.

२ स्वदेशाचें कल्याण करणें व इच्छिणं हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्यकर्म होय. कारण स्वदेशाचें कल्याण हें पर्यायानें स्व-बांधवाचें कल्याण होय. आतां स्वतःचें कल्याण किंवा स्वतः-चें पोट तर श्वानही भरतें, तर त्यांत आणि मनुष्यांत अंतर तो काय? एक दुसरें स्वदेशाचें कल्याण केल्यानें लोकाची आपल्यावर प्रीति बसते, व आपली प्रतीष्टा वाढते व आपल्या पडतींत लोक आपल्याकडे शुध्द अंतःकरणानें पहातात व साह्य करतात. आपल्या पाठिमागें कीर्तीरूप आपलें वनां

राहून जातें. तिसरें. आपल्या हातून इतका प्राण्याचें कल्याण झालेलें असल्यामुळें आपला आत्मा शांततेंत ईश्वरपदाकडे गमन करतो. चवथें. आयुष्यामध्यें अपमानरूपी शत्रूची भेट घ्यावी लागत नाहीं.

३ स्वदेशकल्याण करण्याच्या कामीं जीं जीं कष्टें आपणावर पडतात तीं तीं आपला उज्वल श्रेष्ट गुण प्रकाशांत आणण्यास कारण होतात.

४ स्वदेशकल्याणाच्या कामीं जेवढे श्रम पडतात तेवढे स्वजनाच्या प्रीतिरूप पुष्पवृष्टींत गाडून टाकण्यास कारण होतात.

५ स्वदेशकल्याण करण्याच्या कामीं जेवढें नुकसान होतें तेवढें आपल्या औदार्याची व स्वदेशप्रीतिविषयीं लोकांत ख्याती करण्याचें कामीं खर्च पडलेलें असतें, त्यापैकीं एक कणही वाया जात नाहीं.

६ स्वदेशाचें कल्याण तें आपलें कल्याणच होय. कारण स्वदेशाच्या स्थितीवर आपली स्थिती अवलंबून आहे. कारण स्वदेश हा एक तारू[ जहाज ] होय, व आपण त्यांत एक उतारू आहों. यास्तव जोंपर्यंत ती नौका सुरक्षित असेल तोंपर्यंत आपणही सुरक्षीत असूं व ज्यावेळेस त्या नौकेचा नाश होईल त्यावेळेस आपणही आपत्तीरूपीं समुद्रांत पडूं.

७ स्वदेशाचें आपण फार आभारी आहों, कारण आपण जेव्हां लहान होतों तेव्हां आपल्या आईनें तिच्या छातीवर आपला भार सहन केला; परंतु स्वदेशमातेजवळ आपण आजपर्यंत अज्ञान किंवा लहान आहों, यास्तव जन्मपर्यंत आपणास

छातीवर स्वदेशीं बाळगीत आहे. तर स्वमातेपेक्षांही आपण स्वदेशाचे ज्यास्त उतराई नव्हें कां?

८ आपण स्वदेशाचें ह्मणजे स्वबांधवाचें कल्याण करण्यांत आपल्या देहाचा जर कांहींच भाग न झिजविला तर आपल्या पाठीमागें कळवळ्याच्या दृष्टीनें कोण पाहील, किंवा संकटाच्या वेळेस आपली आठवण कोणास येईल कां? अथवा लौकीकवान पुरुषांत आपलें नांव निघेल काय?

९ प्रत्येक मनुष्यांत आपल्या आयुष्यांत स्वदेशाची सेवा आपल्या हातून किती घडली, ह्याचा विचार करावा व स्वदेशकल्याणाच्या कामीं आपल्या आयुष्याचा कांहीं तरी भाग खर्ची घालावा कारण आपणही दुसऱ्याच्या उपकाररूपीं पर्वातानें भिजलेले आहोंत

---

# जीवितसाफल्य.

१ जीवितसाफल्य किंवा आयुष्याचें चीज ह्मणजे अशा प्रकारचें वर्तन किं ह्या जगतांत आपल्याला अडचणी किंवा दुःख प्राप्त न होतां सर्वांची आपल्याकडे पूज्यबुद्धि राहील व अंतःकाळीं आपल्या मनाची आपल्या कृतकर्माच्या ठिकाणीं शांतता राहील. [ परलोक प्राप्त होईल. ]

२ मनुष्याला लघुत्व तेव्हां प्राप्त होतें, किं जेव्हां तो फक्त आपल्या स्वार्थांत गर्क होतो.

३ ज्यावेळेस मनुष्य परोपकार करण्यांत आपल्या आयु-

# स्वदेशद्रोही.

१ स्वदेशद्रोही अथवा स्वदेशाचें अकल्याण इच्छिणारा व करणारा ह्मणजे एक अज्ञान, मूर्ख जसा कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ असा नीच प्राणि, नाहीं कुऱ्हाडीच्या दांड्यापेक्षांही नीच कारण कुऱ्हाडीचा दांडा गोताचा नाश करतो परंतु त्याच्यांत चैतन्य नाहीं तो जड आहे. व दुसऱ्याच्या कारणानें स्वगोताच्या नाशास कारण होतो. परंतु स्वदेशद्रोही जीवंत प्राणि आहे. त्याला ईश्वरानें ज्ञान दिलें आहे. असें असून तो ज्ञानाची ह्मणजे ईश्वराची अवज्ञा करून स्वतःच स्वतःच्या बांधवांच्या नाशास कारण होऊन आपलें अहित करून घेऊन त्यांत चातुर्य व पराक्रम समजणारा मूर्ख प्राणि होय.

२ स्वदेशद्रोही उपकारावर अपकार करणारा, अमृत खाऊन विष ओकणारा, शस्त्र धारण करून अनाथावर त्याचा उपयोग करणारा, सुख देणाराची निंदा करणारा, स्वमातेवरही दृष्टि करणारा, लोभानें बापाच्या गळ्यावर सुरी ठेवणारा, वचनाचा भंग करणारा, साधुजनाचा द्वेष करणारा, आप्ताचें अहित इच्छिणारा महा नीच प्राणि होय.

३ स्वदेशद्रोही मनुष्याची कर्में देशास धुळीस मिळवितात स्वबांधवास संकटांत टाकतात, स्वज्ञातिस नीचत्व आणतात, देशावर जुलमाचा वर्षाव करवितात, द्रव्याचा नाश करवितात. व्यापाराचा ऱ्हास करवितात, विद्येस बंदीवान करतात, स्त्रीयांची आब्रु घेतात. आंतल्याआंत वैर उत्पन्न करवितात, स्वदेशबांधवास परक्या जवळ संरक्षणाची भिक मागवीतात.

ष्याचें सार्थक मानतो व परदुःखांत भागी होतो तेव्हां मनुष्याला श्रेष्टत्व प्राप्त होतें.

४ मनुष्यानें सर्वांचें कल्याण असावें अशी इच्छा ठेवावी व कोणाची ईर्षा न करतां सर्वांस यथाशक्ति साह्य करावें, ह्यानें आपल्या थोरवीचा विचार सर्वांच्या मनांत येऊन आपल्या विषयीं पूज्यबुध्दि उत्पन्न होते.

५ मनुष्यानें प्रथम स्वकुंटूंबास संतोषीत ठेवण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे कष्ट करूनही त्यांचें पोषण व संरक्षण करावें कि त्यांची आपल्यावर प्रीति रहाते. ते आपला मान ठेवितात.

६ मनुष्यानें हाताखालच्या मनुष्याशी देखील तिरसटपण किंवा निष्ठुरपणा म्हणजे ज्यापासून त्याच्या मनांत असंतुष्टता उत्पन्न होईल असें वर्तू नये.

७ ज्या ज्या लोकांशीं आपला संबंध आहे, त्यांना आपल्या वागणुकीविषयीं संतोष प्राप्त झाला पाहिजे, अशी मनुष्यानें काळजी ठेविली म्हणजे त्याचें आयुष्य सुखांत जाऊन त्याचें मन शांततेंत रहातें.

८ आपल्या आयुष्याचा वेळ फुकट जाऊं न देतां त्याचा कांहीं तरी उपयोग करावा म्हणजे तितके आपण विपत्तीस जास्त दूर केलें असें होऊन आळस म्हणजे दरिद्रता आपणापासून दूर होईल.

———

४ स्वदेशद्रोही आपल्या नांवावर काळीमा आणतो, लोकांच्या मनांत आपल्याविषयीं तिरस्कार व द्वेष उत्पन्न करवितो, स्वतःस अपमानास योग्य करितो. आपल्याविषयीं सर्वांच्या मनांत हलका विचार उत्पन्न करवितो. व अखेरीस आपला नाश करून घेतो. यावत् जन्म दुःखांत, पाश्चात्तापांत, अपमानांत व संकटांत काढितो.

५ स्वदेशद्रोही स्वतःच्या हिताकरितां देशाचें अकल्याण करून परक्याची नाश करितो. परंतु हा स्वदेशाचाही झाला नाहीं. हा जो ह्याच्या कर्णींच्या योगानें परक्याच्या मनावर वाईट ग्रह उत्पन्न होतो त्या योगानें ह्याच्यावर त्याच्या मनांत अविश्वास व तिरस्कार उत्पन्न होतो. अखेरीस हाच ( परका ) त्याच्या ( स्वदेशद्रोहाच्या ) नाशास कारण होतो व ह्यामुळें त्याच्या [ स्वदेशद्रोह्याच्या ] मनांत अखेरीस आपल्या कर्णींबद्दल पश्चात्ताप व दुःख उत्पन्न होतें. पण मागून काय उपयोग ? काच फुटल्यावर उगीच घाई केली असा जो विचार होतो तद्वत् याचाही परिणाम होतो.

६ स्वदेशद्रोह्याचें आयुष्य दंभ, ढोंग, विश्वासघात, चिंता, लोभ, पश्चात्ताप, दुःख, अपमान, लज्जा ह्यांत संपतें.

---

# गृहस्थाश्रम.

१ · गृहस्थाश्रम ह्मणजे कोणा जवळ फुकट याचना न करतां आपलें स्वकष्टानें पोषण व संरक्षण करून कोणी अतिथी, प्रवासी, अनाथ, अशक्त आपल्या येथें आला तर त्याच्या योग्यतेनुरूप आप-

ल्या यथाशक्ति त्याचें आदरातिथ्य करून, व त्याला भोजन घालून संतुष्ट करणें व त्यांना यथाशक्ति आसरा देणें.

२ गृहस्थ हा प्रतिष्ठीत शद्ब म्हणजे मानाचा आहे व जितका ज्या शब्दांत मान ( प्रतिष्टा ) विशेष तितके ते शद्ब प्राप्त करून घेण्यास संकट विशेष; कारण ह्या आश्रमांत आपण घरीं आलेल्या भिक्षुकांस विन्मुख जाऊ न देणें, पाव्हण्याचें यथाशक्ति आदरातिथ्य करणें व घरच्या माणसांस संतुष्ट ठेवणें इतकें करावें लागतें.

३ गृहस्थानें याचकांस आसरा देणें हा त्याचा धर्म आहे, परंतु तो पात्र पाहून दिला पाहिजे; कारण दुर्जनास आसरा दिला तर तो उलट आपल्या नाशास कारण होईल आणि तो जर आळशी, व्यसनी, मूर्ख ह्यास दिला तर ते आपणास चिकटून बसतील व आपणास व्यर्थ त्रास देण्यांत त्याच्या मनाला कांहींही लाज वाटत नाहीं. जेव्हां आपणापासून त्यांना मदत मिळण्याचें बंद पडेल, तेव्हां ते मात्र आपला उपकार विसरून जाऊन निंदा करूं लागतील. इतकेंच नाहीं पण, आपण त्या आळशी, व व्यसनी आणि मूर्खास त्याचें दुर्गुण वाढविण्यास आश्रय दिला असें होईल.

४ गृहस्थानें कोणास झिडकारूं नये किंवा कोणाची निंदा करूं नये कारण तसें केल्यानें आपली अपकीर्ति होऊन आपली नीचांत गणना होईल.

५ गृहस्थानें सार्वांशीं नम्रतेनें वागावें ह्मणजे सर्वांस आपणाविषयीं संतोष होऊन आपली योग्यता वाढेल.

६ गृहस्थानें आपला कुळाचार, कुळधर्म आणि व्यवहार सोडू नये.

कारण तसें केल्यानें एक तर त्यानें वडिलाचा अपमान केला दुसरें आपल्या कुळाचार, कुळधर्म व व्यवहाराची रीत पडण्यास जीं कारणें असतात तीं आपणास पूर्ण माहित नसता त्यांत कारभार केल्यासारखें होईल.

७ गृहस्थानें ज्या रीतीमुळें आपणास तोटा आहे, किंवा होईल असें वाटत असेल, तर त्याचा पूर्ण विचार करावा व सोडल्यापासून आपणास कोणत्याही प्रकारें नुकसान नाहीं (धन, मान, शक्ति, नीति वगैरेचें ) अशी खात्री होईल, तर व त्यापासून आपल्या धर्मास कोणत्याही प्रकारें न्यूनता न येईल त्यावेळेस आपल्या सर्व जातीबांधवांचा विचार घेऊन ती ( रीत ) फीरवून टाकावी किंवा रद्द करावी, परंतु असें करण्यांत घाई किंवा मीपणा अथवा एककल्लीपणा न करावा.

---

## दान.

१ दान ह्मणजे आपला निर्वाह होऊन जें शेष राहील त्यांचा कांहीं भाग अनाथ, अशक्त, गरीब जगाचें हितकर्ते ह्यांच्या मदतीला खर्ची घालून त्यांचें रक्षण करणें अथवा त्यांना आश्रय देणें.

२ अनाथाचें मायबाप होणारे, अशक्ताला हात देणारे, गरीबास साह्य करणारे आणि जगाचें हितकर्त्यांस मदत करणारे ह्या जगांत कीर्ति पावतात. लोकांची त्यांच्याकडे पूज्यबुद्धि असते. मोठमोठे मी मी ह्मणणारेही त्यांच्या समोर नम्रदृष्टिनें पाहतात.

३ शक्ति असून दान न करणें, ह्मणजे दयेची निर्भत्सना करून निष्ठुर होणें अथवा अनाथ, अशक्त, गरीब, व जनहितकर्ते यांस साह्य न करतां, त्यांच्या स्थितिविषयीं निष्काळजी राहणें ह्मणजे ईश्वराज्ञेचें उल्लंघन करणें, अर्थात् आपली अशीच स्थिती राहील ह्मणजे आपणास कधींही कोणाचेंही कोणत्याही प्रकारचें साह्य घ्यावें लागणार नाहीं. अथवा कोणावर अवलंबून राहवें लागणार नाहीं. असें मानून तदनुसार वर्तणें हें अल्प बुद्धिचें, मूर्खपणाचें व पश्चात्तापास कारणीभूत होय.

४ दानशक्ति इतकी प्रचंड आहे कीं, तिच्या तेजांत हजारो दुर्गुण अलिप्त होतात. सत्ताधारीपेक्षां दान करणाऱ्याची कीर्ति याचकरूपीं वायु प्रथम दूरदेशी घेऊन जातात.

५ ज्या देशांत नानाप्रकारानें दान [ अशक्तास साह्य ] करणारे पुरुष असतात, तो देश आशिर्वादानेंआच्छादित होतो, त्यामुळें त्या देशांत दारिद्य सहसा प्रवेश करू शकत नाहीं. दुरदेशी त्याची सुकीर्ति जाते ह्यामुळें ज्यात्या देशाचे विद्वान् त्या देशाची स्थिती पहाण्यास येतात. व त्या देशाचा कित्ता आपल्यादेशबांधवांस वळविण्यास नेण्याचा प्रयत्न करितात.

६ दान करणाऱ्या कल्पवृक्षरूपीं पुरुषांच्या छायेखालीं दारीद्यानें तप्त झालेल्या प्रवाशांच्या झुंडी आश्रयास येऊन बसतात त्या सर्वांचें त्यानें यथाशक्ति सांत्वन करावें, आद्यापेक्षां खर्च फार न करावा, नाहीं तर गोड उसाचे मूळही न राहिल्यानें पुढच्यावर्षी उसाचाही नाश होऊन खाणारास साखरेवांचून राहवें लागेल असें न होवो.

———

# दैव.

१ मनुष्यास ज्याची इच्छा असते तें मिळविण्याचा तो प्रयत्न करितो; परंतु परिणामाचा दूरवर विचार न केल्यामुळें व बेपर्वाई आणि अति घाई याच्या योगानें मी जो प्रयत्न करितों त्यानें मला इच्छित वस्तु प्राप्त होईल किंवा नाहीं, हें त्याला कळत नाहीं. यास्तव परिणामीं जेव्हां त्याला इच्छिलेली वस्तु प्राप्त न होतां उलटतो संकटांत येतो तेव्हां कष्टि होऊन पश्चात्तापांत गर्क होतो. ह्यामुळें त्या संकटांतून पार पडण्याचा उपाय न सूचतां तो अरे दैवा, असें म्हणून उगाच दुःख करीत बसतो. म्हणजे ज्यास्त अज्ञानपणा धारण करतो, त्या वेळेस जन म्हणतें कि बिचारा साडेसातीच्या फेऱ्यांत आला, काय करील?

२ मनुष्य ज्याची इच्छा करतो तें त्याला योग्य आहे किंवा नाहीं, तो तें मिळवूं शकेल किंवा नाहीं? तें मिळविण्यांत त्याला कोण कोणत्या अडचणी येतील, त्या निवारणार्थ कोणते उपाय योजिले पाहिजेत. तीं साधनें त्या जवळ आहेत किंवा नाहीं. ह्याचा विचार केल्या शिवाय आपली इच्छा बळकट करतो व ती पार पाडण्यास प्रयत्न करण्याच्या अगोदर तो असें करीन तसें करीन असें लोकांत प्रसिद्ध करतो. मग जेव्हां ती इच्छा पार पाडण्यास प्रत्यक्ष प्रयत्न करण्यास जातो. तेव्हां हें किती अवघड काम आहे, हें त्याच्या अनुभवास येतें व तो क्षणिक बुद्धीचा असल्यानें मनांत त्रासून व कंटाळून जाऊन दैवावर दोष ठेवितो; परंतु जनांत आपलें अज्ञान व तें लपवीण्यास ढोंग हें उघडकीस न यावें म्हणून तो नानाप्रकारची

खोटी बहाणी काढतो व तीरसटपणा करतो. पण जनांत किंवा मनांत आपलें अज्ञान कबूल करीत नाहीं. अखेरीस कपाळावर हात ठेवून नशीबाच्या नांवानें रडतो ! परंतु नशीब ह्मणजे काय ह्याचाही तो विचार करीत नाहीं.

३ दैव म्हणजे कांहीं नाहीं; परंतु केलेल्या कर्माचें फळ होय. यावरून आपल्या स्थितीबद्दल आपणच जोखीमदार नाहीं कां ? दुष्कर्मामुळें त्याचें फळ दुर्दैव प्राप्त झाल्यास तदनिवारणार्थ सत्कर्म हें औषधरूप होय ( ह्यालाच प्रायश्चित्त म्हणतात ) जसे कुपथ्यामुळें शरीरास अस्वस्थता झाल्यावर औषधोपचार केल्यानें स्वस्थता प्राप्त होते तद्वत्.

---

## पुढें करूं.

१ परमेश्वरानें मनुष्य प्राण्याला आपणास आवश्यक वस्तु प्राप्त करून घेण्यास्तव अवयव किंवा साधनें दिलीं आहेत व ती वस्तु आपणास कशी प्राप्त होईल, ह्याचा विचार करून तदनुरूप आचरण करण्यास्तव ज्ञान दिलें आहे. आतां अमुक आवश्यक वस्तु आपणांस कशी मिळेल हा प्रश्न आपल्या ज्ञानतंतुरूपी मंत्रीजवळ ठेवला, तर लागलाच जाब मिळेल कीं, उद्योगानें. तर ह्यावरून आवश्यक वस्तूची प्राप्ती उद्योगानें होईल हें तर नक्की ठरलें. ज्या उद्योगाच्या अंतीं आपणास ती वस्तू मिळणार आहे तो उद्योग लवकर केला तर लवकर व उशीरानें केला तर उशीरानें ती वस्तु प्राप्त नाहीं का

होणार? असें असतां "पुढें करूं" [ उद्योग ] ह्मणजे ती आवश्यक वस्तु आपणास उशीरानें प्राप्त होईल, असें माहीत असतां आळस रूपीं मोहपाशांत गर्क होऊन ती लवकर मिळविण्यास्तव प्रयत्न न करणें अर्थात समजून उमजून अडचणींत रहाणारे जे प्राणी ह्या जगतावर ईश्वराच्या व सृष्टीच्या नियमाचा भंग करणारे आहेत; ते जर अडचणींत व संकटांत येतील किंवा त्यांना दुर्दशा प्राप्त होईल तर परमेश्वरानें त्यांच्यावर दया केली असें नाहीं कां ? कारण परमेश्वरानें ह्यांच्या ( अधमांच्या जे समजत असून खाड्यांत पडणारे आहेत ) उद्धारास्तव दुर्दशारूप शिक्षकाचा वेश घेऊन ह्यांना ठिकाणीं आणण्याचा प्रयत्न केला आहे.

२ पुढें करूं हे शब्द मनुष्याच्या तोंडांतून केव्हां निघतात, ह्या बद्दल जर विचार केला तर आपणांस कळेल कीं, तो आळस व कंटाळा ह्यानें जेव्हां वेष्टिला गेला तेव्हां आपण आळस व कंटाळा रूपीं मदिरेंत बेशुद्ध आहों हें इतरास व स्वतःसही न दिसावें यास्तव पुढें करू हा विनाशरूपीं जाळीदार पडदा टाकण्याचा जो प्रयत्न करतो, त्यानें आपलें मन किंवा जन फसले जात नाहीं. मन अशा विचारानें समाधान मानतें कीं, आपणास ह्या वेळेस कंटाळा आला आहे, तर आपल्याच्यानें जो उद्योग करावयाचा तो बराबर होणार नाहीं. पुढें जलद त्वरेनें करून ह्याचा बदला फेडून टाकूं. जनाच्या हिताहिताचा कांहींच प्रत्यक्ष संबंध नसतो. यास्तव त्याला ( जनाला ) खोल विचार करण्याची कांहीं गरज नसते; परंतु पुढें करूं ह्मणून स्वस्थ बसणारापेक्षां तात्काळ प्रारंभ करणार जास्त व लवकर साफ-

ख्यता पावेल हें मात्र लोक मुखानें उच्चारण करून स्वस्थ बसतात. ह्यावरून पुढें करूं ह्या शद्बानें मन किंवा जन फसत नाहीं, ह्मणजे आपण निर्दोषी आहों, असें ह्मणत नाहींत, परंतु आपणास मात्र ज्यांची अवशक्यता असेल त्याची अडचण किंवा वियोग भोगावा लागतो, ह्यावरून पुढें करूं ह्या वृक्षाचें उत्पत्तिस्थान आळस होय व ह्या वृक्षाचें निरुत्साह हें जळ ह्मणजे जीवित्व होय व विपत्ति, संकट, अडचण ही त्याची फळें होत.

२ पुढें करू हे शद्ब महा मलीन होत. कारण ह्या शब्दाच्या उच्चारानेंच मनुष्याचें तेज हरण होऊन त्याची शक्ति निर्माल्य होते, त्याच्या अंगीं निरुत्साहरूपीं विष व्यापून जातें आणि त्या निरुत्साहरुपीं विषयाच्या योगानें त्याचें शरीर विपत्तिरूपीं रोगानें वेष्टिलें जातें. तर पुढें करू हीच साडेसाती नव्हे काय?

---

# परमेश्वर.

१ परमेश्वर सर्वेश्वर, विष्णु, शंकर, ब्रह्मा, देवी वगैरे त्याची अनंत नांवें आहेत. कारण त्याच्या अंगीं अनंत शक्ति व सर्व कार्यांचा कर्ता. त्या त्या कार्यानुरूप त्याचें नांव पडलें आहे. तो सर्वांचें रक्षण करतो ह्मणून त्याला, विष्णु ह्मणतात. तो सर्वांचा नाश करितो ह्मणून त्याला शंकर ह्मणतात. तो सर्वांचा उत्पन्न करता आहे ह्मणून त्याला ब्रह्मा म्हणतात. त्याच्या अनंत शक्तीला आदि-

देवी किंवा महामाया म्हणतात. ह्याप्रमाणें तो त्याच्या प्रत्येक गुण व कार्यावरून लोक त्याला निरनिराळ्या नांवानें ओळखितात.

२ तो सर्व शक्तिमान् निराकार, अविनाशी, शान्तिरूप सर्व तो ज्ञानी, सर्वतोगामी, निरंजन, न्यायी, अंतरसाक्षी व सर्व ठिकाणीं विराजमान आहे.

३ परमेश्वर त्याच्या जवळ कोणी कांहीं, मागावयास गेला तर तो त्याला झिडकारून टाकीत नाहीं; परंतु ज्या वेळेस त्याला त्याची बळकट इच्छा आहे असें वाटेल, त्या वेळेस तो त्याच्या मनांत प्रेरणा करतो. व त्याच्या जवळूनच त्याबद्दल उद्योग करवून त्याला ती वस्तु प्राप्त करवून देवावितो. कारण यानेंच जर त्याला झिडकारून टाकीलें तर त्याला कोठें थारा मिळणार आहे?

४ परमेश्वराच्या ठायीं विश्वास न ठेवला, तर मनास शांतता कशानें उत्पन्न होईल? व त्या शांततेशिवाय सुख नाहीं.

५ परमेश्वर नाहीं असें मानिलें, तर आपणापेक्षां कोणी ह्या भूतलावर श्रेष्ठ नाहीं. यास्तव सर्व वस्तूची उत्पत्ति व लय कसा होतो व काय कारणानें होतो. सर्व चमत्कार कशाच्या योगानें होतात, हें आपणास माहित असलें पाहिजे. आपणास आपल्या मर्जीप्रमाणें सर्व कांहीं करण्याची शक्ति असली पाहिजे. कोणत्याही वस्तु [ जड व चंचळ ] बद्दल आपणास दुःख झालें न पाहिजे कारण त्या वस्तूचें नष्टत्व होऊ न देणें ही शक्ति आपणांत असली पाहिजे, आणि हें सर्व आपणास माहित असलें पाहिजे.

६ असें धारिलें कीं, पदार्थाचा लय होणें किंवा उत्पत्ति होणें ह्यास परमेश्वर कारण नाहीं; परंतु ही एक स्वाभाविक शक्ति आहे. तरी स्वाभाविक शक्ति काय, हें तरी माहित असलें पाहिजे ना? नास्तिक ह्मणतात ह्या शक्तिविषयीं मात्र आपण अज्ञान आहों. व ही शक्ति परमेश्वराची कृती होय, असें आस्तिक मानतात तर हें मानणें जास्त सयुक्तिक दिसतें. कारण जर कायदा आहे तर त्या तरी कायद्याचा कर्ता कोणी असला पाहिजे, ह्याचप्रमाणें शक्तीचा कोणी स्वामी असला पाहिजे व तो परमेश्वर होय.

७ परमेश्वराला आपल्या कर्तव्यकर्माचा जाब द्यावयाचा आहे. असें समजून, व आपल्या कर्तव्याप्रमाणें आपणास त्याच्यापासून फळ मिळावयाचें आहे असें समजून प्रत्येक प्राण्यानें नीतीनें वागावें. म्हणजे ज्यापासून दुसऱ्याच्या मनाला कोणतेही प्रकारें आपणाकडून गैरवर्तणूक झाली असें वाटणार नाहीं.

---

# परचुरण

## ध्यानांत ठेवा.

१ मनन करा, मनन करा, विचार करा, विचार करा, जन्मास येऊन काय केलें ह्याची आठवण धरा. त्वरा करा आणि सावध व्हा! वेळ जात आहे काळ येत आहे.

## हिंदुस्तानांत सुस्थिती केव्हां प्राप्त होईल ?

१ जेव्हां प्रत्यक्ष व्यापार आर्यवाशीं जनांच्या हातीं येईल तेव्हां.

२ जेव्हां समान सुट व हक्क आर्यांना प्राप्त होतील तेव्हां.

३ जेव्हां आर्यवाशीं एकमेकाची ईर्षा सोडून ऐक्य करतील तेव्हां.

४ जेव्हां आर्यवाशीं स्वतांचें कल्याण सोडून, देशहितासाठीं स्वतास घस घेतील तेव्हां.

५ जेव्हां आर्यवाशीं पोकळमान आणि दिखाऊ देशाभिमानीपणा सोडतील तेव्हां.

## कुटुंबगृह कोठें आहे ?

१ जेथें कुटुंबांतील सर्व मनुष्य एकमेकाशीं प्रमानें वागतात. एकमेकाची ईर्षा न करतां सर्वांचीं मनें एकमेकाविषयीं शुद्ध आहेत. कोणताही पदार्थ सर्वांस वाटून आनंदानें खातात. घरच्यास सोडून परक्यास मिळत नाहींत. एकमेकांच्या सुख दुःखांत संभागी होतात तेथें.

## मनुष्य इह व देवलोक साध्य केव्हां करूं शकेल ?

१ सर्वत्र योग्य दया आणि क्षमेनें वागेल. क्रोधास सोडील. परद्वार न पाहील, सत्य नम्रपणानें वागेल, कर्तव्य आदा करील. व्यसनाधीन न होतां ज्ञानसंपन्न होईल तेव्हां मानव प्राणि ईह व परलोक साध्य करू शकेल.

# दारू.

१ मादक दारू पिऊ नये किंवा घेऊ नये. ( वेद. )

२ ब्रह्महत्या; मादक दारूचें सेवन. ब्राह्मणाच्या द्रव्याचें हरण, गुरुस्त्रीगमन हीं चार मोठीं भयंकर पापें होत आणि त्यांसर्वांशीं नेहमीं संबंध ठेवणें हें पांचवें महा पातक होय. [ मनु.११–९४ )

३ अज्ञानानें जर एखादा ब्राह्मण, क्षत्रीय अथवा वैश्य दारू पिईल तर ती त्यानें ऊन करून प्यावी कारण तेणें करून त्याचे सर्व शरीर भाजेल व तो पापापासून दूर होईल. अथवा तप्तगोमूत्र, पाणी, दुध, तुप, अथवा पाण्यांत कालविलेलें गाईचें शेण हे पदार्थ त्यानें जन्मपर्यंत खात असावें. ( मनु ११ ७०–९१ )

४ दारूच्या गुंगींत एखादा ब्राह्मण अस्वच्छ जागेंत पडेल, वेदाक्षरें भलत्याच ठिकाणीं उच्चारील अथवा मूर्खपणाचें कृत्य करील ह्मणून ब्राह्मणानें दारू पिऊ नये [ मनु ११–७–६ ]

५ वर सांगितल्याप्रमाणें जो अचरण करणार नाहीं त्यास राजानें पुढील शिक्षा करावी. गुरुस्त्रीगमन करील तर त्याच्या कपाळावर "भग" असा डाग द्यावा; दारू पिईल तर त्या दारूच्या भांड्याचा डाग द्यावा; द्रव्य हरण करील तर कुत्र्याच्या पायाचा डाग द्यावा; अशा लोकांबरोबर पंक्तिव्यवहार करू नये. त्यास कोणीही विद्या शिकवूं नये. विवाह संबंध करू नये अशा रीतीनें त्यास जातिबाह्य केल्यावर तो भटंगा सारखे जिकडे तिकडे भटक्या मारीत बसेल त्यांच्या नातेवाईकांनीं

त्यांचाशीं मुळींच संबंध ठेवू नये, त्यांच्यावर दया करूं नये, किंवा त्यांचाबरोबर आनंदानें बोलूंही नये अशी मनूची आज्ञा आहे. [ मनु ९–२३७–२३९ ]

६ स्त्री अथवा पुरुष याणीं दारू पिऊ नये कारण त्यापासून पाप व अनर्थ घडतात. [ भविष्यपुराण. ]

७ जो ब्राह्मण दारू देतो व पितो तो ब्रह्मकर्म करण्यास अपवित्र होय; ह्मणजे ब्राह्मणांस जे हक्क आहेत त्यांस तो मुकतो [ कल्किपुराण. ]

८ आपला ऊर्जितकाल यावा अशी ज्याची इच्छा असेल त्यानें दारू पिऊ नये. (भैरवस्तोत्र )

८ आपलें व्यसन पुरें करण्यासाठीं जो ब्राह्मण दारू पितो त्यानें त्यापेक्षां मरावें हें उत्तम. ( स्मृतिसूक्त महातंत्र. )

१० हे नारदा, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, आणि स्त्रियानीं दारू पिऊ नये. ( वरुणपुराण. )

११ या दिवसापासून पुढें या जगांत दुष्ट ब्राह्मण अज्ञानपणांतही मादक दारू पिईल तर त्यास जातिबाह्य टाकावें आणि ब्रह्महत्येंचें त्यास पातक लागेल. त्याचा या जगांत सर्व लोक द्वेष करतील व परलोकांतही तोच मासला. [ शुक्राचार्याचा शाप महाभारत आदिपर्व भाग १९ ]

१२ अलीकडच्या काळांत जो मोठा तत्ववेत्ता होऊन गेला व ज्यास प्रति ईश्वर मानतात तो शुक्राचार्य ह्मणतो, ज्ञानप्राप्तीच्या कामांत दारू हा एक मोठा अडथळा आहे आणि म्हणून तिच्या सावलीस स्पर्श करू नये.

१३ जो दारू पितो त्याच्या यात्रा, देवधर्म, जपजाप्य, फुकट

आहेत ( "गुरुविलास" शीक लोकांचा प्रसिध्द गुरुगोविंद याणें लिहिलेला. )

१४ जो दारू पितो तो स्वतःच्या कुटुंबाचें व स्वतःचें निर्मूल करून करून घेतो [ बुद्ध एशियांतील तारा ]

१५ दारू कधीहीं पिऊ नये किंवा तिला स्पर्श करूं नये. [ बोद्ध धर्मांची पांचवी आज्ञा. ]

१६ पापाचें मूळ कारण दारू आहे. ( मंहमद पेगंबर मुसलमानी धर्माचा अधिकारी. )

१७ ज्याच्या योगानें पोटांत अस्वास्थ्य उत्पन्न होऊन मरण येतें अशा विषारी पदार्थांत जो कडकपणा असतो त्यापेक्षां दारूंत जास्त आहे. [ अलीकडच्या काळांतील नामांकित वैद्य चरक. )

१८ दारू फारच दोषास्पद आहे. सर्वांनीं तिचा त्याग करावा. जे शाप दिलेले अतिशूद्र आहेत तेच मात्र ती पितात, ब्राह्मणाच्या, क्षत्रियाच्या व वेश्याच्या स्त्रिनें आपला पति पुन्हां जीवंत होईल या आशेनेंही ती पिऊं नये. [ राजनीति ]

१९ कोणत्याही संकटीं ब्राह्मणानें दारू पिऊ नये. पापाच्या भयानें त्यांच्या स्त्रियांनींही ती पिऊ नये. [ भविष्य पुराण. ]

२० जो ब्राह्मण दारू पितो तो रवरव नरकीं जातो व जी स्त्री दारू पिते तीस मरणाअंतीं देव तिच्या पति जवळ येऊ देत नाहीं. [ वेद ]

**सर्व भारतवासी आर्य ज्ञान संपन्न होवोत. अस्तु**

**॥ शंकर.**

समाप्त.

# शंकराचार्य कृत.

१ विद्वान् कशानें होतो—शास्त्राच्या योगानें.
२ ब्रह्मप्राप्ती कशानें होते—तपानें.
३ तप ह्मणजे काय—स्वधर्माचरण.
४ साह्य कशानें होतो.—धैर्यानें,
५ बुद्धिमान् कशानें होतो.—वृद्धांच्या सहवासानें.
६ भूमीपेक्षां मोठें कोण--माता.
७ आकाशापेक्षा उंच कोण—पिता.
८ वायुपेक्षां चंचळ कोण?—मन.
९ तृणापेक्षां पुष्कळ काय?—चिंता.
१० तृणापेक्षां हलका कोण?—याचक.
११ प्रवाशांचा मित्र कोण—समुदाय.
१२ घरांत राहणाऱ्याचा मित्र कोण—भार्या.
१३ रोग्याचा मित्र कोण—वैद्य.
१४ मरणाऱ्याचा मित्र कोण--धर्मदान.
१५ थंडीचें औषध काय—अग्नि.
१६ कशाच्या योगानें कीर्ति अवश्य प्राप्त होते—दातृत्वानें.
१७ स्वर्गप्राप्ती कशाच्या योगानें हटकून प्राप्त होते—सत्यानें.
१८ सुख हटकून कशाच्या योगानें होतें--चांगल्या स्वभावानें
१९ देवानें मनुष्यास दिलेला मित्र कोण--भार्या.
२० मनुष्याचें उपजीवन काय--पर्जन्य.
२१ मनुष्याचें आवश्य कृत्य कोणतें--दान.
२२ धन मिळविण्यास मुख्य साधन कोणतें--दक्षता.

२३ धनामध्यें श्रेष्ट धन कोणतें--विद्याधन.

२४ उत्तम लाभ कोणता--आरोग्य लाभ.

२५ उत्तम सुख कोणतें--संतोष.

२६ मुख्य धर्म कोणता—पिडा न करणें.

२७ काय स्वाधीन ठेविलें असतां शोक होत नाहीं—मन.

२८ कोणाची मैत्री कमी होत नाहीं—साधूची.

२९ काय टाकिल्यानें लोकप्रिय होतो--अभिमान.

३० काय टाकीलें असता शोक होत नाहीं--क्रोध.

३१ काय टाकिल्यानें सुखी होतो—लोभ.

३२ नटनर्त्तकास कशा करीतां द्यावें—लौकिकाकरितां.

३३ राजास कां द्यावें--भयनिवृत्ति करितां.

३४ लोक कशानें आच्छादित आहेत—सज्ञानानें.

३५ मनुष्य कशाच्या योगानें मित्राचा त्याग करितो—लोभानें.

३६ काय टाकिल्याने धनवान होतो--विषयवासना.

३७ मनुष्य कशाच्या योगानें स्वर्गास जात नाहीं—विषयसंगानें

३८ मेलेला पुरुष कोणता—दरिद्री

३९ मेलेलें राष्ट्र कोणतें—ज्यांत राजा नाहीं तें

४० विष कोणतें—याचना ह्मणजे अपायकारक

४१ दम म्हणजे काय—मनाचा निग्रह.

४२ लाज कशाची धरावी—वाईट काम करण्याची.

४३ ज्ञान म्हणजे काय—परमेश्वरत्व समजणें.

४४ शम म्हणजे काय—चित्ताची शांति.

४५ दया म्हणजे काय—सर्वास सुख व्हावें असें इच्छणें.

४६ सरळपणा म्हणजे काय--समदृष्टि.

४७ मनुष्याचा दुर्जय शत्रु कोण--क्रोध.

४८ मोठा रोग कोणता—लोभ.

४९ साधु कोण--सर्वांस हितकारक तो.

५० मोह कोणता—धर्म न समजणें.

५१ लाभ कोणता—सत्समागम.

५२ मानी ह्मणजे काय--मीच मोठा असे समजणें

५३ आळस कोणता—शास्त्रांत सांगीतलेलें आचरण न करणें

५४ शोक कोणता—अज्ञान

५५ कोणत्या गोष्टीस ऋषीनें स्थैर्य म्हटलें आहे—स्वधर्माच्या ठायीं निश्चल असणें.

५६ धैर्य ह्मणजे काय--इंद्रियनिग्रह तेंच धैर्य

५७ स्नान कशास ह्मणावे--मनाचा मळ घालविणें ह्यास

५८ दान ह्मणजे काय--प्राण्याचें संरक्षण करणें

५९ पंडित कोण—धर्म जाणतो तो

६० मूर्ख कोण--नास्तिक

६१ काम ह्मणजे काय--संसारवासना.

६२ मत्सर कोणता—मनक्षोभ

६३ अंहकार ह्मणजे काय--मोठे अज्ञान

६४ दंभ ह्मणजे काय--धर्माचा बाहेरून डौल घालणें

६५ दैव ह्मणजे काय--दिलें असेल त्याप्रमाणें प्राप्त होणें

६६ पैशुन्य म्हणजे काय--दुसऱ्याला दोष लावणें

६७ गोड बोलणारास काय लाभ होतो--तो लोकप्रिय होतो

६८ पुष्कळ मित्र असण्यास काय लाभ--तो सुखानें रहातो

६९ धर्माविषयीं तप्तर असणारास काय प्राप्त होतें—मोक्ष

७० मार्ग कोणता—सुज्ञ थोर लोक जातील तो

७१ विचार करून करणाऱ्यास काय लाभ—त्याचा इतरापेक्षा अधिक जय होतो

७२ आश्चर्य कोणतें—रोज रोज प्राणी मरतात आणि बाकीचे आपणास चिरंजीव समजतात.

७३ अक्षय नर्कवास कशाच्या योगानें प्राप्त होतो—धन जवळ असून दान व उपयोग न करता धन नाहीं ह्मणणें.

७४ धर्म, अर्थ, काम, हे तिन्ही परस्परविरुद्ध आहेत ते कशाच्या योगानें एकत्र होतात—स्त्रिपुरुष हे उभयता धर्मानें वागणारीं असलीं ह्मणजे हे तिन्ही एकत्र राहातात.

७५ सुखोपभोग घेणारा बुद्धिवान लोकामध्यें मान्य असा जीवंत असता मेलेला असा कोण—देव, अतिथी, आप्तवर्ग, वडील व आत्मा यांस जो संतुष्ट ठेवीत नाहीं तो.

७६ सनातन ह्मणजे त्रिकाळबाधीत असा धर्म कोणता—जो मोक्ष देतो तो.

७७ अंतःकरणांतून दया वजा केली तर बाकी काय राहील—घातकीपणा व जुलूम.

७८ दुर्लभ वस्तु कोणती—मनुष्य देहांत येऊन मोक्ष साधन करणें

७९ दुःख कोणतें—अपमान

८० सुख कोणतें—साधु संगती

८१ मोठें पाप कोणतें—परनिंदा

८२ सर्व अपराध कोठून उत्पन्न होतात—एकांतांतून

८३ लोखंडापेक्षां कठीण कोण—कृपण

८४ लोण्यापेक्षां मऊ कोण—साधु

८५ मेळ ह्मणजे काय -मनाची अशुध्दता

८६ सर्वांत चीकट कोण—माया

८७ उत्तम वेळ कोणती--ज्या वेळेस परोपकाराची व चागलीं कामें होतात तीं.

८८ दुष्ट विकारापासून मनाला शांतता केव्हां मिळते--जेव्हां आपण उद्योगांत असतों तेव्हां

८९ मनाची खरी खातरी करणारा गुरु कोण—पुनः उद्योग करणें

९० बुध्दिहीन कोण--सर्वस्वी दुसऱ्यावर अवलंबून राहणारा.

९१ मोठा क्षय कोणता--मनाची अस्वंस्थता

९२ श्रेष्ट कोण—ज्याच्या विषयीं आपली पूज्य बुध्दि असेल तो

९३ कपटी कोण -ज्याच्यामध्यें पराक्रम नाहीं तो

९४ न्याय ह्मणजे काय--दोन्हीपक्षाचें समाधान होणें [ शांत होणें ]

९५ भ्रष्ट कोण--जो आपल्या कर्तव्यकर्मापासून चळला तो

९६ व्यवहार कोणता—ज्यापासून परस्परास अडचण न येतां सुख होईल तो.

९७ सुखी राष्ट्र कोणतें--जेथें बहुमतानें कार्य होतें तें.

९८ निंदक कोण--अल्पबुध्दिमान्

९९ नांव कोणाला आहे--जो दुसऱ्याच्या उपयोगी आहे त्याला-

१०० धर्मानें कां वागावें--मनाला शांतता ठेवून जीवित सुखांत जाण्याकारिता.

———

# बाबाराव जयराम भीशेकृत शतप्रश्नावलि.

१ नर ह्मणजे काय---दृढनिश्चयी प्राणि.

२ श्रीमान् कोण–दुसऱ्यास सुख देण्याचें ज्याजवळ आहे तो.

३ सभा कशास ह्मणावी--जींत दुःख निवारणार्थ बहुमतानें विचार होतात तीस.

४ मान ह्मणजे काय--शुभकर्मे करणाऱ्याविषयीं लोकांची पूज्यबुद्धि.

५ अपमानाचे बीज कोठें आहे--चुकींत.

६ मनाची तृप्ती कशांत आहे--संतोषांत.

७ प्रिती संपादन करण्याचा मार्ग कोणता--दुसऱ्याचे शुभ करण्याचा प्रयत्न.

८ अक्षय सुखद असें दान कोणतें--विद्या.

९ विद्या कशी आहे--अंधारांत दीपकासारखी.

१० अंधार कोठें रहातो--ज्यांत आपण अज्ञान आहों तेथें.

११ आपली शक्ति कशांत आहे--ज्याविषयीं आपणास ज्ञान आहे त्यांत.

१२ भय कशांत आहे--दुसऱ्याला पीडा होईल असें कर्म करण्यांत.

१३ दुःखाचे घर कोणतें- अज्ञानता.

१४ आपल्या योग्यतेचा जास्त प्रकाश कशानें पडेल--नम्रतेनें

१५ कंटाळा कोठें आहे--निरुद्योगीपणांत.

१६ निरुत्साह कोठें आहे--बुज ह्मणजे योग्य उत्तेजन नाहीं तेथें

१७ डौल केव्हां येतो--प्राप्तीसाठीं जेव्हां श्रम करावे लागत नाहीं तेव्हां.

१८ एकत्र्याचें माहेर कोणतें--संकट.

१९ निर्बळता केव्हां येते--एकत्र्याचा नाश होतो तेव्हां.

२० ऐक्याचा नाश कशांत आहे--अविश्वासांत.

२१ अविश्वास केव्हां उत्पन्न होतो--जेव्हां प्रेम ह्मणजे एक मेका-विषयीं शुभेच्छकपणा नाहींसा होतो तेव्हां

२२ प्रेम नाहींसे होण्याचें कारण काय--बेपर्वाईपणा.

२३ बेपर्वाईपणा का होतो--गर्विष्टपणामुळें

२४ गर्विष्टपणा कशानें होतो--आपली खरी योग्यता आपणास न कळूं शकल्यामुळें.

२५ आपली खरी योग्यता आपणास कळण्यास उपाय कोणता--नम्रतेचा व सचोटीचा विचार.

२६ नम्रता ह्मणजे काय--आपल्याकडे दुसऱ्याची प्रिती ओढून घेण्याची शक्ति.

२७ न्यायी कोण--मला केलेल्या कर्मांबद्दल जबाब द्यावा लागेल असें अक्षय मनांत बाळगणारा

२८ वियोग दुःख कोणतें--मनांतून शांततेचें गमन होणें

२९ काय ऐकण्याची इच्छा करावी--परसुखाच्या गोष्टी

३० कसें बोलावें--मृदु [ ह्मणजे प्रिय ]

३१ काय शोधावें -परदुःख निवारणाचा उपाय

३२ काय पहावें--सत्य आहे आहे किंवा असत्य

३३ काय करावें--मोक्षसाधन

३४ काय द्यावें--सुख

३५ दुधा पेक्षां उज्वळ कोण--कीर्ति
३६ आयुष्यापेक्षां अमर कोण--कीर्ति
३७ काजळापेक्षां श्याम कोण--कुपुत्र
३८ काय टाकावें--दुर्गुण
३९ काय घ्यावें—माहीती
४० मरणापेक्षां वाईट काय--अपकीर्ति
४१ कोणास भ्यावें--मूर्खास
४२ कोणापासून दूर राहवें--दुर्जनापासून
४३ कोठें पाठी मागें राहावें--अपकीर्तीच्या कामांत
४४ कोठें पुढें व्हावें--देश कल्याणाच्या कामांत
४५ कोठें बसावें--सज्जनांत
४६ कोठें विश्रांति मिळते--विश्वासांत
४७ कोठें त्रास होईल--नीचाच्या संगतींत
४८ कशांत शक्ति येईल—जें काम आपण मनापासून करण्याचें धारूत्यांत
४९ अशक्यता कोठें आहे--निरुत्सांहात
५० फळ मिळण्यास उपाय कोणता--मेहेनत
५१ दुःख कमी कसें होतें--दिवसगतीनें.
५२ हर्षाची निशाणी काय--प्रफुल्लितपणा
५३ दुःखाशिवाय निरभेळ हर्ष कशानें प्राप्त होईल--परोपकारानें
५४ बहु मित्र केव्हां होतील--जेव्हां लक्ष्मी प्राप्त होईल तेव्हा
५५ सर्व मित्र केव्हां होतील--परोपकार बुद्धि प्राप्त होईल तेव्हां
५६ आपलें नुकसान व जनाचें हांसे एकच वेळीं केव्हां होईल--जेव्हां आपल्या दुष्कर्मामुळें आपण संकटांत येऊं तेव्हां

५७ चुक केव्हा होईल--जेव्हां आपण अंतःकरणाच्या योग्य सत्याप्रमाणें वागण्यास हयगय करूं तेव्हा

५८ अनीति कोणती--दुसऱ्यास पीडा होऊन आपणास काळीमा लागेल ती.

५९ ठिकाण कोणतें--जेथे विश्रांति मिळेल तें

६० छत्र ह्मणजे यजमान कोण--ज्यापासून आपलें संरक्षण होईल तो.

६१ हुशार कोण--वेळे प्रमाणें वागणारा

६२ अनुभव कशानें होतो--प्रसंगानें

६३ देशाटन कां करावें--सर्व गोष्टीचा थोडक्या वेळेंत अनुभव मिळण्यासाठीं.

६४ हाताचा उपयोग काय--दुःखीतास दुःखांतून ओढून काढण्याचा

६५ अडचण कोणती--अदृढनिश्चय

६६ खावें काय--धीर

६७ प्यावें काय--दुसऱ्याचे दोष.

६८ पकडावें कोणाला--ज्यापासून सुख होईल त्याला

६९ जावें कोठें--उद्योग मिळेल तेथें.

७० वागावें कसें--दुसऱ्यास पिडा न होईल असें.

७१ लाज कशाची मानावी--वाईट कर्माची

७२ उत्तर कशास म्हणावें--ज्यापासून समाधान होईल तें

७३ अमृत कशास म्हणावे—अक्षय सुख ज्यापासून मिळेल त्यास

७४ अक्षय सुख कशापासून मिळेल--ज्ञानापासून

७५ जलद ओळखिली काय पाहिजे--कीर्ति.
७६ मूर्खापासून काम कसें होईल--त्यास मोठेपणा दिल्यानें
७७ विद्वान् कशानें वळेल--सत्यतेनें
७८ लोभी कसा फसेल--लालचीनें
७९ कामांध धास्तिच्या वेळेस घाताच्या ठिकाणीं कां जातो--असह्य आशेनें
८० दुष्टाचे मनोविकार कशानें पार पडतात--आपल्या गफलतीनें
८१ शहाणा कार्य केव्हां करतो--अनुकूळ वेळेस
८२ साखरेपेक्षां गोड काय--गरज
८३ जलद लांबवर सुगंधी जाणार असा पदार्थ कोणता--उदारता
८४ विनोद कोणता--एकमेकाच्या खाम्दा दुःख न लागता एकमेकास कळणें
८५ कशाचा आग्रह करावा--ज्यापासून ज्यास सुख होईल त्याच्याजवळून तें करविण्याचा
८६ केव्हां धांवावें जेव्हां दुर्जनाच्या सपाट्यांत सांपडण्याची वेळ येते तेव्हां
८७ काय लिहावें--आपल्या मनास सत्य वाटेल तें.
८८ कशासाठीं विचारावें--आपल्या मनाचा संशय टाळण्याकरितां.
८९ शक्य कोणतें--विचारानें आरंभलेलें कार्य.
९० उपयोग कशांचा होत नाहीं--जें आपल्या जवळ नाहीं त्याचा.
९१ साहसाची माता कोण--विपत्ति.
९२ निद्रा म्हणजे काय--विश्रांती.

९३ निंदा म्हणजे काय--ज्यांत जो अवगुण नसेल तो सांगणें.

९४ धन असन दारिद्र्य कोठें--कृपणाच्या येथें.

९५ सत्ता असून विवेक कोठें--सद्गुणाच्या येथें.

९६ काम असून विश्रांती कोठें--व्यवस्थेनें वागणारास.

९७ ज्योतिषी कोण--परिणामाचा अगोदर विचार करून कार्य करणें.

९८ वैद्य कोण--संकटनिवारणार्थ उपाय जाणनारा.

९९ दूत कोण--दोन्हीपक्षास अनहितापासून बचावणारा.

१०० मंथन कशाचें करावें--ज्ञानाचें.

